नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३५२ * * भंडारा * बुधवार, दिनांक १८ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## जी ७ शिखर परिषद सोडून ट्रम्प परतले

■ वृत्तसंस्था, अल्बर्टा, दि. १७ :
कॅनडातील अल्बर्टा राज्यातील कनानास्किस येथे सुरू असलेल्या जी ७ शिखर परिषदेत इस्त्रायल-इराण तणावाचा परिणाम दिसून येत आहे. शिखर परिषदेच्या पहिल्या दिवशी जी ७ देशांनी इस्त्रायलला पाठिंबा दिला. आज संयुक्त निवेदनात असे म्हटले आहे की इस्त्रायलला स्वतःचे रक्षण करण्याचा अधिकार आहे. इराणकडे कधीही अण्वस्त्रे नसावीत.
दुसरीकडे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे शिखर परिषद अर्ध्यावर सोडून अमेरिकेला रवाना झाले. मध्यपूर्वेतील तणावामुळे ट्रम्प यांनी हा निर्णय घेतल्याचे व्हाईट हाऊसने म्हटले आहे. दरम्यान, ट्रम्प म्हणाले की मी युद्धबंदीसाठी वॉशिंग्टनला परत जात नाही.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## जी-७ सोडून ट्रम्प आले

जी-७, जी-७ आणि जी-७ शेवटी कॅनडाने आपल्या पंतप्रधानांना जी-७ परिषदेचे निमंत्रण दिले. या जी-७ च्या बैठकीतून आज तातडीने लहरी ट्रम्प यांनी घाईघाईत अमेरिका गाठली. इराण आणि इस्त्रायल यांच्यातील आपापसामधला संघर्ष अत्यंत नाजूक कारणामुळे सुरू झालेला आहे. इराण सध्या अणूबॉम्ब तयार करण्याच्या जवळपास पोचलेला आहे. एक तर त्यांनी तो बनविला असेल किंवा येत्या चार आठ दिवसांमध्ये तो बनवू शकतो. अशी शंका असल्यामुळे इस्त्राईलने हल्ला केला असावा. तेरा जून रोजी इस्त्राईलने जबरदस्त हल्ला केला. इस्त्राईलला असे वाटले की आपण एका झटक्यात इराणला शरणागती पत्करण्यास भाग पाडू. रशियाच्या पुतिन यांनाही युक्रेन बाबत असेच वाटले होते. आपण युक्रेन काय फारतर दोन-चार दिवसात ताब्यात घेऊ. मात्र पुतीन यांची आजही दमछाक होत आहे. कारण आज चार वर्षे झाली आहेत. रशियाला युक्रेन सारख्या छोट्या राष्ट्रावर विजय मिळवता आलेला नाही. त्या तुलनेने चिमुकल्या इस्त्राईल ची तेवढी मोठी शक्ती असू शकत नाही. अमेरिकेत सत्तेवर हुजूर अथवा मजूर या दोन्हीपैकी कोणताही पक्ष असला. तरी अमेरिका इस्त्राईलला आपल्या दत्तक पुत्रा प्रमाणे आपल्या पप्पा पाटीर्चा म्हणजेच शस्त्राचा पुरवठा करीत असतो. अमेरिकेत असलेले बलाढ्य ज्यू उद्योगपती इस्त्राईलला कधीच वाऱ्यावर सोडू देत नाहीत. इस्त्राईलच्या हल्ल्यानंतर इराणने जो प्रतिहल्ला केला. त्यामुळे इस्त्राईलचे पंतप्रधान नेत्यान्याहू यांना बंकर मध्ये लपून बसावे लागले आहे. हे सगळ्या जगाने जाणलेले सत्य आहे. कदाचित त्यामुळेच आज ट्रम्प आपला जी-७शिखर संमेलनाचा दौरा अर्धवट टाकून परतले असावेत. त्यानंतर ट्रम्प यांनी आपले शांतीदूताचे आवरण काढून टाकलेले आहे. आता इराणने शरणागती पत्करावी. असा ट्रम्प यांचा इरादा आहे. जी-७ शिखर संमेलनातून परत येण्यापूर्वी जी-७ च्या संमेलनातूनच इराणवर शाब्दिक हल्ला करण्यात आला. इराण परमाणु बॉम्ब ठेवू शकत नाही असेही सांगण्यात आले. युद्धखोर इस्त्राईल ने नेहमीप्रमाणे इराणचे मोठे नुकसान केल्याचे दिसत आहे. पण त्याचबरोबर इराणनेही इस्त्राइलचे कमी नुकसान केलेले नाही. इस्त्राईलच्या मोसाद नावाच्या जगप्रसिद्ध हेडक्वार्टरवर तसेच त्यांच्या कितीतरी मिलिटरी बिल्डिंगवर जबरदस्त हल्ला केलेला आहे. युद्ध सुरू झाल्यावर दोन्ही पक्ष परस्परांवर जबरदस्त हल्ले करून एकमेकांना नामोहरम केल्याचे सांगत आहेत. त्यामुळे काही म्हटले तरी दोन्ही बाजूचे बरेच मोठे नुकसान झालेले दिसते. तसे पाहिले तर इराण भारताचा अतिशय जुना मित्र आहे. त्या देशाबरोबर भारताचा व्यापार रुपयांमध्ये चालत असतो. त्यामुळे भारताला इराणशी मैत्री ठेवणे भारताच्या फायद्याचे ठरते. त्याचा फायदा भारताला वेळोवेळी मिळालेला सुद्धा आहे. आता गंमत अशी आहे की, जी-७ मधील सहा देश शंभर टक्के इस्त्राईलच्या बाजूने आहेत. त्यामुळे सातव्या भारतालाही इस्त्राईल ची बाजू घेणे क्रमप्राप्त आहे. ट्रम्प आल्यानंतर आता येत्या एक-दोन दिवसात इराणवर घणाघाती हल्ले होतील. यात शंका वाटत नाही. इराणला दुबळा समजणे इस्त्राईललाही महागात पडणार आहे. इस्त्राईलने इराणचे बरेच लष्करी अधिकारी ठार केले आहेत, असे म्हणतात. इराणनेही आक्रमण करण्यास कोतेपणा केलेला दिसत नाही. पण आता शांततेचा झगा घालणाऱ्या ट्रम्पने इराणविरुद्ध आग ओकणे सुरू केले आहे. इराणची अणूकेंद्रे जमिनीच्या बरीच खाली आहेत. असे सांगण्यात येते. अमेरिकेशिवाय इतर कोणालाही त्याचा भेद घेणे शक्य होईल असे दिसत नाही. आता पुढच्या दोन दिवसात कोण कोणावर मात करू शकतो. हे दिसून येईलच. पण आता इराण मध्ये दहा हजार पेक्षा जास्त भारतीय नागरिक अडकलेले आहेत. त्यामधील पंधराशे विद्यार्थी आहेत. त्यातील बहुतेक जम्मू-काश्मीरचे आहेत. त्यांना इराणच्या बाहेर काढणे सोपे नाही. विमानसेवा बंद आहे. तेहरानकडून आर्मेनिया पर्यंत पोहोचायला अकराशे किलोमीटर पेक्षा जास्त अंतर कापावे लागते. विशेष म्हणजे तो प्रवास १३ ते १४ तासांचा असतो. तिकडे इस्त्राइलमध्येही हजारो भारतीय अडकलेले आहेत. त्यामुळे त्यांनाही बाहेर काढणे गरजेचे आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर या निरपराध भारतीयांचे आपल्या देशात परतणे गरजेचे आहे. आपल्या भारतातील त्यांच्या नातेवाईकांसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. ते कसे परततील हा फारच मोठा यक्षप्रश्न आहे. यातून सरकारलाच मार्ग काढावा लागेल, असे दिसते. येत्या दोन दिवसात परिस्थिती आणखी बिघडू शकते. तेव्हा आता या लढाईचा भारतातील जनमानसावर होणारा परिणाम आणि त्यातून निर्माण होणारी लोकभावना यावर गंभीरपणे विचार करून निर्णय घेणे. हेच आपल्यासाठी अतिशय गरजेचे महत्कार्य आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# कृषीसाठी एआय धोरण मंजूर

राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा निर्णय ■ आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुपटीने वाढ




■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत कृषीसाठी एआय धोरण मंजूर करण्यात आले.
सोबतच आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुपटीने वाढ करण्यात आली. इतकेच नाही तर ह्यात आता जोडीदारालाही मानधन मिळेल. धारावी पुनर्विकास प्रकल्पातील कंपनीला भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.
मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे. हा लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनर्वसन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार असल्याचे सरकारने म्हटले आहे. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार असल्याचा दावाही करण्यात येत आहे.

### मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे निर्णय

- ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार.
- एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाच मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार.
- मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार.
- धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार.
- केंद्र सरकारच्या WINDS (Weather Information Network Data System) प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करण्यात येणार. यासाठी महावेध प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय.
- मुंबई मेट्रो मार्ग-२अ, २ ब आणि ७ या मेट्रो प्रकल्पांकरिता एशियन डेव्हलपमेंट बँक व न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या कर्जास मुदतवाढ.
विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प आता बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता.
- आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ. ह्यात जोडीदारालाही मानधन मिळणार. गौरव योजनेमध्ये सुधारणा.
- अनिवासी भारतीयांच्या मुलांना, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार. विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनिवासी भारतीयांच्या व्याख्येत बदल. प्रवेश व शुल्क यांचे विनियमन अधिनियम २०१५ मध्ये सुधारणा.

## एअर इंडियाची लंडनवारी रद्द

## इंडिगो विमानाचे नागपूरमध्ये आपात्कालीन लँडिंग





एअर इंडियाचे विमानाची कोलकाता येथे तांत्रिक तपासणी करताना
खालच्या चित्रात नागपूर विमानतळावर उतरविण्यात आलेले इंडिगोचे विमान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई/नागपूर, दि. १६ :
तांत्रिक बिघाडामुळे एअर इंडियाचे अहमदाबादहून लंडनला जाणारे विमान रद्द करण्यात आले आहे. उड्डाण क्रमांक एआय - १५९ हे दुपारी १:१० वाजता अहमदाबादहून लंडनला जाणार होते.
१२ जून रोजी झालेल्या विमान अपघातानंतर अहमदाबादहून लंडनला जाणारे हे पहिलेच विमान होते. मिळालेल्या माहितीनुसार, उड्डाणाच्या काही तास आधी ही तांत्रिक बिघाड आढळून आला.
यापूर्वी, मस्कत (ओमान) येथून कोची मार्गे दिल्लीला जाणा?या इंडिगोच्या विमानाला बॉम्बच्या धमकीनंतर नागपूर विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करावे लागले. विमानात बॉम्ब ठेवल्याची माहिती एअरलाइन्सना मिळाली होती.
यानंतर, विमान नागपूरला वळवण्यात आले आणि ते लँड करण्यात आले. नागपूरचे डीसीपी लोहित मतानी म्हणाले की, सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे विमानातून उतरवण्यात आले आहे आणि विमानाचा शोध घेतला जात आहे. तथापि, अद्याप काहीही संशयास्पद आढळलेले नाही.
तत्पूर्वी, सोमवारी रात्री सॅन फ्रान्सिस्कोहून मुंबईला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात तांत्रिक बिघाड झाला ज्यामुळे मंगळवारी सकाळी कोलकाता विमानतळावर प्रवाशांना विमानातून उतरवावे लागले.
फ्लाईट कोलकाता मार्गे मुंबईला जात होते. बोईंग ७७७-२०० एलआर (वर्ल्डलाइनर) विमान रात्री १२:४५ वाजता कोलकाता येथे वेळेवर पोहोचले. ते पहाटे २ वाजता मुंबईला रवाना होणार होते.
विमानाच्या डाव्या इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे टेकऑफला उशीर झाला. यानंतर, सकाळी ५:२० वाजता कॅप्टनने प्रवाशांना विमानातून खाली उतरण्यास सांगितले. त्यांनी सांगितले की, उड्डाण सुरक्षितता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.
तत्पूर्वी, सोमवारी हाँगकाँगहून दिल्लीला येणारे एक विमान आणि दिल्लीहून रांचीला जाणारे एअर इंडियाचे दोन विमान परतावे लागले. त्यात तांत्रिक बिघाड झाला होता.

## भीलगावच्या कंपनीत भीषण स्फोट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
भीलगाव येथील अंकित पल्प्स अँड बोर्ड प्रायव्हेट लिमिटेड या औषधनिर्मिती कंपनीच्या युनिटमध्ये मंगळवारी भीषण स्फोट झाला. एमसीसी प्लॅन्टमधील अचानक ग्लास रियाक्टरचे (जीएलआर) झाकण उडाले. त्यातील गरम द्रव अंगावर पडल्याने एका कामगाराचा होरपळून मृत्यू झाला तर ६ कामगार जखमी झाले. यातील २ कामगार अतिशय गंभीर आहेत.

**१ कर्मचारी ठार
६ जखमी**

जखमींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. ही घटना अंकीत पल्पस ॲण्ड बोर्ड प्रा. लि. येथे घडली. या प्रकरणी नवीन कामठी पोलिसांनी नोंद केली आहे.
सुधीर काळबांडे (४२) रा. कांद्री असे मृताचे नाव आहे. जखमी मंगेश राऊत रा. हुडकेश्वर, दिनेश टेंभुर्णे, स्वप्नदीप वैद्य, गणेश वानखेडे, आशिष वडगुले आणि युनिस खान यांच्यावर उपचार सुरू असून मंगेश आणि दिनेश हे गंभीर असल्याची माहिती मिळाली आहे.
नवीन कामठी पोलिस ठाण्यातंर्गत अंकीत पल्प्स ॲण्ड बोर्ड प्रा. लि. ही कंपनी आहे. याठिकाणी औषधांचे कोटींग तयार केले जातात. कंपनीत जवळपास २५० कामगार आहेत. तीन शिफ्टमध्ये काम चालते. कंपनीत विविध सेक्शन आहेत. नेहमीप्रमाणे कामगार कामावर गेले. एमसीसी प्लॅन्टमध्ये सुधीर काळबांडे यांच्यासह मंगेश, दिनेश, स्वप्नदीप, गणेश, आशिष आणि युनिस असे ७ कामगार काम करीत होते. सकाळी ९.३० वाजता टी-टाईम झाला. कामगार चहा पिऊन पुन्हा कामाला लागले.
काही वेळातच ग्लास रिॲक्टर (जीएलआर) चे झाकण उडाले आणि त्यातील संपूर्ण द्रव कामगारांच्या अंगावर पडला. सातही कामगार होरपळले.
जीएलआरचे झाकण उडाल्याने मोठ्याने आवाज झाला. दुसऱ्या प्लॅन्टमधील कामगार धावले. लगेच त्यांनी जवळच्या खासगी रुग्णालयात जखमींना दाखल केले. उपचारादरम्यान सुधीर काळबांडे यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.
माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेश आंधळे घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर त्यांनी रुग्णालय गाठले. जखमींपैकी मंगेश आणि दिनेश यांची स्थिती नाजूक असल्याने त्यांना नागपुरातील रुग्णालयात भरती करण्यात आले. उर्वरित चार जखमींवर कामठीच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी तुर्तास आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेची गंभीरता लक्षात घेता पोलिस उपायुक्त निकेतन कदम, सहायक पोलिस आयुक्त क्षीरसागर यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली तसेच घटनेची माहिती घेतली.

विशिष्ट तापमानावर ह्यलक्वीड कंपनीच्या एमसीसी प्लॅन्टमध्ये ग्लास रियाक्टर (जीएलआर) आहे. यात विशिष्ट मटेरीअल टाकून झाकण पक्के लावले जाते. विशिष्ट तापमानावर मटेरीअल गरम केले जाते. जवळपास शंभर डीग्री असावेत. लिक्वीड पासून औषधीचे कोटींग तयार केले जाते. कामगार लिक्वीड तयार होण्याच्या प्रतीक्षेत असताना अचानक कुकरची शिट्टी उडावी त्या प्रमाणे जीएलआरचे झाकण उडाले. त्यातील गरम लगदा कामगारांच्या अंगावर पडला.

## दाऊद इब्राहिमलाही भाजप पक्षात प्रवेश देणार का?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
भाजपा स्वतःला जगातील सर्वात मोठा पक्ष समजतो. पण शक्तीशाली असल्याचा आव आणणारा पक्ष कुणालाही पक्षात प्रवेश देत आहे. ज्या व्यक्तीवर अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी संबंध असल्याचे आरोप केले, त्यालाच सन्मानाने पक्षप्रवेश दिला आहे. त्यामुळे आता भाजप दाऊदलाही पक्षात प्रवेश देणार का? असा सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला.
सुधाकर बडगुजर यांच्या भाजपा प्रवेशावरून सपकाळ यांनी भाजपावर तोफ डागली आहे.

## शरद पवार यांचेकडून अखेर एक घाव दोन तुकडे!

अजितदादांसोबतच्या युतीच्या चर्चांना पूर्णविराम



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
शरद पवार आणि अजित पवार एकत्र येण्याच्या गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा सुरू असताना शरद पवार यांनी एक घाव, दोन तुकडे करत अखेर या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.
संधीसाधूपणा करणाऱ्यांसोबत जाणार नाही, असं शरद पवार यांनी आज स्पष्ट म्हटलं आहे. त्यामुळे अजित पवार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचं एकीकरण होणार नसल्याचे स्पष्ट झाले.
पिंपरी चिंचवड येथे राष्ट्रवादीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी शरद पवार यांनी अजितदादांसोबत जाण्याच्या चर्चेवर भाष्य करत हा विषयच संपवून टाकला.
अनेक लोक वेगळ्या विचाराचे आहेत. कुणी तरी आता म्हणालं सर्वांना बरोबर घ्या. सर्वांना बरोबर घ्यायला हरकत नाही. पण सर्व म्हणजे कोण? गांधी, नेहरू यांचा विचार आणि फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार मानत असेल तर त्यांनासोबत घेणं मान्य आहे. पण सत्तेसाठी भाजपसोबत जाऊन बसायचं ही भूमिका कुणी मांडत असेल तर हा काँग्रेसचा विचार नाही. भाजपशी संबंध हा काँग्रेसचा विचार असूच शकत नाही. त्यामुळे संधी साधूपणाचं राजकारण प्रोत्साहीत करायचं नाही, असे शरद पवार म्हणाले.

## अमेरिकन कंपनीचाही तपासात सहभाग

१२५ मृतदेहांची ओळख पटली




■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १७ :
अहमदाबाद विमान अपघात, अमेरिकन कंपनीही चौकशीत गुंतलीः घटनेच्या स्थळाला भेट दिली; आतापर्यंत १२५ मृतदेहांवर डीएनए मॅच झाले आहेत, ८३ मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सुपूर्द करण्यात आले आहेत.
अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटल व्यवस्थापनाच्या मते, आतापर्यंत १२५ मृतदेहांचे डीएनए जुळले आहेत. ८३ मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सोपवण्यात आले. ज्यांना त्रास होत आहे त्यांच्यासाठी समुपदेशनाची व्यवस्था करण्यात आली आहे.
अपघातग्रस्त बोईंग विमान अमेरिकेत बनवले गेले होते. त्यामुळे, अमेरिकन एजन्सी युनायटेड स्टेट्स नॅशनल ट्रान्सपोर्टेशन सेफ्टी बोर्डने देखील अपघाताची चौकशी सुरू केली आहे. त्यांनी अपघातस्थळाला भेटही दिली.
विमान अपघात तपास ब्युरो, राष्ट्रीय तपास संस्था, ब्रिटनची हवाई अपघात तपास शाखा, यूएस फेडरल एव्हिएशन एजन्सी, बोईंग कंपनी, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय देखील चौकशी करत आहेत.
सोमवारी विमानाचा कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर सापडला. त्याआधी फ्लाइट डेटा रेकॉर्डर (एफडीआर) सापडला. बीके हॉस्पिटलच्या वसतिगृहाच्या छतावरून विमानाचा ब्लॅक बॉक्सही सापडला आहे. या सर्वांचा तपास सुरू आहे.
१२ जून रोजी अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघाताच्या काळातील एक नवीन व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावरून उडी मारताना दिसत आहेत. एअर इंडियाचे विमान विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या इमारतीवर कोसळले.
अनेक वसतिगृहांच्या इमारतींना आग लागली. व्हिडिओमध्ये दिसत आहे की, ज्या इमारतीच्या बाल्कनीतून विद्यार्थी खाली येण्याचा प्रयत्न करत आहेत त्या इमारतीच्या दोन्ही बाजूंना आग लागली आहे. विद्यार्थी चादरीच्या मदतीने चौथ्या खाली येण्याचा प्रयत्न करत आहेत.

## इस्त्रायलच्या मोसाद मुख्यालयावर इराणचा हल्ला

इराणी सैन्याच्या डेप्युटी कमांडरची इस्त्रायलकडून हत्या



■ वृत्तसंस्था
तेहरान/तेल अवीव, दि. १७ :
इस्त्रायल आणि इराणमधील संघर्ष पाचव्या दिवशीही सुरू आहे. मंगळवारी इराणने तेल अवीव येथील इस्त्रायलच्या गुप्तचर संस्थेच्या मोसादच्या मुख्यालयावर हवाई हल्ला केला. याशिवाय लष्करी गुप्तचर संस्थेशी संबंधित अमान या गुप्तचर संस्थेच्या इमारतीलाही लक्ष्य करण्यात आले आहे.
इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यात इराणचे सर्वोच्च लष्करी अधिकारी मेजर जनरल अली शादमानी यांचा मृत्यू झाला आहे. शादमानी हे इराणच्या खातम-अल-अंबिया मुख्यालयाचे म्हणजेच लष्करी आपत्कालीन कमांडचे प्रमुख होते. त्यांनी केवळ ४ दिवसांपूर्वीच हे पद स्वीकारले होते.
इस्त्रायली हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या मेजर जनरल गुलाम अली रशीद यांच्या जागी त्यांना ही जबाबदारी देण्यात आली होती. रशीद यांचे गेल्या शुक्रवारी निधन झाले. इस्त्रायली हल्ल्यात आतापर्यंत २२४ इराणी नागरिक ठार झाले आहेत, तर १,४८१ जण जखमी झाले आहेत. त्याच वेळी, इस्त्रायलमध्ये आतापर्यंत २४ जण ठार झाले आहेत, तर ६०० हून अधिक जण जखमी झाले आहेत.
दुसरीकडे इस्त्रायलने इराणी सैन्याच्या डेप्युटी कमांडरला ठार केले .अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व लोकांना इराणची राजधानी तेहरान ताबडतोब रिकामी करण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की, अणु करारावर स्वाक्षरी न करण्याचा इराणचा निर्णय मूर्खपणाचा आहे.
दरम्यान, इस्त्रायल आणि इराणमधील संघर्ष पाचव्या दिवशीही सुरूच होता. सोमवारी रात्री इस्त्रायलने तेहरानवर अनेक हवाई हल्ले केले. ज्यात अनेकांचा मृत्यू झाला.

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई
(महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालयाच्या अंतर्गत)
डिप्लोमा कोर्स इन फिजीओथेरपी
डिप्लोमा कोर्स इन डायटीशियन अँड न्युट्रीशन सायन्स
डिप्लोमा कोर्स इन मेडीकल लॅब टेक्निशियन
डिप्लोमा कोर्स इन डायलीसीस टेक्निशियन
डिप्लोमा कोर्स इन पंचकर्म थेरपी
डिप्लोमा कोर्स इन नॅचरोपॅथी अँड योगीक सायन्स
कालावधी : २ वर्ष | पात्रता : १०वी पास | माध्यम : मराठी/इंग्रजी
योगा अँड नॅचरोथरेपी
ऑपरेशन थिएटर टेक्निशियन
रेडीओलॉजी टेक्निशियन
डायलीसीस टेक्निशियन
कालावधी : १ वर्ष | पात्रता : १० वी पास | माध्यम : मराठी/इंग्रजी
आय.सी.यु. टेक्निशियन
कालावधी : ६ महिने | पात्रता : १० वी पास | माध्यम : मराठी/इंग्रजी
हेल्थ अँड सॅनिटेशन ऑफीसर
कालावधी : ६ महिने | पात्रता : कोणत्याही शाखेची पदवी | माध्यम : मराठी/इंग्रजी
महात्मा फुले पॅरामेडिकल कॉलेज, अकोला
सिद्धिविनायक हॉस्पिटलच्या बाजूला, नवीन बस स्टँडच्या मागे, अकोला.
फोन : 0724-2415544 मो. : 9422155168 / 9422163910 / 9372163910

# एक लाखाच्या जाळीने वाचवला ६० जणांचा जीव

## कुंडमळा पूल अपघात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर प्रसिद्ध घोरवडेश्वर डोंगराजवळील शेलारवाडी परिसरात इंद्रायणी नदीच्या तीरावर कुंडमळ्याला जाण्यासाठी ३५ वर्षांपूर्वी साकव पूल टाकल्याने संबंधित परिसरातील ग्रामस्थांचा १५ ते २० किलोमीटरचा फेरा वाचला होता.

परंतु मागील चार ते पाच वर्षांत रील्स, सेल्फी व्हिडिओमुळे पर्यटकांचा ओघ अचानक वाढत गेला आणि निसर्गरम्य परिसरात हुल्लडबाजीला उधाण आले. ५० ते ६० फूट खोल रांजणखळगे असलेल्या या परिसरात पाण्याचा अंदाज न आल्याने दरवर्षी १० ते १५ जणांना स्वतःचा जीव गमवावा लागत आहे.

परंतु त्यापासून कोणताही बोध न घेता पर्यटक मोठ्या संख्येने सुट्टीच्या दिवशी कुंडमळा येथील जीर्ण पुलावर जमत असल्याने पुलाची क्षमता संपुष्टात आल्याने पूल हलण्यास सुरुवात झाली होती. ही परिस्थिती ओळखून अडीच महिन्यांपूर्वीच धोकादायक पुलावर रोटरी क्लब ऑफ पिंपरीने १ लाख रुपयांचा खर्च करून तारेची जाळी बसवली होती आणि तीच जाळी रविवारी झालेल्या दुर्घटनेवेळी देवदूत बनल्याने ५० ते ६० जणांचा जीव वाचू शकल्याची भावना स्थानिक ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

### रील, सेल्फीच्या नादात दरवर्षी कुंडमळ्यात बुडतात १० ते १५ जण



बारा महिने पाण्याने दुथडी भरून वाहणारे इंद्रायणी नदीचे पात्र मागील ८ दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने ओव्हरफ्लो झाले आहे. नदीपात्रातच एका बाजूला वसलेल्या कुंडादेवी मंदिराच्या बाजूला एक बंधारा बांधला असून त्यावरून पाण्याच्या खाली रांजणखळग्यात पडणारे लोट आणि त्यानंतर खडकाच्या वाटेतून मार्ग काढत खळखळून वाहणारे पाणी व पांढराशुभ्र फेस हे दृश्य पर्यटकांना भुरळ घालते.

रोटरी क्लब पिंपरीच्या पदाधिकारी रूपाली तांबे म्हणाल्या, कुंडमळा परिसरात सातत्याने अपघाताच्या घटना होऊ लागल्याने रोटरी क्लबने या ठिकाणी रेस्क्यू साहित्य मागील वर्षी उपलब्ध करून दिले होते. परंतु संबंधित पुलावरून जाताना जाळी नसल्याने तो धोकादायक वाटला. आरसीसी व रोटरी क्लब ऑफ पिंपरीने १ लाख रुपये खर्च करून पुलास जाळी बसवली आणि तीच कामी आली.

## नीति आयोग उद्योगपतींची रखेल...

### शेतकरी नेते राजू शेट्टी यांचा गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :



शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी निती आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. निती आयोग उद्योगपतींची रखेल असल्यासारखे वागत असल्याचे राजू शेट्टी म्हणाले.

जीएम उत्पादन आणि संशोधनास भारत सरकारने बंदी घातलेली आहे. मात्र दुसरीकडे नीती आयोगाने अमेरिकेत उत्पादित झालेल्या जीएम उत्पादित सोयाबीन, मक्का आणि कृषी उत्पादित पदार्थांवरील आयात कर कमी करून आयात करण्याचा सल्ला दिला आहे. यावरुन राजू शेट्टी यांनी निशाणा साधला आहे.

या निर्णयामुळे कृषिप्रधान भारत देशातील सोयाबीन, गहू, भात, मका उत्पादित शेतकऱ्यांवर संकट येणार असल्याचा दावा त्यांनी केला आहे. शेतकऱ्यांची राख रांगोळी करून सोळा लाख कोटींचे कर्जे राइट ऑफ करणाऱ्या उद्योगपतींचे उत्पादने निर्यात करण्यासाठी देशाचे नीती आयोग काम करत असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे.

नीती आयोगाने अमेरीकेत उत्पादित झालेल्या जीएम उत्पादित सोयाबीन, मक्का व कृषी उत्पादित पदार्थांच्या वरील आयात कर कमी करून आयात करण्याचा सल्ला दिला आहे. यामुळे सोयाबीन, गहू, भात व मक्का उत्पादक शेतकऱ्यांवर संकट येणार आहे. देशभरातील शेतकऱ्यांची राखरांगोळी करून १६ लाख कोटीची कर्जे राइट ऑफ करणाऱ्या उद्योगपतींची उत्पादने निर्यात करण्यासाठी देशाचे निती आयोग या देशातील उद्योगपतींची रखेल असल्यासारखे वागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांची नातसून भाजपमध्ये प्रवेश



**सांगली:** माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या नातसून जयश्री पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. यामुळे कॉंग्रेसला मोठा धक्का बसला आहे. जयश्री पाटील या अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला असून यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

जयश्री पाटील या जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपाध्यक्षा असून, माझी मंत्री मदन पाटील यांच्या पत्नी आणि खासदार विशाल पाटील यांच्या वहिनी आहेत. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जयश्री पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली, यावेळी दोघात चर्चा देखील झाली व त्यानंतर जयश्री पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी जयश्री पाटील या अधिकृतपणे पक्षप्रवेश करणार असल्याची माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. विधानसभा निवडणुकीत जयश्री पाटील यांनी बंडखोरी करत निवडणूक लढवली होती. त्यानंतर कॉंग्रेस पक्षाकडून जयश्री पाटील यांना निलंबित करण्यात आले होते. आता जयश्री पाटील कमळ हाती घेत भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

## नवी मुंबईत पावसामुळे दाणादाण



**मुंबई :** मुसळधार पावसामुळे नवी मुंबई व उल्हासनगरमध्ये दुर्घटना घडल्या आहेत. नवी मुंबईत वाशी प्लाझा या कमर्शियल सोसायटीची भिंत पडल्याने १० ते १५ दुचाकी आणि एका टेम्पोचे नुकसान झाले. एक व्यक्ती या भिंती शेजारील उतरत होता, तितक्यात मागून ही भिंत खचली. नशीब बलवत्तर होते, म्हणून व्यक्तीचा जीव वाचला. दुसरीकडे, उल्हासनगरमध्ये पूल कोसळल्याने सुमारे ५०० घरांचा येण्या-जाण्याचा मार्ग बंद झाला आहे.

वाशी हायवेला लागून असलेल्या वाशी प्लाझा कमर्शियल सोसायटीजवळ सकाळच्या सुमारास भिंत कोसळली. पावसामुळे नाल्यालगतची माती खचल्याने ही घटना घडली. पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दहा ते पंधरा दुचाकी आणि एका टेम्पोवर माती व ढिगारा कोसळून वाहने दबली.

दुसरीकडे, उल्हासनगरच्या कॅम्प क्रमांक ५ येथील गणेश नगर भागात असलेला नाल्यावरचा पूल अचानक कोसळला. एक तरुणी या दुर्घटनेत थोडक्यात बचावली. या पुलाचा वापर गणेश नगर परिसरातील सुमारे ५०० हून अधिक घरांना ये-जा करण्यासाठी होत होता. परंतु, आता पूल कोसळल्याने घरांचा येण्या-जाण्याचा मार्ग बंद झाला असून, नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

## मैत्रिणीची छेड : मित्राचा खून

**पुणे :** मैत्रिणीची छेड काढल्याने झालेल्या वादातून मित्राच्या डोक्यात दगड घालून खून करण्यात आल्याची घटना जांभूळवाडी तलावाच्या परिसरात घडली. याप्रकरणी आंबेगाव पोलिसांनी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रोहित नामदेव ढमाळ (रा. योगमुद्रा बिल्डिंग, भूमकर वस्ती, नऱ्हे, सिंहगड रस्ता) असे खून झालेल्याचे नाव आहे. सूरज गणेश सूर्यवंशी (रा. गणेश पेठ) असे आरोपीचे नाव आहे. याबाबत रोहितचा मित्र दीपक सुखदेव बंडगर (२१) याने आंबेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. दीपकने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी त्वरित गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिने यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या सूर्यवंशीचा शोध घेण्यात येत असून सहायक पोलिस निरीक्षक गोरे तपास करत असल्याचे सांगण्यात आले.

आरोपी सूरज, दीपक, रोहित हे मित्र आहेत. मैत्रिणीची छेड काढण्यावरून रोहित आणि सूरज यांच्यात वाद झाला होता. रोहित, सूरज, दीपक हे १४ जून रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास आंबेगाव परिसरातील जांभूळवाडी तलावाजवळ गेले होते. तेथे सूरज, रोहित यांच्यात वाद झाला. वादातून सूरजने रोहितच्या डोक्यात दगड घातला. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या रोहितला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## बिनपगारी फुल अधिकारी कोणी नेमला?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :




किरीट सोमय्या कुठल्या अधिकारात वर्धा उपजिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाचा ताबा घेऊन, खुर्चीत बसून अधिकार गाजवत आहे? असा संतप्त सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केला आहे. या संबंधी सपकाळ यांनी सोमय्या यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी देखील केली आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांचा एक फोटो सध्या समाज माध्यमावर व्हायरल झाला आहे. यामध्ये ते वर्धा उपजिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बसलेले दिसत आहेत. यात ते उपजिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्चीवर बसले असल्याचा आरोप होत आहे. यावरुन सपकाळ यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हा बिनपगारी फुल अधिकारी कोणी नेमला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

भाजपचे किरीट सोमय्या यांनी रोहिंग्या मुस्लिमांच्या दाखल्याच्या विरोधात मोहीम उघडली आहे. राज्यात भाजपची सत्ता असल्याने मनमानी पद्धतीने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन ते आढावा घेत असल्याचा आरोप यात करण्यात येत आहे. त्यांनी यासाठी सोमवारी वर्धा जिल्ह्याच्या उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात आढावा घेतला. या वेळी ते अधिका?यांच्या खुर्चीत बसले असल्याचा आरोप होत आहे.

या संदर्भात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, 'हा बिनपगारी फुल अधिकारी कोणी नेमला? किरीट सोमय्या कुठल्या अधिकारात वर्धा उपजिल्हाधिक-यांच्या कार्यालयाचा ताबा घेऊन, खुर्चित बसून अधिकार गाजवत आहे? सरकारने याला विशेष अधिकार दिले आहेत का? नसतील तर हे सोमय्या नावाचे सत्ताबाह्य केंद्र उखडून टाका. या बेकायदेशीर कृत्यासाठी गुन्हा दाखल करा, अशा मागणीची एक पोस्ट त्यांनी केली आहे.

उपजिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्चीत भाजपचे नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या जोर जबरदस्तीने बसून कारभार हाकत असल्याचा आरोप केला जात आहे आहे. यावरुन उबाठा गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनीही एक दिवसापूर्वी समाज माध्यमांवर पोस्ट करीत सोमय्या यांच्यावर कठोर शब्दात ताशेरे ओढले होते.

## आता गोदेवरील ४९ पुलांची मलमपट्टी



■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १७ :

महाडला २ ऑगस्टला २०१६ सावित्री नदीवरील पूल कोसळला होता. त्यानंतर नाशकातील ४९ पुलांच्या स्ट्रक्चरल ऑडिटच्या घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झालीच नाही.

आता मावळमधील इंद्रायणीवरील पूल कोसळल्यानंतर पालिकेला जाग आली असून ३६ लाख रुपये खर्चून पुलांवर मलमपट्टी करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीवर ठेवण्यात आला आहे. गंभीर म्हणजे कुंभमेळ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ११ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट न करता १४३ कोटी खर्चून पूल विस्तारीकरण करण्याचा घाट घातला जात आहे. दरम्यान, फक्त होळकर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे. पालिकेचे एक अधिकारी म्हणाले की, गाडगे महाराज पुलाला बेअरिंगच नाहीत. अवजड वाहने जात नसल्यामुळे धोका नसला तरी, नवीन कामांमध्ये पुल भक्कम करण्याची दक्षता घेणार आहोत.

गोदावरी नदीवरील होळकर, रामवाडी, लक्ष्मण पूल, रामसेतू, गाडगे महाराज, लक्ष्मीनारायण पूल, नंदिनी : सातपूर आयटीआय, मिलिंदनगर, भाभानगर, रामदास स्वामी आश्रम, वालदेवी : दोन ठिकाणी पुलाची दुरूस्ती होणार आहे.

नाशिकमध्ये बांधकाम विभागांतर्गत १६५ पूल आहेत. याची मान्सूनपूर्व तपासणी झाली आहे. त्यात कोणताही पूल धोकादायक नाही.

## १०० कोटीत सुनील शेळके आमदार!

### संजय राऊतांचा पलटवार; अजित पवारांच्या वक्तव्यावरुनही टीका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :



मावळ विधानसभा मतदारसंघातील जनतेला १०० कोटी रुपयांत विकत घेत सुनील शेळके आमदार झाला आहे. अशा एकेरी शब्दात ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सुनील शेळके यांच्यावर पलटवार केला आहे.

तर अजित पवार यांचे वक्तव्य सर्वांनी ऐकले आहे. त्यामुळे त्यांनी 'चोरून' म्हटले की, 'सोडून' म्हटले, हे सर्वांना माहिती असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. या माध्यमातून संजय राऊत यांनी अजित पवार यांच्या वक्तव्यावर देखील टीका केली आहे.

अजित पवार यांच्या विषयी चुकीचे दाखवायची कोणाची हिम्मत आहे का? असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला. धिरुभाई अंबानी या देशातील एक महत्त्वाचे उद्योजक होते. या देशातील उद्योग आणि व्यापाराला उर्जीतअवस्था देण्याचे काम धिरुभाई अंबानी यांनी केले आहे. आज त्यांच्या कंपनीचे जे साम्राज्य आहे, त्याचा पाया त्यांनीच रचला आहे. धिरुभाई अंबानी यांच्या कारखान्यावर कधीही जप्ती आली नाही. त्यांच्यामागे कधीही ईडी लागलेली नाही. त्यामुळे त्यांनी प्रामाणिकपणे काम केले असेल, अशा शब्दात संजय राऊत यांनी अंबानी यांचे कौतुक केले. त्यामुळे चोऱ्या-माऱ्या, लबड्या कोण करते आहे. लोकांना माहिती आहे. अजित पवार काय बोलले हे सर्वांनी ऐकले असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत यांनी आमदार सुनील शेळके यांच्यावर एकेरी शब्दात टीका केली. ते म्हणाले की, 'मावळच्या जनतेला विकत घेऊन तू आमदार म्हणून निवडून आला आहेस. त्यामुळे तू आम्हाला सांगू नकोस. शरद पवारांच्या पक्षात निवडून आला आणि अजित पवार यांच्यासोबत तू गेला आहे. त्यामुळे अशा धमकी आम्हाला देऊ नकोस, असेही ते म्हणाले.

## वारकऱ्यांसाठी बाजरीची भाकरी व काळी आमटीची मेजवानी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :

टाळ-मृदंगाचा गजर करत खंबाळे येथील वारकऱ्यांनी आणि ग्रामपंचायत प्रशासनाने संत निवृत्तिनाथ महाराज पालखी सोहळ्याचे उत्साहात स्वागत केले. रात्री सागर महाराज दिंडे यांचे कीर्तन झाले. वारकऱ्यांना बाजरीची भाकरी आणि भज्याच्या काळ्या आमटीचा महाप्रसाद ठेवण्यात आला होता.

संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्याची खंबाळे येथील मुक्कामाची शेकडो वर्षांपासूनची परंपरा आहे. पालखी सोहळ्याचा नाशिक जिल्ह्यातील हा शेवटचा मुक्काम, त्यामुळे पोलिस व पंचायत समिती प्रशासनाकडून वारकऱ्यांच्या स्वागतात कुठल्याही प्रकारे कसूर ठेवण्यात आली नाही. हरिनामाच्या गजरात आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या पायी पालखी सोहळ्याचे खंबाळे येथे रविवारी संध्याकाळी ७ वाजता दातली-खंबाळे वेशीवर आगमन होताच सरपंच मीननाथ डावरे, माजी सरपंच दादा आंधळे, बाळासाहेब खाडे, माधव महाराज आंधळे, केशव नाईक, पोलिसपाटील भारत बोराडे, म्हाळू आंधळे आदींनी वारीचे स्वागत केले.

## फ्लाईंग शीख मिल्खा सिंग!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जि. पुणे.
९९२२५४६२९५

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन.

१८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती.

राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते.

त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले.

१९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता.

याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत.

मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले.

ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती.

मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

## जी. पी. ॲग्रो इंडस्ट्रीजसह सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर

# मकोका अंतर्गत कारवाई करा

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १७ :

गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर मिलींग मधील प्रचंड गैरव्यवहार चव्हाट्यावर येते न येते तोच जिल्ह्यातील आरमोरी येथील जी. पी. ॲग्रो इंडस्ट्रीजचे संचालक शमशुद्दीन जमालुद्दीन जीवानी यांनी हंगाम २०२०-२१ पासुन शासनाकडून भरडाई करीता धान घेऊन उचल केलेला धान काळ्या बाजारात विक्री करीत आहे.

या कामात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना सहकार्य केले असल्याने या सर्वांवर संघटितपणे गैरव्यवहार केल्याने मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथील जी. पी. ॲग्रो इंडस्ट्रीजचे संचालक शमशुद्दीन जीवानी यांनी शासनाकडून किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेंतर्गत पणन हंगाम २०२०-२१ पासुन भरडाई करीता धान घेऊन उचल केलेला धान परस्पर काळ्या बाजारात विकत आहेत.

त्याऐवजी बाजारातील मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकारी व गुणनियंत्रण अधिकारी यांना

### किशोर कऱ्हाडेची प्रधान सचिवांकडे तक्रार

हाताशी धरून शासनाला पुरवठा करीत आहेत.या गैरव्यवहारात आदिवासी विकास महामंडळ गडचिरोलीचे प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय अहेरीचे उपप्रादेशिक व्यवस्थापक, जिल्हा मार्केटिंग अधिकारी तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी गडचिरोली हे सदर राईसमिलर्स सोबत संगनमत करून शासनाची फसवणूक करीत आहेत.

या प्रकरणात जी. पी.ॲग्रो इंडस्ट्रीजने शासनाकडून भरडाई करीता किती धान घेतले, बाजारातुन किती धान खरेदी केले व शासनाला किती तांदूळ जमा केले, खुल्या बाजारात किती धान व तांदूळ विकले तसेच भरडाई करीता एकुण किती वीज खर्च झाली याची उच्चस्तरीय सखोल चौकशी केल्यास मोठा घोटाळा उघडकीस येऊ शकतो.

सदर राईसमिलर्स शासनाची फसवणूक करून कोट्यावधी रुपयाचा गैरव्यवहार करीत असल्याने त्यांचेवर गडचिरोली जिल्हाधिकारी यांना तात्काळ जीवनावश्यक वस्तु कायद्यातील तरतुदी व्यतिरिक्त कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश देऊन या गैरव्यवहारात सहकार्य करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्यावे तसेच हे प्रकरण संघटित गुन्हेगारीत मोडत असल्याने या सर्वांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी अशी केलेल्या तक्रारीतुन मागणी केली आहे. यावर प्रधान सचिव काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

दुसरीकडे, गडचिरोली जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्यावतिने आधारभूत धान खरेदी देतानाही मोठा गैरप्रकार झाला असून, आता डीओ देतानाही तसाच घोटाळा असल्याची माहिती आहे. या प्रकरणाच्या चौकशीची मागणी होत आहे.

# जिल्ह्यातील विकासाचा 'तारा' जिल्हा बँक 'बिना सहकार नही उद्धार' झाले सफल

## सुनील फुंडे यांनी केला आपल्या काळात बँकेचा कायापालट

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १७जून:** 'बिना सहकार नही उद्धार ' या घोष वाक्याने सहकार क्षेत्रात पाऊल ठेवणाऱ्या बँकांचा इतिहास पडताळू पाहिला असता बोटावर मोजण्याइतक्या जिल्हा मध्यवर्ती बँकांनी आपली उद्धीष्ट पुर्ती गाठल्याचे दिसून येते. राज्यात आजतागायत प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँक आहे. परंतु बोटावर मोजण्याइतक्या बँकांनी बँक स्थापनेचा खरा उद्देश साध्य करून दाखविल्याचे निर्दशनास येते. काही बँका डबघाईस आल्या आहे, काही राजकीय नेत्यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी पोखरून काढले आहे, तर काही बँका संचालक मंडळानी स्वत:च्या स्वार्थासाठी मोठ-मोठी कर्ज मंजुर करून बँकेला संपवल्याचा डाव आखल्याचे दिसून येते. राज्य शासनाने सहकार क्षेत्राच्या पाया उभारण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थापना केली होती. मुळ उद्देश कृषी क्षेत्रामध्ये राज्य शासनाच्या चालविल्या जाणाऱ्या योजनासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करून आर्थीक सहाय्य देणे हा उद्देश होता. परंतु प्रत्येकच जिल्ह्यामध्ये या उद्देशाचे साफल्य झाल्याचे दिसून येत नाही.

सन १९११ मध्ये भंडारा जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थापना झाली. सुरूवातीला छोट्या स्थरावर स्थापन झालेल्या बँकेचा कारभार स्व. सखारातपंथ वझलुवार यांनी सांभाळला.




शासनाच्या उद्दीष्टपुर्तीसाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. जनतेमध्ये बँकेप्रती विश्वास निर्माण करून बँक जनतेसाठी कार्य करणारी संस्था असल्याचे दाखवून दिले.

त्यांच्या नंतर स्व. विनायकराव कोलते यांच्यापासून ते स्व. भा.दि. राहांगडाले यांच्यापर्यंत साधारण १३ सन्मानीय अध्यक्षांनी आपला कार्यकाळ गाजविला. यात स्व.जा.स.सुभेदार यांचा कार्यकाळ १९४७-४८ ते १९६४ पर्यंत राहिला. देशाच्या स्वातंत्र्याच्या काळात मा. सुभेदार यांनी जनमानसापर्यंत पोहचविण्याचे उत्तम काम केले. जिल्ह्यात महत्वाच्या ठिकाणी बँकेच्या शाखांचे विस्तारीकरण करण्यात महत्वपुर्ण कार्य केले. त्यांच्या नंतर म्हणजे १९७५-७६ ला स्व. के.बा. हेडाऊ यांच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात बँक विकासाच्या पावलावर धावत असल्याचा इतिहास आहे. सलग पाचदा अध्यक्षीयपद सांभाळतांना स्व. के.बा. हेडाऊ यांनी बँकेच्या विकासासाठी स्वत:ला झोकून दिल्याची नोंद आहे. बँकेच्या ठेवी वाढवत राज्यशासनाच्या नियमा अंतर्गत बँकेचा आर्थिक विकास घडविण्यात त्यांचा हातखंडा होता.

त्यांच्या नंतर महेंद्र गडकरी, हत्तीमारे यांच्या सारखी व्यक्तीमत्वे अध्यक्षपदावर येवून बँकेच्या इतिहासात नावारूपास आली. स्व. यादोरावजी पडोळे यांचा काळ सन १९९४ ते २००० असा राहिला. स्व. यादोराव पडोळे यांच्या काळात जिल्हा मध्यवर्ती बँक जिल्ह्यातील अग्रगण्य विकास साधणाऱ्या संस्थांमध्ये समाविष्ट झाली. त्यानंतर बँकेच्या इतिहासात जनमानसातला एक चेहरा मा. सुनील फुंडे यांचा उदय झाला. सुनील फुंडे सन २००५ पासून बँकेचे अध्यक्ष आहेत.

सुनील फुंडे यांच्या अगोदर मा. माजी आ. सेवक वाघाये यांची प्रशासक म्हणून बँकेच्या अध्यक्षपदावर नेमनुक झाली होती. हा प्रशासकीय काळ बँकेच्या इतिहासातील सर्वाधीक वाईट काळ असल्याचे निर्दशनास येते. या काळात जिल्हा मध्यवर्ती बँक कोट्यावधी रूपयामध्ये तोट्यात होती. जनतेचा विश्वास बँकेने गमावला होता. बँकेमध्ये ठेवी सुरक्षीत नाही. हि भावना वाढली होती. परंतु मा. सुनील फुंडे यांनी स्वत:च्या जिद्द , चिकाटीने बँकेचा पुर्वलौकीक जनतेला सन्मान मिळवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आणि



बँकेला पुन्हा पायाउभारणी दिली.

आज बँकेचा मुळ उद्देश 'बिना सहकार नही उद्दार' या तत्वानी जिल्हा मध्यवर्ती बँक सर्वाधीक पिक कर्ज वाटणारी वित्तीय संस्था झाली आहे. प्रत्येक वर्षी लाखों शेतकऱ्यांना हक्काने पिक कर्ज वाटून, प्रेमाने पिक कर्ज वसुली करण्याची किमया मा. सुनील फुंडे यांच्या अथक प्रयत्नाने झाल्याचे दिसून येते. सर्वाधीक शाखा वाढवण्याचा सन्मान देखील मा. सुनील फुंडे यांच्या नावावर आहे. नवल म्हणजे कोणतीही शाखा आज तोट्यात नाही. नियमीत पिक कर्ज पुरवठा, नियमित पिक कर्जाची वसुली, शाखांचे विस्तारीकरण, नार्बाडच्या अंतर्गत चोख व्यवस्थापन, प्रत्येक शेतकऱ्याला पिक कर्ज देवून आर्थीक सहाय्य देणे, राज्याच्या विकासात्मक योजनांना आर्थिक सहाय्य सदैव उपलब्ध करून ठेवणे, ठेवी वाढवीणे सोबतच बँकेतील कर्मचाऱ्यांना योग्य व्यवस्था, नवीन कर्मचारी भरती, बँकेचे आधुनिकरण, कर्मचाऱ्यांना दुखापत झाल्यास आर्थीक सहाय्य करणे, कोरोना काळात दगावलेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नोकरीसह आर्थिक सहाय्य देणे,

| वर्ष | | निव्वळ नफा |
|---|---|---|
| २००५ | — | ४४९.८१ |
| २००६ | — | ४७६.४० |
| २००७ | — | १३२०.६० |
| २००८ | — | १०१.४५ |
| २००९ | — | ४१०.८१ |
| २०१० | — | ६३५.०८ |
| २०११ | — | २३०.१८ |
| २०१२ | — | ३४२.९० |
| २०१३ | — | ४३१.९६ |
| २०१४ | — | ३४५.५८ |
| २०१५ | — | ३४९.०६ |
| २०१६ | — | २०७.९८ |
| २०१७ | — | १०१.८२ |
| २०१८ | — | २०३.९८ |
| २०१९ | — | १९२.१६ |
| २०२० | — | २४१.८० |
| २०२१ | — | २७३.२७ |
| २०२२ | — | ३१४.६६ |
| २०२३ | — | ४३६.७६ |
| २०२४ | — | ४५०.८४ |
| २०२५ | — | ४७४.७७ |

सोबतच जिल्ह्याच्या विकसात्मक कामात बँकेला सदैव तत्पर ठेवणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सदैव हक्काची वाटावी यासाठी शेतकऱ्याची बँक म्हणून नावारूपाला आणणे या सारखी उत्तम कामे मा. सुनील फुंडे यांच्याकाळात करण्यात आली आहे.

आज जिल्ह्याचे सर्वेसर्वा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते खा. प्रफुल्ल पटेल यांच्या मार्गदर्शनात मा. सुनील फुंडे बँकेला विकासाच्या मार्गावर दौडवत असल्याचे दिसून येते. जिल्ह्याच्या विकासात जिल्हा मध्यवर्ती बँकेने उत्तम कार्य करावे हिच मनोभुमीका घेवून मा. सुनील फुंडे यांचे कार्य चालू आहे. पुढेही तसे चालू राहतील यात शंका नाही. सुनील फुंडे यांनी बँकेला सहकार क्षेत्रातील विकासाचा 'लख लखता तारा' केले असे म्हणनने अतिशोक्ती होणार नाही.

# धानाची लिमिट नसल्यामुळे जिल्ह्यातील धान खरेदी बंद - खा.डॉ.प्रशांत पडोळे

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १७जून:** धानाची लिमिट नसल्यामुळे जिल्यातील धान खरेदी बंद आहे. दिनांक ३० जून २०२५ खरेदीची शेवटची तारीख असून २० टक्के खरेदी झाली आहे.

पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे ८०टक्के धान हे केंद्रावर नेऊन ठेवले असून पण त्यांची लिमिट व बारदाना अभावी खतवणी झाली नाही. यामुळे जिल्ह्यातील बरेच शेतकरी खरेदी पासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.



यावरती जिल्ह्यातील सत्ताधारी नेते मुंग गिळून बसले दिसत आहेत काँग्रेसचे सरकार असताना याच आ.परीणय फुकेंनी डिओमो च्या कार्यालयाला ताला ठोको आंदोलन केले होते आणि आपला मोर्चा कलेक्टर ऑफिस कडे वळवला होता आणि आता हेच सत्ताधारी पक्षाचे नेते बोनसच्या श्रेयवादाची लढाई लढत आहेत. शेतकऱ्यांच्या धान मोजणीसाठी काहीच बोलत नाही. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर सत्ताधारी पक्ष भाजप खूप मोठा अन्याय करत आहे. हे दिसून येत आहे. असे भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खा.डॉ.प्रशांत पडोळे यांनी सांगितले.

# भंडारा जिल्हा जेष्ट नागरिक मंडळ व्दारा जेष्ट नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिवस साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १७जून:** महाराष्ट्र जेष्ठ नागरीक महासंघ फेसकॉम मूंबई, संलग्न भंडारा जिल्हा जेष्ट नागरिक मंडळ भंडारा जिल्हा शाखेच्या विद्यमाने महाराष्ट्र शासनाचे ९ जूलै २०१८ चे शासन निर्णयानुसार १५जून, हा जेष्ट नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिवस, दि. १५. ६.२०२५ रोजी सकाळी १०.०० ते १२.३० वाजता मंडळाचे अध्यक्ष श्री. जाधवराव साठवणे यांचे अध्यक्षतेखाली तसेच श्री.हिरामण लांजेवार सचिव,श्री. अजाबराव चिचामे कार्याध्यक्ष, प्रमूख अतिथी श्री. रामभाऊजी येवले अध्यक्ष मध्यवर्ती संघटना जिल्हा भंडारा, श्री. अतुल वर्मा जिल्हा परिषद महासंघ राज्य सल्लागार, श्री. माधवराव फसाटे अध्यक्ष सेवानिवृत्त कृतीशिल अधिकारी कर्मचारी संघटना भंडारा, श्री. डॉ.श्री.संजय मानकर सल्लागार तसेच श्री. जे. आर. गणविर, श्री. पुरुषोत्तम केसलकर संचालक यांचे प्रमूख उपस्थितीत तसेच श्री.मनोहर झिंगरे, श्री. जागेस्वर साखरवाडे, श्री. पुरुषोत्तम वैद्द, श्री. बिनोदकुमार भालाधरे, सदस्य, श्री. राजेश सिंह परमार, श्री. डी. आर. नागदेवे यांचे उपस्थितीत साजरा करण्यात आला.

प्रमुख अतिथी श्री. रामभाऊ येवले यांचे हस्ते व इतर यांचे उपस्थितीत भारत मातेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

सर्वप्रथम श्री.जाधवराव साठवणे मंडळाचे अध्यक्ष यांनी उपस्थिताचे अभिनंदन केले.

हिरामण लांजेवार सचिव यांचे उत्कृष्ट संचलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

१५ जून, जेष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिवस निमित्ताने प्रमूख अतिथी रामभाऊजी येवले, अतुल वर्मा, माधवराव फसाटे, डॉं. संजय मानकर, यांनी सविस्तर मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच जे. आर. गणविर, हिरामण लांजेवार सचिव, अजाबराव चिचामे कार्याध्यक्ष, यांनी मनोगत व्यक्त करून मार्गदर्शन केले.



मंडळाचे अध्यक्ष तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष जाधवराव साठवणे यांनी १५ जून, जेष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिवस निमित्ताने मनोगत व्यक्त करून मोलाचे मार्गदर्शन केले.

उदा: जेष्ठ नागरिक यांचा विविध प्रकारे छळ होत असल्यास त्याची तक्रार जेष्ट नागरिक कक्ष , सहायक आयुक्त समाज कल्याण विभाग भंडारा सामाजिक न्याय भवन भंडारा येथे करण्यात यावी. तसेच जेष्ठ नागरिक यांनी मुलाचे नांवे प्रार्पटी करून द्यावयाची असल्यास, काही अटी टाकूनच आपली प्रार्पटी नोंदणी करून द्यावी. सेवा निवृत्ती नंतर मिळालेली पूर्ण रक्कम मुलांना न देता काही रक्कम मूदत ठेव योजनेत ठेवण्यात यावी.

**जेष्ठ नागरिक यांच्या आवश्यक मागण्या :**

**१.** जेष्ठ नागरिक यांचेसाठी मुख्याधिकारी नगर परिषद भंडारा यांनी जेष्ट नागरिक भवन सर्व सोयीनिशी बांधून दयावे. **२.**शासन निर्णय दि. ९ जुलै २०१८ नूसार समंधित सर्व विभागाकडून सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग, सामाजिक न्याय भवन भंडारा यांनी अंमलबजावणी करण्यात यावी., **३.** सिव्हील लाईन्स येथील मानकर यांचे काँलेजला लागून असलेली शासकीय जागा जेष्ट नागरिक यांचे करिता मार्निंग वॉकसाठी राखून ठेवण्यात यावी. व त्यामध्ये बैठक खुर्ची व्यवस्था करण्यात यावी.इत्यादि.

६० वर्षावरील सर्व जेष्ट नागरिक बंधू भगिनी यांनी मंडळाचे सभासद होवुन जेष्ट नागरिक मंडळ भंडाराचे प्रगतीसाठी सहकार्य करावे. असे आवाहन अध्यक्षाचे वतीने करण्यात आले.

कार्यक्रमास सर्वश्री जाधवराव साठवणे, हिरामन लांजेवार, अजाबराव चिचामे, रामभाऊजी येवले, अतुल वर्मा, माधवराव फसाटे, डॉ.श्री.संजय मानकर, प्रा. जगन्नाथ गणविर, पुरुषोत्तम केसलकर, मनोहर झिंगरे ,पुरुषोत्तम वैद्द जागेस्वर साखरवाडे, बिनोदकुमार भालाधरे, राजेश सिंह परमार, डी.आर .नागदेवे, व इतर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचलन हिरामण लांजेवार सचिव यांनी केले. उपस्थिताचे आभार श्री.पुरुषोत्तम केसलकर संचालक, यांनी मानले. चहा बिस्कीट घेवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार जिल्हा ग्राहक संरक्षण जिल्हाध्यक्ष पदी सचिन बडवाईक



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १७जून:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार चे जिल्हाध्यक्ष चरणजी वाघमारे यांच्या नेतृत्वात तुमसर येथील सचिन घनश्याम बडवाईक यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार जिल्हा ग्राहक संरक्षण जिल्हाध्यक्ष पदी नुकतीच नियुक्ती सूर्यकांत (आप्पा) गवळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार मा. मंत्री / अध्यक्ष ,राष्ट्रवादी ग्राहक संरक्षण समिती, महाराष्ट्र प्रदेश यांच्या नियुक्ती पत्र क्रमांक महा / ७० / २५, दिनांक १६.०६.२०२५ अनव्ये करण्यात आली. भंडारा जिल्ह्यातील संघटनात्मक कामाला प्रथम प्राधान्य देवून व जेष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तमरीत्या करून व पक्ष मजबूत करण्यासाठी आपण सर्वशक्तीनी समाजातील सर्व घटकांना सोबत घेवून पक्षाची ध्येय धोरणे व पक्षाचे राष्ट्रीय मा. अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे विचार जनते पर्यत पोहोचण्यासाठी काम करू असे बडवाईक यांनी म्हटले आहे.

# धरती आबाजन जातीय अभियानांतर्गत शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १७जून:** जनजातीय गौरव वर्ष २०२५ च्या निमित्याने भारत सरकारने आदिवासी समुदायांच्या सर्वांगीण विकासासाठी दोन महत्वपुर्ण आणि कालबध्द उपक्रम हाती घेतले आहेत. 'प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्यायमहा अभियान आणि धरती आबाजन जातीय ग्राम उत्कर्ष अभियान' अंतर्गत आदिवासी नागरिकांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकार कडुन व्यापक योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये १७ मंत्रालय निश्चीत करण्यात आले आहे. याउपक्रमांद्वारे 'धरती आबाजन जातीय ग्राम उत्कर्ष अभियान' अंतर्गत भंडारा जिल्हातील सहा तालुकातील १४ गावाचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये उपविभागीय अधिकारी भंडारा कार्यक्षेत्रात तालुका भंडारा मधिल रावणवाडी व पवनी तालुकातील चांदी या गावाचा समावेश आहे.

या गावामध्ये आदिवासी लाभार्थ्यांना वैयक्तिक व सामुहिक शासकिय योजना चा लाभ देण्यात येणार आहे. तेव्हा आदिवासी कुंटुबांपर्यंत आवश्यक सेवा पोहोचण्यास मदत होणार आहे. त्यामध्ये या सर्व गावाचे सर्वेक्षण अंती मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी, लाभार्थ्यांना लाभ देण्याकरीता गावपातळीवर शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. भंडारा तालुकातील रावनवाडी व पवनी तालुकातील चांदी या दोन्ही गावात एकाच दिवसी उद्या १७ जून रोजी हे शिबीर घेण्यात येणार असुन होणाऱ्या शिबीरांचा आदिवासीबांधवानी लाभ घ्यावा. सदर शिबारामध्ये सर्व शासकिय कार्यालयातील योजनाचा लाभ देण्यात येणार आहे. जसे आधारकार्ड, मतदान ओखळपत्र, जातीचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र ,उत्पन्नचा दाखला, जॉबकार्ड , रेशनकार्ड, जनधन बँकखाते, संजयगांधी योजना, श्रावणबाळ योजना, सुकन्यासमृध्दी योजना मातृवन्धन योजना, आयुष्यमान कार्ड पी.एम.किसान कार्ड, पी.एम. किसानसंमाननिधी, प्रधानमंत्री आवास योजना, वनधन विकास केंद्र, सौरउर्जा कनेक्शन, गॅसकनेक्शन, उज्वला योजना, किसानक्रेडीट कार्ड, विमा योजना, सिकलसेल अनिमीयासाठी तपासणी, मोबाईल मेडीकल युनिट, हरघर नळ योजना, सामान्य आरोग्यतपासणी ,रस्तेबांधकाम, इत्यादि. सर्वयोजनाचा लाभ एकाच वेळी देण्यात येणार आहे.

तरी या योजनाचा लाभ घेण्याकरीता गावातील आदिवासी बांधवानी मोठया संख्येने उपस्थित राहुन शिबीरामध्ये देण्यात येणाऱ्या शासकिय योजनाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी, डॉ. संजय कोलते यांनी केले आहे.

# शिक्षण विभागाच्या शासकीय प्रपत्रकातून शिक्षकांना २३ पानांतून दीडशे सूचना

## विद्यार्थी सुरक्षा उपाययोजनांवर शासन आक्रमक...

**शाहेद कुरेशी**

**भंडारा ,दि. १७जून:** राज्यात शाळा सुरू होण्यास अवधी आहे.असे असले तरी शाळा उघडण्याचे दिवस जसजसे जवळ येत आहे तसतसे शासनाची शिक्षण विभागकडून शिक्षकांवर शासकीय प्रपत्रकाची गारपीट सुरू झालेली आहे. शाळा स्तरावर शासकीय पत्रक एकावर एक धडकत असल्याने या पत्रकांमुळे शाळेतील शिक्षक पावसाळ्याने वेग घेण्या पूर्वीच ओले चिंब, गार गार झाले. पावसाळ्याचा ऋतू सुरू झाला खरा परंतु, निसर्गा कडून अद्या-पही गारपीट झाली नाही. मात्र शासनाच्या शिक्षण विभगाकडून शिक्षकांवर शासकीय प्रपत्राची गारपीट होत असल्याने 'सुद्ध्या नकोत पण पत्रक आवर' म्हणायची वेळ शिक्षकांवर येऊन ठेपली. सध्या कोणत्या सुडाचा बदला शिक्षण विभाग शिक्षकांकडून घेत आहे इथपर्यंत डोक्यावर हात ठेवून विचार करायची वेळ शिक्षकांवर आली आहे. आता तर चक्क शासनाने २३ पाना 'तून १६ मुख्य सूचनासह जवळपास लहान मोठ्या अशा दीडशे सूचनांचे प्रपत्रक शाळांना पाठवून शिक्षण विभागाने शिक्षकांची चांगलीच शासकीय हजामत केली. विद्यार्थी सुरक्षा उपाययोजना संदर्भात या सूचना असून मुख्य १६ सूचनांसह जवळपास १५० सूचनांचा समावेश या शासकीय प्रपत्रकात आहे. या सूचनांचे पालन करून वेळोवेळी शिक्षण विभागाने दिलेल्या ॲपवर माहिती भरून द्यावयाची आहे.

एका मुख्य सूचनेसह त्यात लहान लहान १० ते १५ सूचनांचा समावेश आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी किंवा शाळा सुरू झाल्यानंतर १०० ते १५० सूचनांचे शाळा प्रशासनाकडून कितपत पालन होईल ती वेळ सांगेल. परंतु, या पत्रकाने पावसाळी ऋतुत मात्र शिक्षकांना शिक्षण विभागाने शिस्तीत झोडपून काढले. लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण व्हावे याकरिता संरक्षण कायदा २०१२ तयार करण्यात आला. या कायद्यात विविध तरतुदीचा समावेश करण्यात आला होता. त्या तरतूदीची अंमलबजावणी विद्यार्थी सुरक्षा उपाययोजना अंतर्गतकरावयाची आहे. तसे पत्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून शिक्षकांना निगर्मीत करण्यात आलेले आहेत. राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व शाळा व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये तक्रार पेटी बसविणे, सीसीटी कॅमेरे बसविणे, सुलभ शौचालय मध्ये स्वच्छता आणि सुरक्षा ठेवणे, शाळांनी सखी सावित्रीचे गठन करणे यासारख्या शेकडो सूचनांची फटकेबाजी शैक्षणिक क्रीडांगणावर शिक्षण विभागाने केलेली आहे.

**अधिकारी आणि पदाधिकारी देणार शाळा भेटी**

शाळा सुरू होण्याची संभाव्य तारीख निश्चित नसली तरी या दरम्यान पदाधिकारी, अधिकारी यांना शाळांना भेटी द्याव्या लागणार आहेत.

या भेटीतून शाळा प्रशासनाकडून शासनाने दिलेल्या २३ सूचनांचे पालन झाले की नाही याची माहिती घ्यावी लागणार आहे. त्या संदर्भात पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांना तसे शाळा भेट प्रपत्र भरून द्यावी लागणार आहे. शाळा भेट प्रपत्र २०२५-२६ भरून देतांना त्यात शाळा भेटीचा दिनांक, भेट देणाऱ्या अधिकारी पदाधिकाऱ्यांचे नाव, शाळा, तालुका आणि केंद्राचे नाव, भेट देणाऱ्या अधिकारी आणि पदाधिकारी यांचा अभिप्राय आणि इतर उल्लेखनीय बाबीचा समावेश या भेट प्रपत्रात आहे. त्यानंतर भेट देणाऱ्या पदाधिकारी, अधिकारी आणि शाळेच्या मुख्याध्यापकाची स्वाक्षरी या शाळा भेट प्रपत्रावर असणे आवश्यक आहे. सदर शाळा भेट प्रपत्रात मोफत पाठ्यपुस्तक व गणवेश, शाळा व्यवस्थापन समितीने वेळोव-'ळी घेतलेल्या सभा, शाळा स्वच्छता निर्जुतीकीकरण व शाळा सुरक्षा या संदर्भात माहिती भरून घ्यावयाची आहे.

# शरदचंद्र पवार साहेबांचे विचार घराघरापर्यत पोहोचवून पक्ष बळकट करा - माजी आ.चरण वाघमारे

## भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १७जून:** भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक गुंज हॉटेल तुमसर येथे पार पडली .

बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार चरण वाघमारे यांनी जिल्हा पदाधिकारी तालुका पदाधिकारी यांनी पक्षाकरिता वेळ देऊन शरद चंद्र पवार साहेबांचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवून पक्ष बळकट करण्याचे आवाहन केले.

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश स्तरावरून प्राप्त सूचनेनुसार भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक नुकतीच गुंज हॉटेल तुमसर येथे पार पडली.

महाराष्ट्र राज्याची सध्याच्या राजकीय परिस्थिती वर चर्चा करताना महायुती सरकारमधील राज्यकर्त्यांनी निवडणुकीच्या काळात निवडणुकीला सामोरे जातांना जाहीरनामा प्रकाशित करून सर्वसामान्य शेतकऱ्यांचे ,महिलांचे मत मिळवण्याचा गोरख धंदा केला. पण जी आश्वासने निवडणुकीच्या काळात दिली त्याची पूर्तता अद्याप पर्यंत झाली नाही. शेतकरी देशोधडीला लागला असताना राज्य सरकारने धानाला बोनस जाहीर केला परंतु अद्यापही खरीप हंगामाची सुरुवात होऊनही शेतकऱ्यांच्या खात्यात बोनसची रक्कम जमा केली नाही.

कर्जमाफीवर राज्यकर्ते बोलायला तयार नाही.दुसरीकडे निराधार महिला, संजय गांधी श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांना आठ ते नऊ महिन्यापासून मानधन देऊ शकले नाही, त्यामुळे शासन किती दुर्लक्ष करीत आहे ? याचा अनुभव लक्षात घेता राज्य सरकारचे धोरण सर्वसामान्यांच्या हिताचे नसून मारकच असल्याचे वक्तव्य सुद्धा माजी आमदार चरण वाघमारे यांनी बैठकीतून केले.

त्यामुळे शरदचंद्र पवार साहेबांचे विचार घरोघरी पोहोचवून येणाऱ्या काळात भंडारा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष मोठा कसा करता येईल ? याचा सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विचार करून पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्याचे आवाहन सुद्धा माजी आमदार चरण वाघमारे यांनी केले आहे

बैठकीला महिला जिल्हाध्यक्ष राणीताई ढेंगे, सरचिटणीस विनोद वटी, गौरव नवरखेले, हरिश्चंद्र धकाते,विजयजी रहांगडाले, केबी चौरागडे, सेवक चिंधालोरे, रीनाताई माटे,हरिश्चंद्र बंधाटे, चंद्रशेखर भिवगडे, तरुण लांजेवार,गितेश ठोंबरे,आदित्य पंधरे, डॉ मिलिंदजी येरणे, अँड साधनाताई येरणे, योगेश रंगवानी, हंसराज आगाशे,छोटूभाऊ तुरकर, अनिल जीभकाटे, प्रमोद



घरडे,मेहताबसिंग ठाकूर, अनिल न्यायखोर,बालचंद बोंद्रे, उर्मिलाताई आगाशे, सचिन बडवाईक,उषाताई रामटेके, शाहीना शेख,रत्नाकर थाटकर,हेमराज नागफासे सर, मुनेश्वर टिचकुले, महादेवजी बुरडे, अर्जुन उईके, विजय जाधव, गणेश ठवकर,नंदू हटवार, कृष्णा बनकर, अविनाश उपरीकर, वसंताजी लांबट, सचिनजी बडवाईक, नानाभाऊ गभणे,सीमाताई गोपाले,हरिधर गोंडाने, हेमंत मलेवार, अण्णा मोटघरे, डूलीचंद बिसणे, रवींद्र तिडके, पांडुरंग कंगाले, राहुल बडवाईक, विनायक मारवाडे, संजय मरसकोले,संजय बडवाईक , गोविंद पाने, राकेश हटवार योगेश सेलोकर, बाबुलाल तुरकर, रवींद्र तिडके, मुकेश वाघमारे, विनोद उपरीकर, सुरेंद्र बोरकर, रामेश्वर भुसारी, मयूर ढगे, मोहित झाडे, देवजी केवट, ओंकार भट, प्रवीण कहालकर, डुलिचंद देशमुख, रमेश नागपुरे, निखिल खोब्रागडे, विनोद साठवणे, वसंता लांबट, देवा नागपुरे, शालू वाहणे तसेच जिल्ह्यातील समस्त पदाधिकारी उपस्थित होते.

# शिक्षणाचे व्यापारीकरण व भरमसाठ भाववाढीमुळे ग्राहकांची लूट

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. १७जून:** तालुक्यासह - सर्वत्र खुल्या बाजारात लहान मोठ्या वस्तुंच्या किंमती ठरविण्यावर ग्राहकमंच व संबंधित प्रशासकीय अधिकारी - यांचे कुणाचेही नियंत्रण नसल्याने व्यापारी मनमर्जीने शिक्षण, - मेडिकल स्टोर्स, कापड, हार्ड वेअर, जनरल आदी जीवनावश्यक वस्तूंचे भरमसाठ किंमत वाढवून बाजारात विक्री करीत आहेत. यामुळे ग्राहकांची भयावह लूट करीत असल्याचे आढळून येत आहे. तेव्हा संबंधित विभागीय अधिकारी यांनी तात्काळ दखल घेऊन कार्यवाहीस प्राधान्य द्यावे असे शेकडो सुजाण नागरिकांनी माहिती देतांना मागणी केली आहे.

महागाईच्या भस्मासुरामुळे आत्महत्याचे प्रमाण वाढलेले ग्राहकमंच नाव मोठे-दर्शन खोटे, निद्रावस्थेत कार्यवाही शून्य ग्ग्रहक दिवस सुध्दा मानविला जातो. मात्र आजपर्यंत ग्राहकांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न किंवा त्यावर विचार तरी कुणी केला आहे काय? हा मोठा गहन प्रश्न जनमानसात विचारला जात आहे. त्यामुळे खुल्या बाजारातील व्यापारी शिक्षण, जिवनावश्यक वस्तू खाद्यपदार्थ, कामह, जनरल, किराणा, हसविअर, औषधी, कृषी साहित्य, अवजारे, बियाणे यासारखे अनेक वस्तूच्या किमती मनमर्जीने वाढवून बाजारात विक्री केली आत आहे. यामुळे गर्भ श्रीमंत आणि गले लठ्ठपगार असणारे कर्मचारी यांना त्याचा परिणाम जाणवत नसला तरी मात्र सर्वसामान्य, गरीब, शेतकरी, शेतमजूर यांना जीवन जगणे कठीण इराले आहे. त्याच्या मुलाबाळांना शिक्षण देण्याची गंभीर बाब निर्माण होऊन त्यांचे भविष्य धोक्यात आले आहेत. तेव्हा शासन प्रशासनाने विशेष बाब म्हणून तात्काळ दखल घेणे काळाची गरज आहे आणि संबंधित विभागीय अधिकारी यांनी नागरिकांच्या

समस्या सोडवण्या संबंधाने कार्यवाहीस प्रधान्य द्यावे असे शेकडो सुजान नागरिकांनी माहिती देताना मागणी केली आहे हे विशेष.

# सुधाकर ते सुधारक?



**मुंबईतल्या १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी सलीम कुत्तासोबत ठाकरे गटाच्या शिवसेनेचे सुधाकर बडगुजर यांनी पार्टी केल्याचा आरोप भाजप आमदार नीतेश राणे यांनी विधिमंडळात केला होता. या पार्टीचे फोटोही सभागृहात दाखवले होते. विशेष म्हणजे या आरोपानंतर तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन केल्याची घोषणा केली होती. आता त्याच बडगुजरांना भाजपने पायघड्या टाकल्यात. नीतेश राणे त्यासाठी हिंदुत्वाचा मुलामा देत आहेत.**

-------------

भाजपने या सुधाकरला सुधारक करण्याचा विडा उचलला आहे. उद्या सलीम कुत्ता सुद्धा भाजपसोबत येऊन मॅटर क्लोज करू शकतो, अशा शब्दांत ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी भाजपला खडेबोल सुनावलेत.

सुधाकर बडगुजर १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपींसोबत काय करत होते? असा प्रश्न दोन वर्षांपूर्वी भाजप आमदार नीतेश राणे यांनी विधिमंडळात उपस्थित केला होता.

बॉम्बस्फोटातील आरोपींसोबत सुधाकर बडगुजर यांनी पार्ट्या झोडल्या आहेत, असा आरोप तो फोटो दाखवत नीतेश राणेंनी करत गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे चौकशीची मागणी केली होती. त्यावर मंत्री दादा भुसे आणि भाजप आमदार आशिष शेलार यांनीही विधिमंडळात जोरदार आरोप करत राणेंची पाठराखण केली होती.

**फडणवीसांची घोषणा**

नीतेश राणे यांच्या आरोपानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे प्रकरण अतिशय गंभीर असल्याचे म्हटले होते. तसेच फडणवीस यांनी या विषयावर एसआयटी चौकशी करण्याची घोषणा केली होती.

यावेळी ते म्हणाले होते की, बॉम्ब स्फोटातल्या आरोपीसोबत पार्टी करण्याचा विषय अतिशय गंभीर आहे. देशाचा शत्रू असलेल्या दाऊदचा जवळचा सहकारी सलीम कुत्ता हा खरे तर पॅरोलवर बाहेर होता. त्यामुळे त्याला पार्टी देखील करता येत नाही. त्यामुळे त्याने पार्टी करायची आणि कोणीतरी जाऊन त्या पार्टीत नाचायचे हा गंभीर प्रकार आहे.

१९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी सलीम कुत्ता सोबत या संबंधीत व्यक्तीचा काय संबंध आहे, अशी पार्टी करण्यात कोण-कोण होते, त्याला कोणाचा वरदहस्त होता का? हे तपासण्यात येईल. बॉम्बस्फोटातील आरोपीसोबत कोणी पार्टी करत असेल तर त्याचा अर्थ संवेदना मेल्यात असा होतो. म्हणून मी सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की एसआयटीच्या माध्यमातून ठरवून दिलेल्या वेळेत या प्रकरणाची तपासणी होईल. तसचे दोषींवर कारवाई केली जाईल, असे आश्वासन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिले होते.

**नीतेश राणेंचा सूर बदलला**

दरम्यान आता नीतेश राणे यांचा सूर बदलला आहे. ते आज बोलताना म्हणाले की, हिंदुत्त्वाचा धागा घेऊन आमच्यासोबत कोणीही येत असेल तर आम्ही त्याचे स्वागतच करणार.

बडगुजर आता १०० टक्के भगवाधारी झाले आहेत. त्यामुळे ते आमच्यासोबत येणार असतील त्यांचे स्वागतच आहे. बडगुजर यांचा हिंदुत्वाच्या दिशेने जोरदार प्रवास सुरु आहे. त्यांचा मुलगा काही दिवसांपूर्वी आम्ही काढलेल्या सकल हिंदुत्व मोर्चात आघाडीवर होता. त्यामुळे आता ते येत असतील तर हरकत नाही.

**सुधाकर ते सुधारक...**

ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी नितेश राणे यांच्या या भूमिका बदलीवर टीका केली आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले, सलीम कुत्ताच्या पार्टीतला बडगुजरसारख्या पापी जिवातम्यांचा हैदोस बघून भाचा नितेश राणेचे पित्त खवळले होते. यावर ५२ कुळी उपाय म्हणून तत्परता दाखवत सुधाकरला सुधारक ठरवण्याचा विडा हाती घेतला. बोले तो भिडू, यही बीजेपी का हिंदुराष्ट्र है, कल को सलीम कुत्ता भी आकर मॅटर क्लोज कर सकता है.

**निर्लज्ज लोकांचा भरणा**

संजय राऊत यांनी देखील टीका केली आहे. ट्विट करत ते म्हणाले, या सगळ्यांना मुंबई बॉम्ब स्फोटातील आरोपी करायला हवे! गृहमंत्री फडणवीस तुमचे लोक त्या सलीम कुत्ताला उगाच बदनाम करीत होते. भारतीय जनता पक्ष हा निर्लज्ज लोकांचा भरणा असलेला पक्ष आहे, देशभक्ती, हिंदुत्व वगैरे सगळे ढोंग आहे.

**बावनकुळेंचे कानावर हात..**

सुधाकर बडगुजर यांच्या भाजप पक्षप्रवेशावर प्रतिक्रिया देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल कुठलीही माहिती माझ्याकडे नाही. स्थानिक नेतृत्व, स्थानिक आमदार आणि खासदार यांचे एकमत झाल्याशिवाय आमच्याकडे प्रवेश होत नाही. तसेच त्यांच्या पक्षप्रवेशाबद्दल मला कुठलीही माहिती नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट म्हटले आहे.

पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले, नाशिकचे स्थानिक पदाधिकाऱ्यांचा या पक्षप्रवेशाला विरोध आहे निवडणुकीच्या राजकारणात जेव्हा आपण एकमेकांच्या विरोधात लढतो आणि आता निवडणुकीला फक्त सहा महिने झाले आहे. त्यामुळे विरोधाची भावना असते आणि त्यामुळे नाशिकमध्ये त्यांना विरोधाची भावना आहे.

त्याबद्दल माझ्याशी कुठलीही चर्चा झालेली नाही मुंबईत गेल्यानंतर चर्चा झाली तर हा विषय पुढे जाईल मात्र आतापर्यंत या संदर्भात माझ्याकडे कुठलीही माहिती नाही.

**सुधाकर बडगुजरांच्या भावना**

सुधाकर बडगुजर म्हणाले, २०१७ ते २०२२ हा पाच वर्षांचा कालावधी सोडला तर आता प्रशासकीय राजवट आहे. या राजवटीत जी कामे होत आहेत, ती प्रशासनामुळे सुरू आहेत. कामे होत असताना प्रशासनावरती लोकप्रतिनीधींचा अंकूश असला पाहिजे.

निवडणुका येऊ घातलेल्या आहेत. या निवडणुकीमध्ये भाजपला मोठे यश मिळावे यासाठी मी भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. ज्या पक्षामध्ये आदरातिथ्य मिळते त्या पक्षामध्ये जाणे कधीही उचित आहे.

ज्या पक्षामध्ये मी १८ वर्षे काम केले त्यांनी माझा अनादर केला. मला पक्षातून हाकलण्याची भूमिका त्यांनी घेतली. माझी काय चूक होती तेही मला कळलेले नाही, असे म्हणत त्यांनी आपल्या मनातील भावना व्यक्त करत शिवसेनेवर नाराजी व्यक्त केली आहे.

ज्या पक्षामध्ये आदरातिथ्य मिळते त्या पक्षामध्ये जाणे कधीही उचित, असे जरी सुधाकर बडगुजर यांनी म्हटले असले तरी भाजपच्या अनेक नेत्यांकडून त्यांच्या पक्षप्रवेशाला विरोध आहे.

भाजपच्या स्थानिक आमदार सीमा हिरे यांनी देखील सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाला विरोध केला आहे. त्यातच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील पक्षप्रवेशाची आपल्याला काही कल्पना नसल्याचे म्हटले आहे.

■ ■ ■

# युवकांनो स्वतःच्या भविष्याचा विचार करा...

आजकाल स्वतःच्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार करणारे लोक प्रत्येक समाजात संख्येने खूप वाढले आहेत. विशेष करून युवा पिढीला राजकीय नेत्यांचे खूप आकर्षण वाटत आहे. त्यांना त्यांचे कट्टर कार्यकर्ते म्हणून मिरवायची फार विचित्र सवय लागली आहे.

आजकालचे युवक शिक्षण शिकायचे सोडून, नियमित कॉलेज करायचे सोडून आणि आपले जीवन ध्येय गाठायचे सोडून राजकीय नेत्यांच्या मागेपुढे फिरण्यात आघाडीवर आहेत. शाळा व कॉलेजला दांड्या मारून आणि प्रामाणिकपणे अभ्यास करायचा सोडून राजकीय नेत्यांचे बगलबच्चे म्हणून मिरवण्यात काय फायदा? स्वतःच्या भविष्याचा विचार करायचा सोडून, राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार करणे खरंच योग्य आहे का? तुम्हीच सांगा मंडळी. मला तर हे योग्य वाटत नाही.

आई वडील मोठ्या आशेने आपल्याला शिक्षणासाठी शहरी भागात पाठवतात. शिक्षणासाठी आपल्याला खूप खूप पैसा पुरवतात. त्यांना सुद्धा वाटते की आपला मुलगा खूप खूप शिकून नोकरीला लागेल. एक दिवस आपले स्वप्न साकार करेल आणि आपल्याला सुखाचे दिवस दाखवेल. म्हणून ते मोठ्या आशेने जीवन जगत असतात. त्यांना काय माहित? आपला मुलगा शिक्षणाच्या नावाखाली राजकारणाचे धडे गिरवत आहे का राजकीय पक्षाचा कार्यकर्ता बनून सतरंज्या उचलत आहे.

मान्य आहे की, आपला नव्याने कॉलेजमध्ये प्रवेश झाला की, आपण थोडे दिवस नियमित कॉलेज करतो. मन लावून अभ्यास देखील करतो पण नंतर काही दिवसांनी तेथील राजकीय वातावरण पाहून आणि तशा मित्रांच्या संगतीत राहून आपण सुद्धा एखाद्या राजकीय नेत्याच्या पक्षात प्रवेश करतो आणि लगेच त्या पक्षाचा नेता आपला राजकीय गुरु बनतो. आपण त्याचे शिष्य बनतो.

नंतर गुरु-शिष्याचे नाते हे अतुट बनते. तो नेता आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनतो. आपल्याला कोणते तरी गल्लीतील साधे पद देऊन खुश करतो. आणि स्वाथार्साठी आपला पुरेपूर वापर करून घेतो. पण या युवकांना मात्र आपण तालुक्याचा नेता झाल्यासारखे वाटते. आणि लगेच त्याचे राहणीमान बदलते. नेत्यासारखे कपडे आणि नेत्यासारखी हेअर स्टाईल ठेवून हे युवक हे पद घेऊन गावभर मिरवतात.

बॅनरबाजी व पेपरबाजी करून स्वतः स्वतःच्या पदाचा प्रचार करतात. आपल्या नावापुढे त्या पदाचा उल्लेख मात्र आवर्जून करतात. त्यांना तो नेता प्राणप्रिय वाटायला लागतो. हे युवक त्या नेत्यासाठी जीव द्यायला पण मागे पुढे पाहत नाहीत. म्हणजे यांना स्वतःच्या भविष्यापेक्षा नेत्याच्या भविष्याची चिंता अधिक असते. त्यांना स्वतःच्या भविष्याचे काहीही देणे घेणे राहत नाही.

पण राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार मात्र त्यांना रात्री सुखाची झोप सुद्धा येऊ देत नाही. एवढी राजकीय नेत्यांच्या भविष्याची चिंता त्यांना लागलेली असते. या लोकांना स्वतःच्या परिस्थितीची जाण नसते, स्वतःच्या भविष्याचा वेध नसतो, आपण काय करत आहोत याचे भान देखील नसते आणि आपले आई वडील काय करतात याचा थोडाही विचार नसतो तर त्यांच्या डोक्यात केवळ राजकारणाचे वेड असते.

आपला नेता कसा मोठा होईल? आणि जादा मताधिक्य घेऊन कसा निवडून येईल? याकडे मात्र त्यांचे विशेष लक्ष असते. ज्यावेळी लोकसभा व विधानसभा निवडणुका लागल्या जातात तेव्हा मात्र आमचे युवक आपल्या नेत्याला भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी खूप खूप प्रयत्न करतात. अहोरात्र त्यांचा प्रचार करण्यासाठी तालुका व जिल्हा पिंजून काढतात. त्यांना स्वतःच्या घराकडे देखील लक्ष द्यायला वेळ नसतो.

घरातील आई-वडील, बायको व मुले यांना विसरून ते प्रचार करण्यात एवढे मग्न होतात की, त्यांना स्वतःच्या पोटाला दोन घास खावे याचे देखील भान राहत नाही. घरचे पैसे घालून गाडीत पेट्रोल टाकायचे आणि त्या नेत्याचा प्रचार करायचा हे समीकरण सध्या सर्वत्र चालू आहे. काही काही महाभाग तर इलेक्शन मध्ये तालुक्याचे भांडण गावात आणतात, आपल्या नेत्याच्या विरोधात जर कोणी अपशब्द बोलला तर त्याच्यासोबत भांडण तंटे करायलाही मागे पुढे पाहत नाहीत.

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी. ता.अहमदपूर. जि.लातूर**
**7498715661**

पण एकमेकांच्या विरोधात प्रचार करणारी नेते मंडळी निवडून येऊ किंवा न येऊ पण ते आपले राजकीय ऋणानुबंध कधीच बिघडू देत नाहीत. पण हे युवक मात्र त्या राजकीय नेत्यांसाठी नाहक गावात दुश्मनी करून घेतात. यामध्ये या युवकांचा कवडीचाही फायदा नसतो. उलट त्यांना जमीन विकून घरून पैसा घालावा लागतो. त्यांचा फायदा आणि आपला तोटा हे वाक्य आमच्या युवकांना कधी कळणार? युवकांनो हे असे चालणार नाही. हे जरा लक्षात घ्या. त्यांच्यासाठी विनाकारण शिक्षणावर पाणी का सोडायचे? अशाने आपल्याला जीवन ध्येय कसे गाठता येईल?

अगोदर स्वतःच्या भविष्याचा विचार करा. स्वतःचे भविष्य घडवून स्वतःच्या पायावर उभे रहा. त्यासाठी खूप खूप शिक्षण शिका. अहोरात्र अभ्यास करा आणि आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करून मग राजकारणात प्रवेश करा. कारण उपाशी पोटी बनलेला कार्यकर्ता लाचार बनतो हे आपल्याला डॉ.बाबासाहेबांनी अगोदरच सांगून ठेवले आहे.

उच्चशिक्षित व राजकीय वलय असलेला कार्यकर्ता राजकारणात यशस्वी होतो हे कोणालाही मान्य करावेच लागेल. नाहीतर अर्ध्यावर शिक्षण सोडून राजकीय नेत्यांच्या मागे फिरणारे युवक आज दिशाहीन होऊन अंधारातच चाचपडत आहेत.

त्यांना गावात कोणी विचारायला देखील तयार नाही. त्यांची घरे राजकारणात शेती विकून उध्वस्त झाली आहेत. खूप खूप शिक्षण शिकून व स्वतःच्या पायावर उभे राहून राजकारणात प्रवेश करणारे राजकारणी आज यशस्वी झाले आहेत. हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही.

म्हणून बांधवांनो खूप खूप शिक्षण शिका... नोकरीला लागून स्वतःच्या पायावर उभे रहा, स्वतःचे भविष्य घडवा आणि मग राजकारणात प्रवेश करा कारण तुमच्यावर लाचारी पत्करण्याची वेळ येणार नाही... हे नेहमी ध्यानात ठेवा...

■ ■ ■



# पाणीबाणी आणि वाड्यांची आनंदवार्ता...

राज्याच्या अनेक भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य हा स्वातंत्र्यांनंतरच्या इतक्या वर्षातही मोठा गहण प्रश्न आहे. उन्हाळ्याच्या दिवसात विदर्भातील मेळघाट तसेच मराठवाडा, खानदेश आणि राज्याच्या इतर काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवते. कित्येक अंतरावरून महिलांना डोक्यावर घगराभर पाणी आणावे लागते.

मात्र, अशाही बिकट परिस्थितीत काही आनंदवार्ता कानावर पडतातच.

ईगतपूरी तालुक्यातील टाकळ्याची वाडी आणि बोरीची वाडी या दोन गावांमध्ये अनेक वर्षांपासून पाण्याची भिषण समस्या होती. पण आता हे चित्र बदलणार आहे. एसएनएफ आणि दुर्गापरमेश्वरी प्रतिष्ठान, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने बोरीची वाडी आणि टाकळ्याची वाडी येथील पाणीयोजनेचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

विशेष आनंदाची बातमी म्हणजे या प्रकल्पांतर्गत आम्ही निवडलेल्या जागी विहीरीचे काम पूर्ण झाले असून विहीरीला भरपूर पाणी लागले आहे. पाण्याने काठोकाठ भरलेली विहिर बघून आतापर्यंत घेतलेल्या परिश्रमाचे चिज झाल्याचे एसएनएफ सदस्यांना खुप समाधान आहे. या कामात गावकऱ्यांनी मनापासून श्रमदान केले. त्यांचा सहभाग खूपच प्रेरणादायी होता. त्यांच्या सहकार्यामुळेच हे स्वप्न प्रत्यक्षात येत आहे. आता पुढचे काम पाणी गावांपर्यंत पोहोचवणे... तीही आनंददाई बातमी येईलच लवकर...

सध्या तरी बोरीची वाडी आणि टाकळ्याच्या वाडीतील ग्रामस्थ लवकरच शुद्ध आणि मुबलक पाणी गावात पोहोचणार म्हणून आनंदी आहेत.

**प्रमोद गायकवाड, संस्थापक, एसएनएफ**
**योगेश क्षिरसागर, दुर्गापरमेश्वरी प्रतिष्ठान, ठाणे.**

■ ■ ■

# बेरोजगारांनी घरी बसायचं काय?

निवृत्ती नंतरही कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने सेवेत घेता येईल असा निर्णय सरकारने नुकताच घेवून बेरोजगारी वाढविण्यास बळ दिल्याचे दिसून येते.

निवृत्तीनंतर सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी यांना का म्हणून सेवेत ठेवायचे? निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सहा महिने अगोदर जर नवीन कर्मचारी नियुक्त केले तर त्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे संपूर्ण काम नवीन व्यक्ती सहा महिन्यांत सहज काम शिकुन करू शकतो. मग सरकार निवृत्त कर्मचाऱ्यांचे लाड का करीत आहे?

देशासह राज्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचे प्रमाणात वाढत असून मोठे सावट निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत सरकार जर अशा पध्दतीचे चुकीचे निर्णय घेत असेल तर राज्याची जनता कधीच माफ करणार नाही. कारण सरकारचे असेही म्हणणे आहे की निवृत्त कर्मचाऱ्यांला करार पद्धतीने वयाच्या ६५ वर्षांपर्यंत काम करता येईल. जर आवश्यकता भासली तर वयाच्या ७० वर्षांपर्यंत सुध्दा करता येईल.

यावरून आपण समजू शकतो की सरकार कडून बेरोजगारांवर कीतीमोठा घणाघाती प्रहार आहे हे आपल्या लक्षात आलेच असेल. त्यात महत्वाचे म्हणजे करार पध्दतीने नियुक्त झालेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतनही सरकारने अवाढव्य ठेवले आहे . निवृत्तीच्या वेळी असलेले मुळ वेतन व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम ही करार पद्धतीने नियुक्त अधिकाऱ्यांना पारिश्रमिक म्हणून दिली जाईल. म्हणजेच त्या अधिकाऱ्यांचे वेतन जवळपास ८० ते ९० हजार राहील आणि याचे दुष्परिणाम राज्यातील बेरोजगार युवकांना भोगावे लागतील.

त्यामुळे सरकारने निवृत्त कर्मचाऱ्यांबद्दल किंवा अधिकाऱ्यांबद्दल जो करार पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे तो बेरोजगार युवकांना मोठ्या प्रमाणात नुकसान पोचविणारा असून अत्यंत घातक व चिंताजनक आहे.

यावर सरकारने पुनर्विचार करून करार पद्धतीने निवृत्त कर्मचाऱ्यांना घेण्याचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा असे मला वाटते.कारण राज्यात महागाई, बेरोजगारीसह अनेक जटील समस्या आहेत त्यात जत निवृत्त कर्मचाऱ्यांना सरकारनी करार पद्धतीवर जर सामावून घेतले तर आणखी गंभीर समस्या निर्माण होतील हेही तितकेच खरे.

निवृत्तीनंतरही करार पद्धतीने घेण्याच्या सरकारच्या निर्णयाला कर्मचारी/अधिकारी संघटनांकडून सुध्दा विरोध होत आहे आणि विरोध करने सहाजिकच आहे.सरकारच्या या निर्णयाला संघटनाच काय तर राज्याची १४ कोटी जनताही विरोध करेल.एककडे कर्मचारी संघटना निवृत्ती वय ५८ वरून ६० करण्याची मागणी करीत आहे.

सरकार म्हणत आहे की, ५८ वर्षांनंतर कर्मचाऱ्यांची काम करण्याची क्षमता तेवढी राहत नाही, असे कारण देत राज्य सरकार निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यास मंजुरी देत नाही,तर मग प्रश्न उपस्थित होतो की, वयाच्या ६५-७० वर्षांपर्यंत त्यांची सेवा कशी काय घेता येईल, असाही मोठा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

सरकार एकीकडे सांगते की ५८ वर्षांनंतर त्या व्यक्तीची काम करण्याची क्षमता कमी असते आणि दुसरीकडे निवृत्तीनंतर ६५-७० वर्षांपर्यंत करार पद्धतीने कामावर ठेवण्यास मंजुरी देते हि तर सरकारची मनमानीच म्हणावी लागेल यावर सरकारने व पक्ष-विपक्षांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सरकारने घेतलेला निर्णय चुकीचा असल्याने तो ताबडतोब मागे घ्यावा. असे चुकीचे निर्णय घेण्यापेक्षा राज्य सरकारने नियमित कर्मचारी व अधिकारी यांची भरती करावी. यामुळे बेरोजगारीवर आळा बसेल व बेरोजगारांना सरकारी सेवेत नौकरी करण्याची संधी मिळेल आणि याचे स्वागत सर्वच स्तरातून केले जाईल.त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला कोणत्याही प्रकारची ठेच पोहचणार नाही याची सरकारने काळजी घ्यावी.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### पराधिन जगती..!

कुणाचा मृत्यु कसा होईल
हे येत नाही सांगता
विज्ञानाने केली कितीही प्रगती
पण खरा सुत्रधार
तोसृष्टीचा नियंता..!

पाप पुण्याचाआपण -
करत बसतो
गुणाकार भागाकार
पण नियतीच्या मनातलं
कुणीच
ओळखु शकत नाही
भविष्यकार..

जसे कर्म तसे फळ
हे आहे एक गृहीत
पण विवेक बुध्दीने
वागणे हे असते उचित..!

खोटे नाटे उद्योग करुनी
कमवु पहातो मानव संपत्ती
पण होत्याचे नव्हते होण्यास
सांगा वेळ लागतो किती?

ईर्षा द्वेश लोभ टाळुनी
संयमाने जग जिंकावे
आत्मिक समाधाना सम
सुख नाही हे ध्यानी धरावे ..

आले देवाजीच्या मना
तेथे कुणाचे चालेना
भयानक विमान दुर्घटनेतुन
त्याने एकालाच वाचविले ना..!

२७४ जणांचे हिरावुनी प्राण
नियतीचे तांडव नृत्य थांबले
पिडीत कुटुंबांच्या वेदना व्यक्त
कराया शब्दही नच उरले ..

ज्याचे जिथे मरण तेथे
निश्चीत पाय ओढून नेती
खरेच मानव नाही का
पराधिन या जगती?..

## इस्त्रोचं धाडसी पाऊल, अभिमानास्पद आणि प्रेरणादायी

**वाचक लिहितात**

इस्त्रोने पुन्हा एकदा सिद्ध केलं की, सुरक्षा हेच सर्वोच्च प्राधान्य आहे. अमेरिकेतील Axiom-4 मोहिमे अंतर्गत फाल्कन-9 रॉकेटचे प्रक्षेपण ११ जून रोजी नियोजित होते. हे रॉकेट भारत, अमेरिका, पोलंड आणि हंगेरीच्या ४ अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावर घेऊन जाणार होते. पण, इस्त्रोने सखोल चाचण्या आणि लो टेंपरेचर लिक टेस्टची मागणी केली.

पोलंड आणि हंगेरीनेही इस्त्रोच्या भूमिकेचे समर्थन केले. स्पेसएक्सकडून यावर तात्पुरत्या उपायांची तयारी होती. परंतु, इस्त्रोने ती साफ नाकारली. संभाव्य धोका ओळखून इस्त्रोने वेळेवर योग्य निर्णय घेतला. डॉ. व्ही. नारायणन यांच्या अनुभवामुळे मोठा अपघात टाळता आला. १३ सदस्यीय भारतीय तज्ञ पथकाने फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटरवर थेट हस्तक्षेप केला. सेफ्टी फर्स्ट, लॉंच लेटर ही भूमिका खऱ्या विज्ञाननिष्ठेचे उदाहरण ठरली. यामुळे अखेर मागणी नुसार चाचणी करावी लागली. आणि इस्त्रोच्या अंदाजानुसार ती सदोष आढळली. काही महत्वाचे दोष रॉकेटमधे होते. त्यामुळे अपघाताची पूर्ण शक्यता होती. या मोहिमेत भारताचे वैमानिक ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे आहेत.

त्यांच्या सुरक्षिततेसाठी इस्त्रोने आवश्यक तो धोरणात्मक निर्णय घेण्यास मागेपुढे पाहिले नाही. इस्त्रोची ही भूमिका म्हणजे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची वैज्ञानिक प्रगल्भता दर्शवते. प्रत्येक भारतीयाला या निर्णयाचा अभिमान आहे. भारत आता केवळ प्रक्षेपण करणारा देश नाही, तर जागतिक धोरण ठरवणारा बनला आहे. ही घटना इस्त्रोच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेची साक्ष देणारी आहे. हे खरे वैज्ञानिक नेतृत्व आहे, जे धाडस आणि विवेक दोन्ही जपतं. ही भूमिका केवळ अभिमानास्पद आहे असे नव्हे तर नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. संपूर्ण देश इस्त्रोच्या या निर्णयामुळे गर्वाने उभा आहे. इस्त्रोचे मनःपूर्वक अभिनंदन!

■ **सौ. प्रांजली विजय ब्रम्हे**
**नागपूर.**

## रेडी टू ईट फूड खाणे चांगले की धोकादायक?



आजच्या धावपळीच्या जीवनात, रेडी-टू-ईट अन्नाचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. ऑफिसला जाण्याची घाई असो, मुलांच्या टिफिनचा ताण असो किंवा रात्री उशिरापर्यंतची भूक असो, अशा प्रत्येक प्रसंगी रेडी-टू-ईट अन्न हा एक सोपा उपाय असल्याचे दिसून येते.

हे पदार्थ चवीला छान लागतात आणि वेळही वाचवतात. पण ही सोय तुमच्या आरोग्यावर परिणाम करत नाही का? हे पदार्थ दीर्घकाळ वापरल्यास शरीराला हानी पोहोचवू शकतात का?

तयार अन्न जास्त काळ खराब होऊ नये म्हणून त्यात अनेक प्रकारचे प्रिझर्वेटिव्ह्ज मिसळले जातात. ही रसायने अन्न खराब होण्यापासून रोखतात, परंतु हेच रसायने पोट आणि यकृतासाठी समस्या निर्माण करू शकतात. सोडियम, नायट्रेट, ट्रान्स फॅट आणि कृत्रिम चव देणारे घटक अनेकदा त्यात मिसळले जातात, ज्यामुळे शरीरात हळूहळू विषारी घटक वाढतात. याच्या जास्त सेवनाने रक्तदाब, लठ्ठपणा, मधुमेह आणि अगदी हृदयाचे आजार देखील होऊ शकतात.

रेडी टू ईट फूडचा सर्वात मोठा तोटा म्हणजे ताज्या अन्नाच्या तुलनेत ते पोषणात खूपच कमी असते. त्यात आवश्यक जीवनसत्त्वे, फायबर आणि प्रथिने कमी प्रमाणात असतात, तर कॅलरीज, मीठ आणि फॅट खूप जास्त प्रमाणात असते.

हेच कारण आहे की या अन्नामुळे पोट लगेच भरते पण शरीराला आवश्यक पोषण मिळत नाही. अशा अन्नाचे सतत सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते आणि थकवा, आळस आणि एकाग्रतेचा अभाव यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

रेडी टू ईट फूड सोयीसाठी अधूनमधून खाल्ले जाऊ शकते, परंतु ते नियमितपणे खाणे धोकादायक ठरू शकते. विशेषतः लहान मुले आणि वृद्धांनी त्यापासून दूर राहावे. जास्त पॅक केलेले आणि प्रक्रिया केलेले अन्न खाल्ल्याने आम्लता, गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या पोटाच्या समस्या देखील उद्भवू शकतात.

याशिवाय, तयार अन्नामध्ये अनेकदा सोडियमचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे मूत्रपिंडांवर परिणाम होऊ शकतो. जास्त मीठ शरीरात पाण्याची कमतरता आणि सूज यासारख्या समस्या देखील वाढवू शकते. जे लोक असे अन्न जास्त काळ खातात त्यांना हाडांची कमकुवतपणा, त्वचेच्या समस्या आणि मानसिक ताण यासारख्या समस्यांना देखील तोंड द्यावे लागू शकते. म्हणून, रेडी टू ईट फूड टाळा.

■ ■ ■

# क्रॉम्प्टनला महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी कडून १०१ कोटी रुपयांची आतापर्यंतची सर्वात मोठी सौर पंप ऑर्डर मिळाली

**मुंबई, १७ जून :** भारतातील पंप उद्योगातील एक विश्वासार्ह अग्रणी कंपनी क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने सौर जल पंप क्षेत्रातील आजपर्यंतची सर्वात मोठी ऑर्डर मिळवून त्यांच्या हरित ऊर्जा प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. पीएम-कुसुम योजनेच्या घटक-बी अंतर्गत, कंपनीला महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेकडून (MEDA) कडून १०१ कोटींपेक्षा जास्त (GST वगळून), ४,५०० ऑफ-ग्रिड सोलर फोटोव्होल्टेइक वॉटर पंपिंग सिस्टीम्स (SPWPS) चे संपूर्ण महाराष्ट्रासाठी डिझाइन, उत्पादन, पुरवठा, वाहतूक, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन करण्यासाठी लेटर ऑफ अवॉर्ड/संमतीपत्र (LoA) मिळाले आहे.

ही महत्त्वपूर्ण ऑर्डर भारतातील शेतकऱ्यांना सक्षम बनवणाऱ्या शाश्वत सिंचन उपायांना उपलब्ध करून देण्याची क्रॉम्प्टनची निरंतर वचनबद्धता अधोरेखित करते. या टर्नकी प्रकल्पात पाच वर्षांचा सर्वसमावेशक देखभाल/मेन्टेनन्स करार (सीएमसी) देखील समाविष्ट आहे, जो इन्स्टॉल केलेल्या सिस्टीमची दीर्घकालीन विश्वासार्हता आणि समर्थन यांची खात्री करतो. क्रॉम्प्टनचे सौरऊर्जेवर चालणारे प्रगत डीसी सबमर्सिबल पंप, ऑफ-ग्रिड आणि ग्रामीण भागात पाण्याच्या उपलब्धतेच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी व टिकाऊपणा, उच्च कार्यक्षमता आणि वापरण्यास सुलभता साध्य करण्याकरिता विशेषतः डिझाइन केलेले आहेत. प्रकल्पाच्या संपूर्ण जीवनचक्रात अखंड कार्य आणि संचालनात उत्कृष्टता सुनिश्चित करण्यासाठी कंपनी तिचे प्रशिक्षित फील्ड कर्मचारी, स्थानिक जिल्हा सेवा पथके आणि सुदृढ विक्री-पश्चात सेवा नेटवर्कचा वापर करेल.

शेतकऱ्यांचे पारंपारिक ऊर्जा स्रोतांपासून अक्षय सौर ऊर्जेकडे स्थित्यंतर सुलभ करण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टांशी हा उपक्रम थेट जुळतो, ज्यामुळे आर्थिक बचत आणि पर्यावरणीय लाभ दोन्ही प्राप्त होतात. शेती, ग्रामीण पाणीपुरवठा आणि ऑफ-ग्रिड ॲप्लिकेशन्सच्या वाढत्या मागणीमुळे भारतातील सबमर्सिबल वॉटर पंप बाजारपेठेत होत असलेल्या जलद वाढीच्या पार्श्वभूमीवर ही ऑर्डर प्राप्त झाली आहे. अनियमित पाऊस आणि मर्यादित ग्रिड पॉवर असलेल्या प्रदेशांमध्ये सौरऊर्जेवर चालणाऱ्या सबमर्सिबल पंपांचे स्थान महत्त्वाचे बनत आहे कारण या मुळे अविरत आणि शाश्वत सिंचन शक्य होते.

क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडच्या होम इलेक्ट्रिकल्स आणि पंप्सचे व्यवसाय प्रमुख श्री. रजत चोप्रा म्हणाले, पीएम-कुसुम योजनेअंतर्गत ४,५०० सोलर फोटोव्होल्टेइक वॉटर पंपिंग सिस्टीमसाठी मेडा (MEDA) कडून पुरस्कार पत्र मिळाल्याने आम्हाला आनंद होत आहे. हा टप्पा केवळ आमच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या सौर पंप ऑर्डरचेच नाही तर भारतातील शेतकऱ्यांच्या गरजांनुसार विश्वसनीय आणि उच्च-कार्यक्षमता पंपिंग निरसने उपलब्ध करण्याच्या आमच्या निरंतर वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. ही ऑर्डर क्रॉम्प्टनचा उत्पादनात उत्कृष्टता, दीर्घकालीन कामगिरी आणि मजबूत सेवा नेटवर्कवरील विश्वास अधिक दृढ करते. सौरऊर्जेवर चालणाऱ्या सिंचनास बढावा देण्यात एक विश्वासार्ह भागीदार म्हणून आमचे स्थान यामुळे आणखी दृढ होते. क्रॉम्प्टनमध्ये, आम्ही शेतकऱ्यांना स्वच्छ ऊर्जा खात्रीदायक रित्या उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, तसेच गुणवत्ता, नावीन्य आणि भक्कम विक्री-पश्चात सेवेद्वारे अविरत संचालन सुनिश्चित करतो

क्रॉम्प्टनने हरियाणा, महाराष्ट्र, राजस्थान आणि मध्य प्रदेश या महत्त्वाच्या चार राज्यांमधील निविदा प्रक्रियेत सक्रियतेने भाग घेतला होता. SECI आणि MNRE यांच्या देखरेखीखालील पहिला टप्पा, अंतिम अंमलबजावणीसाठी HAREDA, MEDA, MSEDCL, MPUVNL आणि RHDS यासारख्या संबंधित राज्य नोडल यंत्रणांकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. क्रॉम्प्टन आधीच हरियाणा, राजस्थान आणि महाराष्ट्रात आधीपासूनच कार्यरत असण्याबरोबरच कंपनी मध्य प्रदेशात काम करण्याची तयारी करत आहे आणि इतर भारतीय राज्यांमध्ये आपल्या स्थानाचा विस्तार करण्यास सज्ज आहे. ८५ वर्षांहून अधिक अनुभवासह, क्रॉम्प्टन भारताच्या स्वच्छ ऊर्जा आणि पाणी उपलब्धतेच्या उद्दिष्टांना प्रोत्साहन देणाऱ्या ऊर्जा-कार्यक्षम, टिकाऊ आणि स्मार्ट पंपिंग तंत्रज्ञानाच्या निर्मितीमध्ये नवनवीन अन्वेषण आणि नेतृत्व करत आहे.

# कृषी उत्पादनक्षमतेतील अंतर भरून काढण्यासाठी कृषिरसायनांमधील नवोपक्रमांची मदत

**मुंबई, १७ जून :** भारतातील कृषी क्षेत्र एका निर्णायक टप्प्यावर आहे. अन्नधान्य उत्पादक अशा प्रमुख देशांपैकी एक असतानाही, भारताला अजूनही अनियमित हवामान बदल, किडीच्या स्वरूपातील बदल आणि मातीची घटती गुणवत्ता यांसारख्या अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांसाठी अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होत आहे.

जागतिक पीक उत्पादनात भारत आघाडीवर असला, तरी भारतातील प्रतिहेक्टर उत्पादन हे जागतिक सरासरीपेक्षा मागे आहे. या तफावतीचे एक मुख्य कारण म्हणजे किडींमुळे होणारे पीक नुकसान. २२४मध्ये भात, गहू, मका, कडधान्ये व ऊस यांसारख्या पिकांमध्ये सुमारे १७ टक्के पीक नुकसान हे किडीमुळे झाल्याचा अंदाज आहे.

कापूस हे भारतातील सर्वाधिक आर्थिक महत्त्वाचे पीक आहे. बोंडअळी व रसशोषक किडींचा प्रादुर्भाव कापसावर फार सहजपणे होतो. बीटी कापसामुळे या किडीवर प्रभावी नियंत्रण मिळाले असले, तरी आता कीड प्रतिकार व्यवस्थापन हे अत्यावश्यक झाले आहे.

नवोन्मेषी उपाययोजनांद्वारे कृषी उत्पादनातील दरी भरून काढणे

१. प्रगत रसायनशास्त्र व हवामानबदलाशी जुळवून घेणाऱ्या उपायांद्वारे पिकांचे स्मार्ट संरक्षण

भारतात विविध पिकांच्या आणि हवामानाच्या गरजांनुसार सुसंगत अशा कीटकनाशकांसाठी व तणनाशकांसाठी संशोधन व विकास जोमात सुरू आहे. या उत्पादनांच्या विशिष्ट रेणूंची रचना मानवी आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीने अधिक सुरक्षित असते. त्याचबरोबर, वनस्पतींच्या अर्कांपासून आणि सूक्ष्मजीवांपासून तयार होणारे जैविक कीटकनाशक पिकांच्या अचूक आणि संवेदनशील नियंत्रणात मदत करत आहेत. त्यांच्या पर्यावरणपूरक स्वरूपामुळे उपयुक्त सूक्ष्मजीवांचे नुकसान टाळता येते.

बायोरॅशनल उपाय, म्हणजे कीटकांच्या वाढीवर नियंत्रण ठेवणारे संयुग, संवादक-रसायने आणि अन्ननिरोधक द्रव्ये यांच्या साहाय्याने एकात्मित कीड व्यवस्थापन शक्य होत आहे. शेतीवरचा रासायनिक भार कमी करून यातून प्रभावी नियंत्रण राखता येते.

वाढत्या हवामान चंचलतेच्या पार्श्वभूमीवर, कृषी तंत्रज्ञानातील नवोपक्रम आता अजैविक स्वरुपाच्या ताणतणावांवर उत्तरे शोधण्यासाठी पुढे येत आहेत. अतिउष्णता, दुष्काळ किंवा क्षारयुक्त जमिनीत पीकवाढीस साहाय्य करणारी उत्पादने सध्या वापरात येत आहेत. विपरीत हवामानातही जमिनीची उत्पादकता टिकवून ठेवण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. त्याचप्रमाणे, लघु उंचीच्या पीक वाणांची लागवड, उदा. बुटक्या मक्याचे संकरित वाण, हे पावसाचा मारा किंवा वाऱ्यामुळे पीक आडवे होणे यांसारख्या नैसर्गिक आपत्तींना अधिक प्रतिकारक्षम ठरते.

२. अचूक तंत्रज्ञान व स्मार्ट घटकद्रव्ये : कार्यक्षमतेत वाढ

आजची डिजिटल शेती प्रणाली जमिनीतील आर्द्रता, पीक आरोग्य आणि सूक्ष्म हवामान माहितीचे प्रत्यक्ष वेळेत निरीक्षण करण्याची क्षमता देते. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विश्लेषणांमुळे योग्य वेळी, योग्य प्रमाणात कृषी रसायनांचा वापर करता येतो. त्यामुळे अपव्यय आणि अकार्यक्षमता कमी होते.

रोबोटिक तणनाशक यंत्रे, स्मार्ट स्प्रेयर आणि ड्रोन-आधारित फवारणी यंत्रणा या गोष्टी मोठ्या आकाराच्या शेतीत सुसंगत व सुलभ वापरासाठी उपयोगी ठरतात. नियंत्रित स्रवण तंत्रज्ञान वापरल्यास रसायनांच्या दीर्घकालीन कार्यक्षमतेची खातरजमा करता येते, तर रेनफास्ट तंत्रज्ञानामुळे अवकाळी पावसातही उत्पादन संरक्षित राहते. याशिवाय, कमी अवशेषाची उत्पादने आता प्राधान्याने विकसित केली जात आहेत. ती देशांतर्गत व निर्यातप्रधान अन्नसुरक्षा मानकांशी सुसंगत राहतात.

३. जैवतंत्रज्ञानाच्या आधारावर पिकाची तग धरण्याची क्षमता

दुष्काळ, अतिउष्णता व क्षारीय जमीन अशा जैवेतर ताणांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या कृषी तंत्रज्ञानाच्या उत्पादनांमुळे पिके प्रतिकूल परिस्थितीतही उत्पादनक्षम राहू शकतात. कमी उंचीचे वाण, उदा. बुटका मका, हे जोरदार वारा, अनियमित पाऊस यांसारख्या समस्यांना तोंड देण्यास अधिक सक्षम असते. बीटी कापूस किंवा तणनाशक प्रतिरोधक मका वाण ही जनुकीय सुधारित पिके कीड व तण यांना तोंड देण्यास सक्षम असतात.

४. शेतकऱ्यांसाठी डिजिटल सल्ला सशक्तीकरणाची नवी दिशा

शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवणारे डिजिटल प्लॅटफॉर्म हे वेळेवर, सहज आणि स्थानिक संदर्भयुक्त माहितीचे उत्कृष्ट स्रोत ठरत आहेत. हे प्लॅटफॉर्म विविध प्रादेशिक भाषांमध्ये पीक संरक्षणाचे मार्गदर्शन देऊ शकतात आणि शेतकऱ्यांच्या निर्णयक्षमतेत आणि उत्पादनात वाढ घडवून आणू शकतात. कॉन्फरन्स कॉलिंग, एआय सहाय्य यांसारख्या सुविधा शेतकऱ्यांना कृषी उद्योगाशी सातत्याने जोडून ठेवतात.

# सोनी इंडियातर्फे नवीन ब्राव्हिया ८ खख क्यूडी-ओएलईडी सीरीज लाँच



**नवी दिल्ली, १७जून :** सोनी इंडियाने आज ब्राव्हिया ८ ll सीरीज लाँच करत आपल्या क्रांतीकारी टीव्ही सीरीज उत्पादनांमध्ये मोलाची भर घातली आहे. नव्या सीरीजमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आधुनिक एआय प्रोसेसर एक्सआरचा मेळ घालत असामान्य पिक्चर क्वालिटी आणि उत्कृष्ट ऑडिओ अनुभव देण्यात आला आहे. आधुनिक प्रेक्षकांसाठी खास तयार करण्यात आलेल्या ब्राव्हिया ८ ll सीरीजमध्ये परफेक्ट ब्लॅक, अचूक शॅडो डिटेल्स आणि जबरदस्त कॉन्ट्रास्ट देण्यात आले आहेत. त्याशिवाय अकॉस्टिक सरफेस ऑडिओ+ आणि डॉल्बी व्हिजन अटमॉस तसेच आघाडीच्या स्ट्रीमिंग सेवांच्या सहकार्याने विविध स्टुडिओ कॅलिब्रेटेड मोड्स देण्यात आले आहेत.

नवीन ब्राव्हिया ८ सीरीज १६४ सेमी (६५) आणि १३९ सेमी (५५) स्क्रीन आकारात उपलब्ध करण्यात आली आहे. ही सीरीज अचूकतेसह तयार करण्यात आली आहे. ब्राव्हिया ८ ll मधील एक्सआर प्रोसेसरमध्ये एआय सीन रेकग्निशन सिस्टीम आहे, जी डेटाचे अचूक विश्लेषण करते व वास्तववादी चित्र दाखवते.

ब्राव्हिया ८ ll सीरीजमध्ये स्टुडिओ कॅलिब्रेटेड मोड देण्यात आला आहे, जो सिनेमा तयार करणाऱ्यांना अपेक्षित असलेला इमेजचा दर्जा घरीच पुनर्निमित करतो. सध्या अस्तित्वात असलेल्या नेटफ्लिक्स अडॅप्टिव्ह कॅलिब्रेटेड मोड आणि सोनी पिक्चर्स कोअर कॅलिब्रेटेड मोडबरोबरच प्राइम व्हिडिओ कॅलिब्रेटेड मोड हा नवा मोड प्रेक्षकांना क्रिएटरच्या दृष्टीकोनातून दर्जेदार मनोरंजनाचा अनुभव देईल. प्राइम व्हिडिओ कॅलिब्रेटेड मोडसह ग्राहकांना दर्जेदार चित्रण अनुभवता येते, जे सिनेमे, सीरीज आणि पहिल्यांदाच लाइव्ह स्पोर्ट्सद्वारे अनुभवता येणार आहे. ब्राव्हिया ८ ll सीरीज आयमॅक्स अधिक सुधारित आणि डॉल्बी व्हिजन तसेच डॉल्बी अटमॉससाठी पूरक आहे. त्यामध्ये असामान्य ब्राइटनेस, जास्त चांगला कॉन्ट्रास्ट, उठावदार रंग, प्राइम व्हिडिओ, नेटफ्लिक्स व इतर लोकप्रिय स्ट्रीमिंगसाठी इमर्सिव्ह साउंड अशा वैशिष्ट्यांचा समावेश आहे.

ब्राव्हिया ८ ll सीरीजमध्ये हाय ल्युमिनान्स पॅनेल आणि टेम्परेचर सेन्सर देण्यात आले आहे, जे एक्सआर कॉन्ट्रास्ट बुस्टर २५ ला अचूकपणे प्रकाशावर नियंत्रण करण्यास मदत करते. या तंत्रज्ञानामुळे काळा रंग आणखी गडद, तर पांढरा रंग जास्त उठावदार दिसतो. पर्यायाने प्रत्येक सीन जिवंत भासतो. क्यूडी-ओएलईडी पॅनेल रंगांत सातत्य राखते व खोलीत कुठूनही पाहाताना पिक्चर क्वालिटी समान दिसते.

ब्राव्हिया ८ ll सीरीजमध्ये आधुनिक ऑडिओ आणि व्हिज्युअल तंत्रज्ञान उदा. डॉल्बी व्हिजन आणि डॉल्बी अटमॉसचा समावेश करण्यात आला आहे. डॉल्बी व्हिजनच्या मदतीने जास्त उठावदार व्हिज्युअल्स व कॉन्ट्रास्टची खात्री होते, तर डॉल्बी अटमॉसमुळे इमर्सिव्ह स्पॅशियल साउंड, जास्त स्पष्ट ऑडिओ तंत्रज्ञान यामुळे आपण त्या थराराचा भाग असल्याचं जाणवतं.

## हम पांच फेम आणि अनुभवी अभिनेत्री वंदना पाठक पाच वर्षांनंतर टेलिव्हिजनवर पुनरागमन करत आहेत झी टीव्हीवरील तुम से तुम तक मालिकेसह!

**मुंबई, १७जून :** अशा समाजात जिथे नाती आणि लग्न अनेकदा वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरांच्या आधारे ठरवले जातात, आणि जिथे वय, आर्थिक स्थिती आणि सामाजिक पार्श्वभूमी अशा घटकांना खूप महत्त्व दिले जाते तिथे प्रेम मात्र कोणतेही नियम मानत नाही. ते स्वतःचा मार्ग स्वतः ठरवतं आणि वाटेत येणाऱ्या अडथळ्यांना पार करतं. अनेक दशकांपासून अशा प्रगतीशील आणि भावनिकदृष्ट्या प्रभावी कथानकांसाठी झी टीव्ही वाहिनी ओळखली जाते. ही वाहिनी आता एक नवीन आणि भावस्पर्शी कल्पनारम्य मालिका तुम से तुम तक प्रेक्षकांसमोर घेऊन येत आहे. ही अपारंपरिक प्रेमकथा दोन अतिशय भिन्न व्यक्तिमत्त्वांमधील असामान्य नात्याभोवती फिरते अनु, एक १९ वर्षांची उत्साही आणि साधी पार्श्वभूमी असलेली तरुणी आणि आर्यवर्धन, एक ४६ वर्षांचा शिस्तप्रिय, स्वतःच्या मेहनतीवर उभा राहिलेला उद्योगपती. त्यांचे नाते सामाजिक अपेक्षांना आव्हान देते आणि प्रेम, वय आणि स्वीकार यासारख्या गोष्टींवर प्रश्न उपस्थित करते.

# वीर हनुमान मालिकेत विषारी द्रव्य युक्त अत्तर स्वतः लावून हनुमान श्रीरामाचे रक्षण करणार



**मुंबई, १७ जून :** सोनी सबवरील वीर हनुमान मालिका बाल हनुमानाच्या कथांची रोचक मांडणी करून प्रेक्षकांना मोहित करत आहे. या मालिकेत आन तिवारी छोट्या हनुमानाच्या भूमिकेत आहे, तर सायली साळुंखे आणि आरव चौधरी अनुक्रमे माता अंजनी आणि केसरीची भूमिका करत आहेत. माहिर पांधी वाली आणि सुग्रीव यांची दुहेरी भूमिका करत आहे आणि तन्मय नानी बाल श्रीरामाच्या भूमिकेत दिसत आहे. मालिका एका नाट्यपूर्ण आणि भावनिक वळणावर जाऊन पोहोचली आहे. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी श्रीराम आणि हनुमान यांची पहिली भेट पाहिली. आपली माता लवकरच परत येईल हे आश्वासन घेऊन हनुमान प्रसन्न मनाने अयोध्येहून परत निघाला. पण, अंजनी अजून किष्किंधा नगरीतून गायब झालेली आहे. हे समजल्यावर हताश होऊन, गोंधळून श्रीरामाच्या शब्दाविषयी मनात संदेह घेऊन हनुमान पुन्हा रामाला भेटण्यास निघतो.

आगामी भागांमध्ये, इन्द्र देव (मीर अली) आणि अश्विनी कुमार यांच्या हे लक्षात येते की हनुमानाची खऱ्या भक्तीशी अजून तोंडओळख झालेली नाही. त्याला अजून बरेच काही शिकायचे आहे. भक्ती निरपेक्ष असते हे समजून घ्यायचे आहे. त्याची कसोटी घेण्यासाठी, ते दोघे श्रीरामासाठी बनवलेल्या अत्तराच्या कुपीत गुपचुप एक विषारी द्रव्य मिसळतात. ही भेट श्रीरामापर्यंत पोहोचण्यापूर्वीच हनुमानाला काहीतरी गडबड असल्याची शंका येते. त्यामुळे तो ते अत्तर आधी स्वतःच्या शरीरावर लावतो आणि आपल्या आराध्य दैवताचे रक्षण करतो. हा क्षण हनुमानाच्या प्रवासातील टर्निंग पॉइंट आहे. आपली परीक्षा घेतली जात आहे हे माहीत नसताना तो निखळ प्रेमभावनेचे दर्शन घडवतो. वेदना तो स्वतःकडे घेतो आणि सिद्ध करून दाखवतो की, खरी भक्ती बक्षीसाची अपेक्षा ठेवत नाही, तर संपूर्णपणे समर्पित होते. ही घटना शांतपणे बघणाऱ्या भगवान शिवाला (तरुण खन्ना) हे लक्षात येते की, हनुमान परमभक्त होण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे सरकला आहे.

वीर हनुमान मालिकेत भगवान शिवाची भूमिका करणारा अभिनेता तरुण खन्ना म्हणतो, भगवान शिवाची भूमिका करणे ही एक जबाबदारी आहे तसेच एक वरदानही आहे. श्रीरामाचे रक्षण करण्यासाठी हनुमान नकळत त्याची वेदना स्वतःकडे घेतो, हे दृश्य कथानकाच्या ओघात अत्यंत भावुक करणारे आहे तसेच एक अभिनेता म्हणून माझ्यासाठीही ते भावुक करणारे आहे. निःस्वार्थ, निरपेक्ष आणि निखळ अशा खऱ्या भक्तीचे दर्शन या दृश्यातून घडते. भगवान शिवाच्या रूपात हनुमानाची ही भक्ती पाहताना मला त्या बदलाची गहनता जाणवली. या अशा शांत, दमदार क्षणांमधूनच आज आपले आराध्य असलेला रामभक्त हनुमान आकारास येत आहे.

# अदाणी सिमेंट आणि क्रेडाई शाश्वत शहरी बांधकाम उंचावण्यासाठी एकत्र

**गोंदिया, १७ जून :** अदाणी सिमेंट आणि क्रेडाई (कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन्स ऑफ इंडिया) यांनी भारतात शाश्वत व उच्च दर्जाच्या बांधकामासाठी एक विशेष प्राधान्य भागीदारी जाहीर केली आहे. ही भागीदारी गोवा येथील राजधानी पणजीमध्ये पार पडलेल्या क्रेडाईच्या गव्हर्निंग कौन्सिल मीटिंगमध्ये, माननीय मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या उपस्थितीत झाली. या बैठकीला क्रेडाईचे पदाधिकारी आणि देशभरातील नामांकित रिअल इस्टेट डेव्हलपर्स उपस्थित होते.

ही धोरणात्मक भागीदारी अदाणी सिमेंट आणि खाजगी रिअल इस्टेट डेव्हलपर्सची प्रमुख संस्था क्रेडाई यांना एकत्र आणते, ज्यामुळे दोन्ही संस्थांना आणि संपूर्ण बांधकाम उद्योगाला फायदा होणार आहे. या कराराअंतर्गत, अदाणी सिमेंट क्रेडाईच्या देशभरातील १३००० हून अधिक डेव्हलपर्सच्या नेटवर्कचा उपयोग करून आपली बी२बी पोहोच वाढवणार आहे, तर क्रेडाईचे सदस्य अदाणी सिमेंटच्या उद्योगात आघाडीच्या समाधानांचा लाभ घेऊ शकतील.

अदाणी ग्रुपच्या सिमेंट व्यवसायाचे सीईओ श्री. विनोद बहेटी म्हणाले: क्रेडाईसोबतची आमची ही विशेष भागीदारी शाश्वत आणि नाविन्यपूर्ण बांधकामाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्माणासाठी अदाणी सिमेंटच्या प्रतिबद्धतेचा ठोस पुरावा आहे. आम्ही क्रेडाईसोबत हातमिळवणी करून भारताच्या रिअल इस्टेट क्षेत्रात जागतिक दर्जाचे सिमेंट उत्पादने आणि ग्रीन कॉंक्रीट सोल्यूशन्स यांचा स्वीकार गतीने वाढवू इच्छितो. ही भागीदारी आमच्या ग्रीन आणि स्मार्ट शहरांचा दृष्टीकोन साकारण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे – जिथे अदाणी सिमेंटचे तांत्रिक कौशल्य आणि क्रेडाईचे प्रत्यक्ष अनुभव एकत्र येऊन अधिक मजबूत, सुरक्षित आणि शाश्वत रचना घडवतील. आम्ही क्रेडाई सदस्यांसोबत जवळून काम करण्यास उत्सुक आहोत आणि आम्ही आमच्या दर्जेदार बांधकाम साहित्य तसेच संशोधन आणि विकास क्षमतांद्वारे त्यांना सहकार्य करण्यासाठी कटिबद्ध आहोत, जेणेकरून आम्ही घर खरेदीदारांना उत्तम मूल्य देऊ शकू आणि भारताच्या प्रगतीच्या प्रवासात आपले योगदान देऊ शकू.


## आज का अंदाज

**बुधवार १८ जून २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| २४६ | १६६ | ११४ | ४७८ | १२९ | १४० | २४० | १२४ |
| ३९० | २२९ | २७७ | ५६८ | २४६ | २५८ | ३६७ | २७८ |
| ४८८ | ३३७ | ३३० | ३५० | ३४५ | ३४८ | ४६६ | ३६८ |
| २१ | ३१ | ६० | ९० | २४ | ५० | ६१ | ७१ |
| २५ | ३५ | ६८ | ९८ | २३ | ५३ | ६८ | ७८ |
| २७ | ३७ | ६४ | ९४ | २० | ५४ | ६९ | ७९ |

**१३ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ७२ | ८२ |
| १९ | ४९ | ७३ | ८३ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** कुटुंबातील वातावरण शांत राहील. आज तुम्ही तुमचा वेळ मुलांना शिकवण्यात घालवाल, ज्यामुळे मुलं आनंदी होतील. मित्राच्या समस्येवर उपाय शोधण्यासाठी तुम्ही मदत कराल, ज्यामुळे मैत्री अधिक घट्ट होईल.

**वृषभ :** तुमचा मित्र तुमच्याकडे एखादी आवश्यक वस्तू मागू शकतो. जोडीदारासोबत चित्रपट पाहण्याचे नियोजन कराल. ज्यामुळे नातेसंबंध अधिक चांगले होतील. वैवाहिक जीवनात आनंद वाढेल.

**मिथुन :** महिलांना व्यवसायात चांगला नफा मिळेल. आपला व्यवसाय वाढवण्याचा विचार करा. एखाद्या मोठ्या व्यक्तीला मदत केल्याने तुम्हाला समाधान मिळेल. प्रकृतीची काळजी घेणे आवश्यक आहे.

**कर्क :** इंटीरियर डिझायनिंगच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप मिळेल. फिरायला जाण्याचा योग आहे. नात्यात अधिक गोडवा येईल. कामाच्या ठिकाणी अनेक अडचणी असूनही तुम्ही त्यांचा सामना करण्यात यशस्वी व्हाल.

**सिंह :** व्यावसायिक भागीदारासोबतचे तुमचे संबंध अधिक मजबूत होतील. आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला ताजेतवाने वाटेल. कुटुंबासोबत जास्त वेळ घालवण्याची संधी मिळेल.

**कन्या :** आज तुम्ही मित्रांसोबत पार्टी कराल. एखाद्या गोष्टीवरून भावंडांमध्ये सुरू असलेला वाद आज संपेल. तुम्ही नवीन कामाचा विचार करू शकता, ज्यामुळे तुम्ही खूप प्रगती मिळेल. जोडीदार तुमच्यावर प्रभावित होईल.

**तुळ :** आज तुमचे मन उत्साहित राहील. नोकरी करणाजया लोकांसाठी चांगल्या संधी मिळण्याची शक्यता आहे. त्यांच्या पगारात वाढ होईल. मार्केटिंग संबंधित लोकांना आज चांगली ऑफर मिळेल.

**वृश्चिक :** आज एखादे मोठे यश तुमच्या हाती लागू शकते. आज तुमची कार्यक्षमता चांगली राहील. आजचा दिवस तुमचा उत्तम राहील. एखाद्या मित्राचे सहकार्य मिळेल. तुम्ही खूप आनंदी राहाल.


**धनु :** आज लोक तुमच्यावर खूप प्रभावित होतील. व्यवसाय वाढवण्यासाठी तुम्ही एखादी योजना बनवाल. आजचा दिवस खूप चांगला राहील. पुस्तक विक्रेत्यांसाठी आजचा दिवस खूप फायदेशीर असेल.

**मकर :** तुमचा दिवस आनंदात जाईल. खेळाशी संबंधित महिलांसाठी आजचा दिवस खूप चांगला असेल, त्यांना एखाद्या पुरस्काराने सन्मानित केले जाऊ शकते. उत्पन्नात वाढ झाल्याने तुम्हाला चांगले वाटेल.

**कुंभ :** आजचा दिवस उत्तम राहील. कामाप्रती असलेल्या समर्पणामुळे तुम्ही लवकरच यशाकडे वाटचाल कराल. गणितातील एखादा विषय आज चांगला समजून घ्याल.

**मीन :** बँकेत काम करणाजया कर्मचाजयांसाठी आजचा दिवस चांगला राहील. नवीन घर किंवा वाहन घेण्याचा विचार कराल. आज तुम्ही ज्याच्यावर प्रेम करता, त्याच्यासोबत प्रत्येक गोष्ट मोकळेपणाने बोलू शकता.

# शब्दकोडे क्रमांक २१४०



आडवे शब्द :-
१) हातपाय पसरावयास लावणारे दोन सण
११) मार्ग, रस्ता
१२) लाज
१३) कांती, तेज
१४) बाजार
१५) नेहमी
१६) सासरी गेलेल्या मुलीच्या आई वडिलांचे घर
१७) उजाड, खिन्न
१९) नवे, न वापरलेले
२१) यात्रेस जाणे
२२) नगद
२३) माता-पिता
२७) घर फिरले की घराचे ** पण फिरतात
२८) टरफल
२९) पद्धत
३०) धपाटा
३१) खोबरे घालून केलेला भात
३४) मेहनत, श्रम, त्रास
३६) वाळा गवताचे सुंगंधी मूळ
३८) वेळ, समय (हिं.)
३९) सिद्ध
४०) भीती
४३) अवाजवी
४४) तात्काळ, लगेच
४६) गोड्या पाण्यातील एक मासा
४७) मुसलमानांचा उपवासाचा महिना
४९) च्यासह
५१) शासकीय
५२ ) उत्सव
५३) माणसाळलेले, पाळलेला
५५) प्रतिसाद हाक
५७) संतापी
५९) नेत्रसुखद
६२) नाजूक
६४) छोटे कुबड
६७) चरण
६८) कहाणीतील गाव
७२) रवाळ
७४) अभिनेता
७५) दावानल
७६) उग्र, अत्यंत तिखट
७८) दाह अग्नी
७९) विशेष
८०) समुद्र
८१) पुन्हा पुन्हा

उभे शब्द :-
१) दीपक
२) रस्त्यावर अडवून लुटण्याचे प्रकार
३) श्रीरामाच्या वडिलांचे नाव
४) पावसाची झड
६) रामावर विश्वास टाकून
७) इमारतीचा मूळ आधार
८) पहारा करणारा
९) मोठी उथळ वाटी
१०) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
१८) बगल
१९) कोपरा, बाळंते
२०) मत्स्य
२१) श्रीविष्णूचे बटु रूप
२३) ढग, लवकर
२४) सांभाळ, रक्षण
२५) पाण्याने भरलेला ढग
२६) बागवान
२७) वायू, हवा, वैताग(बो.भा.)
२८) समुद्रकिनारा
३२) रुधिर
३३) भाग्यवंत
३४) करुणा, कीव
३५) किल्ल्यावरचा अधिकारी
३७) शरीराने मोठा, जाडगेला
३९) काकडीचा कीस, तांडळाचे पीठ आणि गूळ घालून केलेला पदार्थ
४१) पृथ्वी
४२) श्रीकृष्णाचे एक नाव
४३) चुकून, नकळत
४५) सैन्याला मालपुरवठा
४६) ठेकेदार
४८) चामखीळ
५०) गीत, गाणे
५३) बसण्याची लाकडी फळी
५४) कर्णेंद्रिय
५५) तुलनेतील सारखेपणा
५६) प्रयत्नावाचून, आपले आपण
५८) सैनिकांचे पथक
६०) मृत्युदाता, कालपुरुष
६१) सुंदर तरुणी
६२) आंब्याची बी
६३) कपाळ
६५) कापणे (इं.)
६६) घट्ट, तणावाची स्थिती
६७) झाडाभोवतीचा कट्टा
६९) स्वरूपानंद स्वामींच्या समाधीचे रत्नागिरी जवळचे गाव
७०) बाज विणण्याची सुती पट्टी
७१) धोबी
७२) मनाचा ओढा
७३) लाकडी जिना
७४) गाव
७७) माळ, सर
७८) पाणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर




# नगर पंचायत कार्यालय, देवरी
## ता. देवरी जि. गोंदिया
### जाहिर सुचना

नगर पंचायत देवरी क्षेत्रातील सर्व नागरीकांना सुचीत करण्यात येते की, ज्या नागरीकांचे रिकामे प्लॉट आहेत त्यांनी आपले प्लॉट वर 7 दिवसाच्या आत भरण भरणा करण्यात यावे तसेच रिकाम्या प्लॉटवर वाढलेली झाडे झुडपे काढुन स्वच्छ करण्यात यावा. काम पुर्ण झाल्यावर स्वच्छ प्लॉटचे फोटो नगर पंचायत देवरी कार्यालयात जमा करण्यात यावे अन्यथा आपले प्लॉटचे मालमत्ता कर रद्द करुन सदर मालमत्ता नगर पंचायत देवरीच्या कब्जामध्ये घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच देवरी नगर पंचायत हद्दीतील ज्या इमारती भग्नावस्थेत, मोडकळीस व पडायला आलेल्या आहेत त्या इमारतीचे मालक, भोगवटदार, भाडेकरु यांना महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 195 अन्वये भग्नावस्थेत, मोडकळीस व पडायला आलेल्या वास्तु पाडून टाकण्यास किंवा दुरुस्ती करण्यास तसेच ज्या इमारतीचे वय 30 वर्षापेक्षा जास्त झाले असेल अशा इमारत मालकांनी स्वखर्चाने महानगरपालिका किंवा नगर पालिकेद्वारा अनुज्ञाप्ती प्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअरकडून स्ट्रक्चरल ऑडिट करणे आणि त्याप्रमाणे सदर इमारती दुरुस्ती किंवा आवश्यक असल्यास त्या इमारतीचा पडण्यास संभव असलेल्या भग्नावस्थेतील भाग तातडीने पाडणे अनिवार्य राहील. अशी जाहिर सुचना देण्यात येत आहे. अन्यथा अशा इमारतीमुळे कसलीही जिवित हानी किंवा वित्तहानी झाल्यास स्वतः जबाबदार राहतील व अशा मालक, भोगवटदार, भाडेकरु यांचेवर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल आणि होणाऱ्या दुर्घटनेस नगर पंचायत देवरी जबाबदार राहणार नाही याची संबधीतांनी नोंद घ्यावी.

तसेच देवरी नगर पंचायत हद्दीतील अनधिकृतपणे राहणाऱ्या नागरिकांना सुचीत करण्यात येते की, पावसाळ्याचे दिवस तोंडावर आले असल्याने पावसाळ्यातील अतिवृष्टीमुळे किंवा सततधार पावसामुळे नदी व नाल्यास पुर/महापुर येण्याचा संभव आहे. करिता पावसाळ्यापूर्वी नदीकाठावरील, नाल्याच्या काठावरील व तलावाच्या काठावरील अनधिकृत झोपड्या/घरे तसेच अधिकृत झोपड्या/घरे स्वखर्चाने इरतत्र हलविण्याची व्यवस्था/पर्यायी व्यवस्था करुन कसलीही जीवित हानी किंवा वित्तहानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. पावसाळ्यातील होणाऱ्या अतिवृष्टीमुळे नदी नाल्यांना पुर येऊन झोपड्या व घरे व त्यात राहणाऱ्या नागरिकांचे आर्थिक नुकसान व जीवित हानी होऊन शकते असे आर्थिक नुकसान व जीवित हानी झाल्यास त्यात नगर पंचायत देवरी जबाबदार राहणार नाही याची संबंधित नागरिकांनी नोंद घ्यावी. आपली पर्यायी व्यवस्था करुन नगर पंचायत देवरीला सहकार्य करावे.

स्वा/-
अध्यक्ष
नगर पंचायत देवरी

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत देवरी

## श्री दामोदर काशीवार यांचे मरनोत्तर नेत्रदान

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. १७जून:** नेत्रदान श्रेष्ठदान समजुन श्री रविंद्र काशिवार सर कोसमतोंडी यांचे वडील स्वं.दामोदर पांडुरंग काशिवार यांचे आज दिनांक १६/०६/२०२५ ला रात्री ९.४५ वाजता निधन झाले .तेव्हा मरनोत्तर नेत्रदान करन्यात आले . श्री रविंद्र काशीवार, त्यांची आई श्रीमती ताराबाई काशीवार , बहीण सौ. नुतन शेखर नाकाडे व सौ विद्या सुभाष डोंगरवार यांनी स्व. श्री दामोदरजी काशीवार यांचे नेत्रदान करन्याचे ठरविले व ईंद्राक्षी ऑय केअर हॉस्पिटल, भंडारा या पेढीला नेत्रदान केले .

यावेळी मुलगा रवींद्र , सुनबाई ज्योती , पुतणे श्री विजय काशीवार व श्री संजय काशीवार ,डॉ सुमेध काशीवार , भाऊ श्री राजु काशीवार उपस्थीत होते . डॉ संदीप पवार , सुचित्रा श्रीपाद , दिपक क्षिरसागर , सोनाली लांबट, डॉ ऊषा डोंगरवार-काशीवार डॉ धनंजय निखाडे या चमुने नेत्रदान करीता आवश्यक सहकार्य व कार्यवाही केली . कोसमतोंडी येथील काशीवार परिवार चे हे सातवे नेत्रदान होते . स्व दामोदर काशीवार यांचे अंत्यविधी कार्यक्रम दिनांक १७/०६/२०२५ ला सकाळी ९.३० वाजता मोक्षधाम घाट कोसमतोंडी येथे पार पडले .



# नाना पटोलेंची शिंदे सेनेच्या आमदारासोबत हातमिळवणी

## कारण 'राज'कारण : दुग्ध संघाच्या निवडणुकीत नवा टिवस्ट



**महासागर जिल्हाप्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १७जून:** २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण हे वाक्य आता बदलत चालले आहे. सध्याचे राजकारण हे जनतेसाठी कमी आणि स्वत:साठी अधिक असे सुरु आहे.

याचीच परिणीत आता भंडारा जिल्ह्यात पाहायला मिळत असून बिना सहकार नही उध्दार म्हणत महायुती व मविआच्या दोन आमदारींनी दुग्ध संघाच्या निवडणुकीसाठी अभद्र युती करत हातमिळवणी केली आहे.

काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले व शिंदेसेनेचे भंडारा पवनीचे आ. नरेंद्र भोंडेकर यांनी एकत्र येत सहाकार क्षेत्रातील दूग्ध संघाची निवडणुक लढविण्यासाठी एकवाक्यता झाली आहे.

राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा शत्रू किंवा मित्र नसते हे अनेकदा पाहायला मिळाले आहे. राज्याच्या राजकारण दादांची राष्ट्रवादी आणि भाजप एकत्र आल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि सहकार क्षेत्रातील निवडणुकीत हे अनेकदा दिसून येते. आता, शिवसेनेतील बंडानंतर शिंदेंच्या आमदारासोबत काँग्रेस नेते व आमदार नाना पटोले यांनी हातमिळवणी केल्याचे समोर आले आहे. भंडाड्ड्यातील या युतीमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही अशाच आघाडी व युती पाहायला मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहेत.

विशेष म्हणजे, राजकारणातील दोन वेगवेगळ्या पक्षाचे नेते, जे राज्यातील राजकारणात एकमेकांच्या विरोधात आहेत.

त्या पक्षांच्या नेत्यांनी आज भंडारा जिल्ह्यात दूग्ध संघाच्या निवडणुकीसाठी एकत्र हातमिळवणी केली.

काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिंदेंच्या शिवसेनेचे पूर्व विदर्भ समन्वयक आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी दूग्ध संघाच्या निवडणुकीत हातमिळवणी केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

### बँकेच्या निवडणुकीसाठी आम्ही पुन्हा एकत्र - पटोले

सहकारमध्ये कुठल्याही पक्षाच्या चिन्हावर निवडणूक होत नाही. भोंडेकर शिवसेनेचे असले तरी या जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही दोघेही मिळून काम करत आहे. या निवडणुकीला राजकीय वळण न देता जिल्ह्याच्या दूग्ध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी ही निवडणूक असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे. तसेच, ही निवडणूक पार पडल्यानंतर बँकेच्या निवडणुकीसाठी आम्ही पुन्हा एकत्र बसू. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आमचे स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी हे सांगतील त्यानुसार होईल, असेही आ. पटोले यांनी स्पष्ट केले.

### ज्यांनी डबघाईस आणले त्याच्याविरोधात ही लढाई - भोंडेकर

जे स्वत:ला सहकार महर्षी समजतात अशा भंडारा जिल्ह्यातील सहकार महर्षींनी जिल्ह्याला चौपाट केले आहे. जिल्हा दूग्ध संघाला ज्यांनी डबघाईस आणले त्याच्याविरोधात ही लढाई आहे. सर्वसामान्य माणूस, दूग्ध उत्पादक शेतकरी यांना उभे करण्यासाठी ही सहकारातील युती आहे, असे आ. भोंडेकर यांनी म्हटले आहे. तसेच, जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही सर्व एकत्र आलोय, असेही ते म्हणाले.

भंडारा जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात आज घडलेली ही राजकीय घडामोड सर्वत्र चर्चेत असून दोन दिग्गज नेते एकत्र आल्याने दूग्ध संघाच्या निवडणुकीत याचा परिणाम बघायला मिळणार आहे.

## फुलबांधे यांची काँग्रेस शिक्षक सेल अध्यक्षपदी नियुक्ती

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. १७जून:** डॉ. अशोक कापगते यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी प्रदेशाध्यक्ष आणि आमदार नानाभाऊ पटोले यांच्या नेतृत्वाखाली तहसील काँग्रेस शिक्षक सेलच्या अध्यक्षपदी बी.एम. फुलबांधे यांची नियुक्ती करण्यात आली.

फुलबांधे हे जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष, माजी शिक्षक, निवृत्त आदर्श शिक्षक आणि सक्रिय शिक्षक कार्यकर्ते आहेत. यावेळी आयोजित कार्यक्रमात आ. पटोले यांनी फुलबांधे यांचा पुष्पगुच्छ आणि काँग्रेस पक्षाचा स्कार्फ देऊन सत्कार केला आणि त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. फुलबांधे यांनी काँग्रेस पक्षासाठी अधिक समर्पणाने काम करण्याचे आणि काँग्रेसच्या माध्यमातून शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.



फुलबांधे यांच्या नियुक्तीबद्दल, तहसील काँग्रेस कमिटीच्या महिला अध्यक्षा छाया पटेल, शहराध्यक्षा पुष्पा कापगटे, दिलीप मसुरकर, शिक्षक सेलचे व्ही.एन. गिरीपुंजे, सचिव रामलाल डोंगरवार, कोषाध्यक्ष पठाण, रामदास रामटेके, किशोर गोस्वामी आणि भंडारा जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनची संपूर्ण कार्यकारिणी, तहसील काँग्रेस कमिटीचे एच.बी. भांडारकर, भांडारकर आणि इतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी फुलबांधे यांना शुभेच्छा दिल्या.

## शेतकरी हा गरीब आणि गरजूच, सरसकट कर्जमाफी द्या: नाना पटोले

***शेतकरी कर्जमाफीवरील भाजपाच्या नेत्यांची विधाने जखमेवर मीठ चोळणारी.**

***सरसकट कर्जमाफीचे आश्वासन देऊन मते घेतली आता सरकार आल्यावर फसवणूक**

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. १७जून:** राज्यातील शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटात सापडला असून त्याला मदतीची नितांत गरज आहे. शेतकरी कर्जमाफी देऊन त्यांचा सातबारा कोरा केला पाहिजे. देशात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होतात हे लाजीरवाणे आहे. भाजपाचे नेते व सरकारमधील मंत्री मात्र शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी वाहयात बडबड करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. शेतकरी हा गरीब व गरजू असून सरसकट सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केली आहे. शेतकरी कर्जमाफीवर बोलताना नाना पटोले यांनी भाजपा युती सरकार व भाजपा नेत्यांचा समाचार घेतला, ते पुढे म्हणाले की, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ असे एक विधान करून शेतकऱ्यांचा अपमानच केला आहे. कर्जमाफीचे आश्वासन देताना भाजपाने समिति स्थापन करण्याची भाषा केली नव्हती. शेतकरी हा गरजूच आहे, कसलाही भेदभाव न करता त्याला कर्जमाफी दिली पाहिजे. भाजपा युती सरकार अदानीसाठी सर्व नियम बदलते, त्यांना सुविधा दिल्या जातात तर मग शेतकऱ्यांसाठीच नियम व अटी कशाला लावता? भाजपा सरकार शेतकरी विरोधी आहे, भाजपाच्या धोरणामुळेच शेतकरी पिचला आहे. निवडणुकीवेळी कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले पण आता मात्र कर्जमाफी देण्यावरून सत्ताधारी पक्षातील नेते पळ काढत आहेत. काँग्रेस प्रणित युपीए सरकार असताना डॉ. मनमोहनसिंह यांनी ऐतिहासिक अशी ७० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली होती. महाविकास आघाडी सरकारनेही कोणत्याही नियम, अटी न घालता सरसकट कर्जमाफी दिली होती. शेतकऱ्याच्या पाठिशी उभे राहण्याची दानत काँग्रेस सरकारने नेहमीच दाखवली आहे परंतु भाजपा मात्र शेतकरीविरोधी आहे. मेघा इंजिनिअरिंग कंपनीला ३ हजार कोटी रुपयांचे वाढीव कंत्राट देताना सरकारकडे पैसे असतात पण शेतकऱ्यांना देण्यासाठी मात्र नसतात. शेतकऱ्यांची कर्जमाफी करून त्याला कर्जाच्या जोखडातून मुक्त करावे, असेही नाना पटोले म्हणाले.

# ग्रामीण भागात पावसाळ्यात जीर्ण घरांचा धोका !

## मातीचे घरे 'जैसे थे', अतिवृष्टीचा लाभ घेण्यासाठी ग्रामस्थांची कसरत

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा ,दि. १७जून:** प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागात घरकुल योजनेची लाभार्थ्यांना लागली पावसाळ्यापूर्वी लॉटरी आहे. घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याची घाई सुरू आहे.

परंतु, मातीचे जुने व जीर्ण घर 'जैसे थे' ठेवण्यात येत असल्याने ही घरे पावसाळ्यात धोकादायक ठरत आहेत. लहान मुले खेळताना भिंती कोसळल्याने जखमी झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. ग्रामपंचायत स्तरावर तातडीने मातीचे निकामी घरे भुईसपाट करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी होत आहे.

सिहोरा-बपेरा परिसरात प्रत्येक गावांत अशी जीर्ण घरे निदर्शनास येत आहेत. सिहोरा-बपेरा परिसरात नव्या घरात प्रवेश करूनही अनेक लाभार्थ्यांनी जुनी घरे तशीच कायम ठेवलेली आहेत. पावसाळ्यापूर्वी घरकुलांचे बांधकामाला गती लाभार्थ्यांकडून दिली जात आहे. घरकुल योजनेचा लाभ घेताना बहुतांश लाभार्थ्यांनी जुने मातीची जीर्ण घरे जैसे थे ठेवली आहेत. नव्या घरात प्रवेश केल्यानंतर लाभार्थी जुन्या जीर्ण घराकडे ढुंकूनही पाहत नाही. यानंतर पावसाळ्याचे पाणी जीर्ण घरांचे भिंतीवर पडत असल्याने भिंती कोसळत आहेत. ही घरे पावसाळ्यात आणि अन्य ऋतूत धोकादायक ठरत असतात. आमच्या प्रतिनिधीने पावसाळ्यापूर्वी बहुतांश गावांचा आढावा घेतला असता या बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

***ग्रामपंचायत सरसावणार काय ?***

घरकुल लाभार्थ्यांना योजनेचा लाभ प्राप्त करून देणारी ग्रामपंचायत प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्था आहे. गावातील घरकुल बांधकामावर ग्रामपंचायतचे नियंत्रण आहे. जीर्ण आणि धोकादायक घरांचे स्थानिक पातळीवर चौकशी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतची आहे. घरकुल लाभार्थ्यांना जुने जीर्ण घरे भुईसपाट करण्यासाठी पुढाकार घेतले पाहिजे. असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतने दुर्लक्ष केल्यास जीवित हानी नाकारता येणार नाही.

### अतिवृष्टीच्या लाभासाठी खटपट

पावसाळ्यात दरवर्षी अतिवृष्टी होत असल्याने शासन स्तरावरून घरे आणि भिंती कोसळल्याचे सर्वेक्षणाचे आदेश दिले जात आहेत. भिंती अथवा घरे कोसळल्यास शासन स्तरावरून नुकसान भरपाई दिली जात आहे. एकच भिंतीला अनेक वेळा मदत दिली गेली आहे. घरांच्या चार भिंती असताना चारही भिंतीचे वेगवेगळे अनुदान लाटण्यात आले आहे. यामुळे मातीचे जीर्ण घरे वास्तव्यास नसताना लाभार्थी भुईसपाट करीत नाहीत. पावसाळ्यात अतिवृष्टीचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची खटपट सुरू झाली आहे. धोकादायक भिंती आणि घरे असताना लाभार्थी मनावर घेत नाही. कुणाचे जीव गेले तरी चालेल, असेच चित्र आज ग्रामीण भागात दिसून आले आहे.

## जागतिक पर्यावरण दिन साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी ,दि. १७जून:** येथील जि. प. प्राथमिक शाळा सानगडी क्र. २ येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी वैशाली हर्षे (मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी) यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेला झाडे भेट दिली. पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण शपथ, प्लास्टिक मुक्त शपथ, माझी वसुंधरा अभियान, स्वच्छता अभियान, कचऱ्याचे व्यवस्थापन, पाण्याचा योग्य वापर याविषयी मार्गदर्शन उर्मिला निनावे मुख्याध्यापक यांनी केले.

वाढदिवसानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना वैशाली मॅडम कडून बिस्कीट पुडे व चॉकलेट देण्यात आले.




कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कौस्तुभ हर्षे, निनावे सर, देवराम देवरे यांनी सहकार्य केले. अशा आनंदी वातावरणात मॅडम चा वाढदिवस सर्वांनी मिळून साजरा केला. शेवटी वैशाली मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले.

## तुषार गणवीर यांचे निधन



**भंडारा :** इंदिरा गांधी वार्ड येथील रहिवासी तथा सामाजिक कार्यकर्ते तुषार मुरलीधर गणवीर यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने मंगळवार ला निधन झाले. मृत्यूसमयी ते ३६ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर वैनगंगा नदिवरील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, १ सहा महिण्याची मुलगी, दोन बहिणी, जावाई व बराच मोठा आप्त परिवार आहे.

## बाजार समिती येथील मुख्य रस्ता ठेकेदाराने नाली खोदून केला बंद

**महासागर प्रतिनिधी**

**लाखनी ,दि. १७जून:** बाजार समिती लाखनी येथील मुख्य रस्ता ठेकेदाराने नाली खोदून केला महिन्याभरापासून बंद केला आहे. बाजार समिती लाखनी येथील १५५ मीटर सी सी रोड मुख्य रस्त्याचे काम बाजार समितीचे संचालक मंडळाने पेपरला निविदा देऊन ई टेंडर मागविण्यात आले होते. त्या रस्त्याचे टेंडर कॉन्ट्रॅक्टर संजय सी लुंगे अकोला यांना दोन महिने आधीच मिळाला होता परंतु त्यांच्या कामात कसलीही गती



दिसत नसल्यामुळे संचालक मंडळाने वारंवार कामाची सूचना देऊन शेतकऱ्यांना धान्य ने - आणन्या करण्यासाठी त्रास होत असल्याचे सांगितले येता परिस्थिती अशी की नुकतेच उन्हाळी धान्य खरेदी केंद्र बाजार समिती येथे धान्य खरेदी करणे सुरू आहे आणि मध्येच ठेकेदारांनी मुख्य रस्त्यावर मोठी मोठी नाली खोदून रस्ताच बंद करून घेतला. अशा परिस्थितीत बाजार समितीच्या संचालक मंडळास गोडाऊन मधून धान्य कुठून ने आन करावे असा प्रश्न निर्माण झाला आहे .कॉन्ट्रॅक्टरने आठ दिवसात काम सुरू करावा अन्यथा टेंडर रद्द करून पुन्हा ही निविदा देऊन दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरला मुख्य रस्त्याचे काम देण्यात येईल असे संचालक मंडळाने सांगितले .

## १ एप्रिलपुर्वी नोंदणी केलेल्या वाहनाना एचएसआरपी नंबर प्लेट ३० जूनपर्यत मुभा

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा :** १ एप्रिल, २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या ज्या वाहनांना HSRP नंबर प्लेट ३० जून, २०२५ पर्यत बसविण्याची मुभा आहे. HSRP न बसविता वाहनांचे मालकी हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रामध्ये (RC) पत्ता बदल करणे, वित्त बोजा चढविणे/ उतरविणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे इत्यादी वाहन विषयक कामे HSRP नंबर प्लेट बसविल्याशिवाय १६ जून, २०२५ पासून बंद करण्यात येणार आहे.

तथापि ज्या वाहन मालकांनी HSRP नंबर प्लेट बसविण्यासाठी नियोजित वेळ व दिनांक घेतला असल्यास त्याची पावती कागदपत्रासोबत जोडल्यास त्यांच्या वाहनांचे पुढील कामकाज करण्यात येणार आहे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा विभागानी कळविले आहे.

## सुज्ञ व जागृत नागरीक घडविणे हे शिक्षणाचे अंतीम ध्येय आहे -जिल्हाध्यक्ष इंटक धनराज साठवणे

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १७जून:** जीवनाच्या वाटेवर १० व १२ वी हे वर्ष मार्गदर्शक असून आपल्या जीवनाची दिशा व दशा ठरविण्याचे महत्वाचे कार्य या अभ्यासक्रमाने होते.

एक उत्तम नागरीक, देशभक्त व समाजसेवक निर्माण करण्याचे कार्य हे आपल्या शिक्षण पध्दतीचे अंतीम ध्येय आहे.

त्यानुसार आपण सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात उत्तरोत्तर प्रगती करावी व स्वतःबरोबर देश व समाजाचे नाव अजरामर होईल असे कार्य करावे असे शुभेच्छापुर्वक वक्तव्य श्री. धनराज साठवणे जिल्हाध्यक्ष इंटक यांनी भंडारा शहर व परिसरातील १० व १२ वी च्या बोर्डाच्या परीक्षेती उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सत्कार करीत असतांना केले.

भंडारा शहर व परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास व जीवनाप्रती आस्था निर्माण व्हावी म्हणून श्री. धनराज साठवणे दरवर्षी सत्कार सोहळा आयोजित करतात. त्यात गरीब व होतकरू मुलांना मानपत्र, प्रशस्तीपत्र व योग्य ती मदत करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम आयोजित केले गेले.

सदर कार्यक्रमास परिसरातील विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून धनराजजी साठवणे यांच्या शैक्षणिक व समाज कार्याला





मोलाची पावती दिली. या कार्यक्रमातून भावी जीवनाच्या करीयर संबंधी आणि सामाजिक व कौटुंबिक मुल्यांची जोपासना करण्याचे आवाहन जयप्रकाश गायधने अध्यक्ष जि.प. शिक्षक संघटना यांनी केले.

या कार्यक्रमा प्रसंगी शहर तेली समाज पंचकमेटी चे अध्यक्ष बाळू सेलोकर, सचिव अशोक निमकर यांचेकडून विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वंश साठवणे यांनी यशस्वीपणे केले व आभार प्रदर्शन दक्षू थोटे यांचेकडून करण्यात आले.

सदर कार्यक्रमास वासुदेव भुरे, नरेंद्र साकुरे, दिक्षा बालपांडे, तनुश्री दंडारे, कमल साठवणे, सौ. पपीता साठवणे इ. नि अतिशय परीक्षम घेतले तसेच पूर्वी उरकुडे, खुशी शर्मी, ग्रेसी केवट, श्रेया घरडे, अनुष्का सरादे, अंशुल बोरकर, आरूषी झाडे, जान्हवी झाडे, हेमंत हुमने, वैभव टाले, आचल गुरपुडे, त्रिशा भेदे, गौरी आंबागडे, दिपीका डोंगरे, श्रध्दा देशकर, पुजा भेंडारकर, तन्वी शेंडे व विधान इ. परिसरातील विद्यार्थी, विद्यार्थीनी व पालक मोठ्या संख्येत हजर होते.

## श्री. नागेश्वर देवदासजी ठाकरे यांचे निधन



**भंडारा :** नागेश्वर देवदासजी ठाकरे यांचे आज दिनांक १७/६/२०२५ ला पहाटे दुःखद निधन झाले.


RNI No.- MAHAMAR-2010/35801

महासागर भंडारा

**मालक, मुद्रक, प्रकाशक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)




## अलार्म लावताय..सावधान



वेगळे काही

डॉ. प्रसन्न नेने

सकाळी वेळेवर उठण्यासाठी अलार्म लावून झोपता का? स्नूझ केल्यामुळे तुमचा सकाळचा अलार्म दर ५ मिनिटांनी वाजतो का? असे असेल तर वेळीच सावध व्हा. कारण यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका असतो. हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोकादेखील असतो.

तज्ज्ञांच्या मते, सकाळी अलार्म लावल्याने अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. सकाळच्या अलार्मचा मेंदूवरही वाईट परिणाम होतो आणि त्याचा मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.


**अलार्मचा शरीरावरचा परिणाम**

सकाळी अलार्मच्या आवाजाने जागे होणाऱ्यांना उच्च रक्तदाबाचा धोका जास्त असतो, असे 'यूव्हीए स्कूल ऑफ नर्सिंग'च्या अलीकडील संशोधनात आढळून आले आहे. संशोधनानुसार अलार्म लावून जागे होणाऱ्यांमध्ये उच्च रक्तदाबाचा धोका ७४ टक्के जास्त असतो. हे संशोधन ३२ लोकांवर करण्यात आले.

**अलार्म आणि उच्च रक्तदाबाचा संबंध?**

संशोधनात असे आढळून आले, की झोपलेल्या व्यक्तीला जबरदस्तीने जागे केले, तर त्याचा रक्तदाब वाढतो. अलार्मदेखील हेच करतो. अलार्म वाजल्यावर शरीराच्या प्रतिक्रियेमुळे रक्तदाब वाढतो. त्यामुळे पहाटे स्ट्रोक आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.

## अंडाशयाच्या कर्करोगाचं प्रमाण वाढतंय




व्याधी विचार

डॉ. मेघा दळे

ओव्हेरियन (अंडाशय) कर्करोग महिलांच्या अंडाशयात होतो. अंडाशय हे स्त्रियांच्या प्रजनन अवयवांपैकी एक महत्त्वाचा अवयव आहे. अंडाशयात अंडी (स्त्रीबीज) तयार होतात. बरेचदा सुरुवातीच्या टप्प्यात अंडाशयाच्या कर्करोगाचे निदान होत नाही. वारंवार पोट फुगणे, ओटीपोटात वेदना, वारंवार लघवी होणे आणि आतड्यांच्या हालचालींमध्ये बदल ही होणे ही या कर्करोगाची लक्षणे आहेत. वय, कौटुंबिक इतिहास आणि बीआरसीए १ आणि बीआरसीए २ सारख्या अनुवांशिक घटकांमुळे हा कर्करोग होण्याची शक्यता वाढते.

**अनुवांशिकता असल्यास जोखीम अधिक**

काही महिलांमध्ये अनुवांशिकतेने बीआरसीए १ आणि बीआरसीए २ असे घटक आढळतात. त्यांना ओव्हरियन कॅन्सरचा धोका अधिक असतो. हे अनुवांशिक घटक पालकांपैकी एकाकडून संक्रमित होऊ शकतात. स्तन किंवा अंडाशयाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असलेल्या महिलांनी अनुवांशिक समुपदेशन (जेनेटीक काऊन्सलिंग) सारख्या पर्यायाचा विचार करावा. बीआरसीए सारख्या अनुवांशिक घटकांबरोबरच लिंच सिंड्रोम, कोलन आणि एंडोमेट्रियल कर्करोगाशी संबंधित स्थितीदेखील अंडाशयाच्या कर्करोगाचा धोका वाढवते.

**पन्नास वर्षांवरील महिलांना जादा धोका**

बहुतेक वेळा अंडाशयाच्या कर्करोगाचे निदान ५० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या महिलांमध्ये होते. वाढत्या वयाबरोबरच या कर्करोगाचा धोका वाढत जातो. ओव्हरियन, स्तन किंवा गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असल्यास वेळोवेळी तपासण्या करून घ्यायला हव्यात. लवकर निदान झाल्यास वेळेवर उपचार मिळू शकतात आणि रुग्ण बरा होण्याची शक्यता वाढते. दुर्दैवाने अनेक प्रकरणांमध्ये निदानास विलंब होतो.

**कोणत्या चाचण्या कराव्यात?**

अंडाशयाच्या कर्करोगासाठी सध्या कोणतीही प्रभावी चाचणी उपलब्ध नाही. त्यामुळे त्याविषयी जागरूकता अधिक गरजेची आहे. नियमित पेल्विक तपासणी, उच्च-जोखीम प्रकरणांमध्ये अल्ट्रासाऊंड इमेजिंग आणि लक्षणांबाबत जागरूक राहणे वेळीच निदानास मदत करू शकते. कौटुंबिक इतिहास किंवा अनुवांशिक धोका असलेल्या महिलांनी नियमित तपासणी करावी आणि आपल्या डॉक्टरांशी याविषयी वेळोवेळी चर्चा करणे गरजेचे आहे. अधिक धोका असलेल्या महिलांसाठी, ट्रान्सव्हजायनल अल्ट्रासाऊंड आणि सीए-१२५ रक्त चाचण्यांचा सल्ला दिला जातो.

**धोका कमी करण्यासाठी...**

जीवनशैलीत अचूक बदल करणेदेखील या कर्करोगास प्रतिबंध करण्यास फायदेशीर ठरू शकते. वजन नियंत्रित राखणे, धूम्रपान टाळणे आणि शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहणे यामुळे या कर्करोगाचा धोका कमी होण्यास मदत होऊ शकते. कौटुंबिक इतिहासाबद्दल माहिती असणे आणि लक्षणे समजून घेणे हे त्या महिलांना वेळीच उपचार घेण्यास मदत करतील. म्हणूनच समाजात या कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करत अनुवांशिक तपासणी आणि जीवनशैलीत योग्य बदल केल्यास महिलांना कर्करोगाचा धोका कमी करता येतो.

## कमी झोपेमुळे येऊ शकतो हृदयविकाराचा झटका



आरोग्यविशेष

डॉ. दत्तात्रय मुळे

उत्तम आरोग्य आणि दीर्घयुष्यासाठी झोप अतिशय महत्त्वाची ठरते. वयानुसार प्रत्येकाने आवश्यकतेइतकी झोप घेणे आवश्यक आहे. कामाचा ताण आणि कार्यपद्धतीशिवाय इतर अनेक कारणामुळे अनेकांना रात्री जागरण करण्याची सवय असते. गरज नसतानाही अनेक जण रात्री विनाकारण जागे राहतात. रात्री न झोपणे ही आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कमी वयातही लोकांना हृदयविकाराच्या झटक्याने जीवाला मुकावे लागले. स्वीडनमधील उप्पसला विद्यापीठात केलेल्या एका अभ्यासातून सलग तीन रात्री झोप न घेतल्यास हृदयरोगाचा धोका वाढण्याची शक्यता जास्त असते, असा धक्कादायक गौप्यस्फोट झाला आहे. या संशोधनात निरोगी आणि तरुण लोकांचा विचार करण्यात आला होता. त्यांना कोणत्याही प्रकारच्या हृदयरोगाचा धोका नव्हता, तरीही झोपेच्या कमतरतेमुळे त्यांच्या शरीरात जळजळ आणि हृदयरोगाशी संबंधित बदल दिसून आले.

**तरुणांनी सजग होण्याची आवश्यकता**

आतापर्यंतचे बहुतेक संशोधन मध्यमवयीन किंवा वयस्कर लोकांवर करण्यात आले आहे, पण या अभ्यासातून लहान वयात झोपेचा अभाव हृदयावर परिणाम करतो, असे सिद्ध झाले. म्हणून, तरुणांनी त्यांच्या झोपेबद्दल जागरूक राहणे अतिशय गरजेचे आहे.

## झोपेत लाळ गळते, पाच आजारांचे मिळतात संकेत



जाणून घ्या

डॉ. कुंदन गायकवाड

काही लोकांना रात्री झोपताना लाळ येते आणि बहुतेक लोक त्याकडे दुर्लक्ष करतात; परंतु कधीकधी ते अंतर्गत आजाराचे लक्षण असू शकते. रात्री झोपताना लाळ येणे ही एक सामान्य समस्या आहे. झोपेत नाक बंद झाल्यास, व्यक्ती तोंडातून श्वास घेऊ लागते. त्यामुळे तोंड उघडे राहते आणि लाळ वाहू लागते. थकवा, एका अंगावर झोपणे किंवा जास्त लाळ येणे हीदेखील याची कारणे असू शकतात. हे वारंवार किंवा रोज होत असेल तर ते गंभीर व्याधीचे लक्षण असू शकते.

**पाच आजार**

✻ **सायनुसायटिसः** सायनस म्हणजे चेहऱ्याच्या हाडांमध्ये हवेने भरलेली, नाकाशी जोडलेली पोकळी. सायनसमध्ये सूज येते किंवा संसर्ग होतो तेव्हा नाक बंद होते. त्यामुळे व्यक्ती तोंडातून श्वास घेऊ लागते. झोपेत तोंड उघडे असल्याने लाळ नियंत्रित होऊ शकत नाही आणि वाहू लागते. ही समस्या बराच काळ राहिली तर उपचार आवश्यक आहेत.

✻ **गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स रोग**

लाळ हे गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स या रोगाचे कारणदेखील असू शकते. गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स रोगात, पोटातील आम्ल घशापर्यंत वाढते. त्यामुळे तोंडात लाळेचे उत्पादन वाढते. झोपेत असताना तोंडातून ही जास्तीची लाळ बाहेर पडू शकते.

✻ **न्यूरोलॉजिकल समस्या**

पार्किन्सन्स, ब्रेन स्ट्रोक किंवा स्नायू विकारांसारख्या मज्जासंस्थेशी संबंधित समस्या तोंड आणि घशाच्या स्नायूंना कमकुवत करतात. यामुळे लाळ गिळण्याच्या प्रक्रियेत व्यत्यय येतो. त्यामुळे ती तोंडात जमा होते आणि बाहेर पडते.

✻ **झोपेच्या समस्या**

'स्लीप ॲप्निया'मध्ये झोपेदरम्यान नाकावाटे होणारा श्वासोच्छवास अधूनमधून बंद होतो. त्यामुळे व्यक्ती तोंड उघडे ठेवून श्वास घेऊ लागते. यामुळे तोंड कोरडे पडते आणि लाळेची समस्या निर्माण होते. हा एक गंभीर विकार आहे.

✻ **दात आणि हिरड्यांच्या समस्या**

तोंडात संसर्ग होतो, दात किडतात किंवा हिरड्या सुजतात, तेव्हा लाळ ग्रंथी अधिक सक्रिय होतात. त्यामुळे लाळेची निर्मिती वाढते.

## उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडाचे नुकसान



आरोग्य चर्चा

डॉ. दिलीप शिरसाट

उच्च रक्तदाबाचा परिणाम हृदयावर तर होतोच, पण त्यामुळे मूत्रपिंडांचेही नुकसान होऊ शकते. उच्च रक्तदाबाला 'सायलेंट किलर' म्हटले जाते. रक्तवाहिन्यांमधून वाहणाऱ्या रक्ताचा दाब ठरावीक प्रमाणापेक्षा अधिक असतो, तेव्हा उच्च रक्तदाबाची समस्या उद्भवते. यामुळे हृदयाला अधिक काम करावे लागते आणि शरीरातील रक्तवाहिन्यांवरील ताण वाढतो. उच्च रक्तदाबाचा कौटुंबिक इतिहास, आहारातील मीठाचे वाढते प्रमाण, शारीरिक हालचालींचा अभाव, लठ्ठपणा, धूम्रपान आणि तणाव ही उच्च रक्तदाबाची कारणे आहेत. मधुमेह किंवा हार्मोनल विकारदेखील उच्च रक्तदाबास कारणीभूत ठरू शकतात. बहुतेक प्रकरणांमध्ये, उच्च रक्तदाबाची चटकन कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. काही लोकांना डोकेदुखी, चक्कर येणे, नाकातून रक्त येणे किंवा अंधुक दृष्टी यासारखी समस्या सतावू शकते. परंतु, अनेकांना हे उच्च रक्तदाबामुळे होत असल्याचे माहीत नसते.

**रक्तवाहिन्यांचे नुकसान**

वाढत्या दाबामुळे मूत्रपिंडातील रक्तवाहिन्यांचे नुकसान होऊ शकते. उच्च रक्तदाब हृदयाला हानी पोहोचवू शकतो, हे सगळ्यांना माहिती असले तरी मूत्रपिंडांवर त्याचा गंभीर परिणाम होतो हे फार कमी लोकांना माहिती आहे. रक्ताच्या शुद्धीकरणात मूत्रपिंडांची महत्त्वाची भूमिका असते. रक्तदाब जास्त काळ उच्च पातळीत राहतो तेव्हा मूत्रपिंडविकार सुरू होऊ शकतो किंवा मूत्रपिंड निकामी होण्याची शक्यता निर्माण होते.

**मूत्रपिंडातील रक्तवाहिन्यांना नुकसान**

उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडातील लहान रक्तवाहिन्या अरुंद आणि कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे शरीरातील टाकाऊ पदार्थ मूत्रावाटे बाहेर काढून टाकण्याची त्यांची क्षमता कमी होते. त्यामुळे शरीरात विषारी पदार्थ जमा होऊ शकतात.

**क्रॉनिक किडनी डिसीज**

दीर्घकालीन उच्च रक्तदाब हे 'सीकेडी'चे एक प्रमुख कारण आहे. जगण्यासाठी डायलिसिस आणि मूत्रपिंड प्रत्यारोपणाची आवश्यकता भासू शकते.

**काय काळजी घ्याल?**

उच्च रक्तदाबाचे व्यवस्थापन करून मूत्रपिंडांचे आरोग्य चांगले राखा. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि मूत्रपिंडांचे संरक्षण करण्यासाठी, आहारातील मीठाचे सेवन मर्यादित करणे, संतुलित आहाराचे सेवन करणे, नियमित व्यायाम करणे, वजन नियंत्रित राखणे, धूम्रपान टाळणे आणि रक्तदाबाची औषधे घेताना डॉक्टरांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे गरजेचे आहे. नियमित तपासणीमुळे रक्तदाबाची समस्या वेळीच ओळखण्यास आणि मूत्रपिंडाचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होते. उच्च रक्तदाब असलेल्यांनी नेहमी सतर्क राहावे आणि पुरेपूर काळजी घ्यावी. नियमित रक्तदाब तपासणी करावी, औषधे घ्यावीत.

## कॉफीऐवजी काय प्याल?



आहारतंत्र

तुमच्या दिवसाची सुरूवात कॉफीने होते का, तुम्ही दिवसभरात कॉफीचे चार ते पाच कप रिचवता का... सतत कॉफी पिण्याची ही सवय आरोग्यासाठी घातक ठरू शकते. कॅफेनचा अतिरेक घातक ठरू शकतो. यामुळे निद्रानाश, अस्वस्थता, उच्च रक्तदाब, पचनसंस्थेच्या तक्रारी अशा समस्यांना सामोरं जावं लागू शकतं. त्यामुळे दिवसाची सुरूवात कॉफीऐवजी दुसऱ्या पेयाने करावी. अशा काही पर्यायांविषयी...

✻ ग्रीन टी हा अत्यंत आरोग्यदायी असा पर्याय आहे. ग्रीन टीमध्ये भरपूर अँटीऑक्सिडंट्स असतात. सकाळी कॉफीऐवजी ग्रीन टी पिता येईल. दोन जेवणांच्या मध्येही तुम्ही ग्रीन टी पिऊ शकता. ग्रीन टी हा अत्यंत आरोग्यदायी असा पर्याय आहे.

✻ विविध भाज्या आणि फळांपासून स्मूदी बनवता येईल. न्याहरीला स्मूदी पिता येईल. हळद घातलेलं दूध हा सुद्धा खूप चांगला पर्याय आहे.

## केशराच्या पाण्याचे लाभ




आयुर्वेद आणि विकार

केशरामुळे पदार्थाला छान रंग येतो. केशराचा सुगंधही मन मोहवून टाकतो. केशर घातल्यामुळे मिष्ठान्नाला वेगळीच चव येते. केशरामुळे पदार्थाची लज्जतच वाढते असं नाही तर केशर खूप गुणकारीही आहे.

अस्थमा, कफ, घसा खवखवणं, मळमळणं, उलट्या अशा विविध विकारांवर केशर खूपच प्रभावी ठरतं. केशरयुक्त पाणी प्यायल्याने बरेच लाभ मिळू शकतात. केशराच्या सहा ते सात कांड्या दहा मिनिटं गरम पाण्यात भिजवून ठेवा. हे पाणी नियमितपणे प्या. सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी प्यायला हवं. केशरामधल्या काही घटकांमुळे आपला मूड लगेच चांगला होतो. कॅन्सरच्या पेशी मारण्याची क्षमताही केशरात असते. केशरामुळे शरीराचा दाह कमी होतो. इतकंच नाही तर केशरात अँटीऑक्सिडंट्ही असतात. केशराचं पाणी विविध आजारांवर गुणकारी ठरू शकतं. अर्थात केशरयुक्त पाणी पिण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य ठरतं. केशरयुक्त पाणी प्यायल्यामुळे चेहऱ्यावर छान चमक येते. केसांचं आरोग्य राखण्यासाठीही केशराचं पाणी प्यायला हवं. महिलांना मासिकपाळी दरम्यान बराच त्रास होतो.

## सवयींचा अतिरेक टाळा



आपण कुठे चुकतो?

काही सवयी कितीही चांगल्या वाटल्या तरी त्यांचा अतिरेक नेहमीच घातक ठरतो. कोणत्या आहेत या सवयी? जाणून घेऊ.

शरीरातल्या जीवनसत्त्वांची कमतरता भरून काढण्यासाठी जीवनसत्त्वयुक्त औषधं घेतली जातात. पण या गोळ्यांचा अतिरेक आरोग्याला मारक ठरतो. जीवनसत्त्वांच्या अतिरेकामुळे कर्करोग होऊ शकतो. त्यामुळे कोणतीही औषधं डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नयेत.


दररोज एक ग्लास वाईन प्यायल्याने हृदयाचं आरोग्य चांगलं रहातं असं म्हणतात. पण निरोगी रहाण्यासाठी फक्त एक ग्लास वाईन प्यायला हवी. त्यापेक्षा अधिक वाईन आरोग्याला घातक ठरू शकते. वाईनच्या अतिरेकामुळे उच्च रक्तदाब, स्थूलपणा, पक्षाघात अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

त्वचेतली घाण, मळ, मृत पेशी काढून टाकण्यासाठी एक्सफोलिएटिंग केलं जातं. या कृतीमुळे अँटीऑक्सिडंट्स तसंच इतर पोषक घटक रोमछिद्रांमार्फत त्वचेच्या आत शिरतात. स्क्रबिंगच्या माध्यमातून त्वचा स्वच्छ होते. पण स्क्रबिंग जास्त प्रमाणात केल्यास त्वचा कोरडी आणि खरखरीत होते.

नवसंशोधन

### सोशल मीडिया ठरतो घातक!

सध्या मुलांमध्ये स्मार्टफोन, सोशल मीडिया यांच्या वापराचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. बरीच मुलं तासनतास मोबाईल वापरताना दिसतात. मात्र सोशल मीडियाचा अतिवापर मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी मारक ठरू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. सोशल मीडियामुळे वाढत्या वयाच्या तसंच किशोरवयीन मुलांमध्ये खाण्याशी संबंधित विकार बळावण्याची शक्यता असते, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवणं गरजेचं आहे. इंटरनॅशनल जर्नल ऑफ इटिंग डिसऑर्डर्स या जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित झालं आहे. सध्या सोशल मीडियाची बरीच व्यासपीठं आहेत. मुलांची बरीच खाती असतात. मात्र एकापेक्षा अधिक सोशल मीडिया व्यासपीठांचा वापर लहानग्यांचं आरोग्य बिघडवू शकतो.



दंतारोग्य

### जास्त वेळ दात घासू नका!



बरेचजण बाल्कनीत उभं राहून किंवा फिरत फिरत दात घासतात. त्यांचं दात घासणं अर्धा-पाऊण तास सुरू असतं. मात्र अशा पद्धतीने दात घासणं अयोग्य आहे. अधिक काळ दात घासल्याने कोणतेही लाभ होत नाहीत. दातांवर जोरजोरात ब्रश घासल्यामुळे एनामेलचा थर कमी होत जातो. हिरड्या मागच्या बाजूला सरकरतात. यामुळे दंतविकार डोकं वर काढू शकतात. उगाचच दात घासत बसल्यामुळे खर्चिक उपचार करून घेण्याची वेळ येऊ शकते. १० ते २० टक्के प्रौढांचे दात याच कारणामुळे खराब होतात. म्हणूनच अधिक काळ दात घासण्याचा मोह टाळावा. दोन ते तीन मिनिटं दात घासणं पुरेसं असतं. उगाचच अर्धा तास दात घासत बसण्यात काहीच अर्थ नसतो हे लक्षात ठेवा.

केसांचं आरोग्य

### झिंक ठरतं प्रभावी

केस गळणं ही सर्वसाधारण समस्या बनून गेली आहे. महिलांसह पुरुषही केसगळतीने त्रस्त आहेत. केस गळण्यामागे बरीच कारणं असतात. अपुरी झोप, प्रदूषण, पोषक आहाराचा अभाव अशा असंख्य कारणांमुळे केस गळू लागतात. केसांच्या वाढीसाठी बऱ्याच पोषक घटकांची गरज असते. झिंक हा त्यापैकी एक पोषक घटक आहे. झिंकमुळे केसांचे टिश्यू बळकट होतात आणि वेगाने वाढ होऊ लागते. केसांच्या टिश्यूंचं नुकसान झिंकमुळे भरून निघतं. त्यामुळे केसांच्या वृद्धीसाठी आहारात झिंकचा समावेश असायला हवा. जवस, सुका मेवा, पूर्णधान्य, अंडी, दुग्धजन्य पदार्थ, डार्क चॉकलेट यामधून झिंक मिळू शकतं.




आजीबाईचा बटवा

### उपयोग मेथीचे



थंडीच्या दिवसात मेथी खायला हवी. मेथीच्या पानांमध्ये तंतूमय पदार्थ आणि भरपूर पोषक घटक असतात. थंडीत बरेचजण वजन कमी करतात. मेथीमध्ये खूप कमी कॅलरी असल्यामुळे आहारात मेथीचा समावेश करता येईल. मेथीच्या सेवनामुळे कोलेस्टरॉलचं प्रमाण कमी व्हायला मदत होते. कोलेस्टरॉल हृदयासाठी खूपच घातक असतं. मधुमेहींनी मेथीचं सेवन करायला हवं. मेथीमुळे रक्तातल्या शर्करेचं प्रमाण नियंत्रणात राहतं. मेथीमध्ये अँटीऑक्सिडंट्स तसंच बरीच जीवनसत्त्वं असतात. यामुळे त्वचेचं आरोग्य सुधारतं. या दिवसात त्वचा कोरडी पडते, फुटते. पण मेथीमुळे त्वचेचा तजेला टिकून रहायला मदत होते. मेथीमुळे पचनशक्ती सुधारते. पचनाच्या तक्रारी असतील तर मेथी खाता येईल. मेथीमधल्या फायबरमुळे अन्नपचन सुलभतेने होतं. त्यामुळे पचनाच्या तक्रारी असणाऱ्यांनी मेथीचं सेवन करायला हवं.

# शालार्थ आयडी घोटाळ्यात २७०० शिक्षक?

## संस्थाचालकांनी बोगस शिक्षकांकडून घेतले पैसे, मुख्याध्यापकांची यादी तयार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

शालार्थ आयडी घोटाळ्यात शिक्षकांच्या मान्यतेचे बनावट प्रस्ताव सादर करून शाळेत शिक्षक भरती करणाऱ्या संस्थाचालकांवरही कारवाईला सुरुवात झाली आहे.

याप्रकरणी २७०० शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थाचालकांची यादी तयार असून ६०० वर शिक्षकांचे रेकॉर्ड गहाळ असल्याची माहिती उच्चपदस्थ सूत्रांनी दिली. शालार्थ आयडी घोटाळ्यात कारवाईचा फास आवळत चालल्याने शिक्षण संस्थाचालकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

विठ्ठल-रुक्मिणी प्राथमिक बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचा अध्यक्ष व संचालक दिलीप धोटे याला या प्रकरणात अटक केली आहे. धोटेनंतर आणखी सुमारे ३० शिक्षण संस्थाचालक एसआयटीच्या रडारवर असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यासंदर्भात विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) प्रमुख, सहाय्यक पोलिस आयुक्त सुनीता मेश्राम यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याला दुजोरा दिला.

शिक्षक भरती घोटाळा प्रकरणातील प्रमुख आरोपी, वेतन अधीक्षक नीलेश वाघमारे दीड महिन्यापासून फरार आहे. त्याची चारही बाजूंनी कोंडी झाली. अटक होण्याची शक्यता वाढल्याचे सूत्रांनी सांगितले. वाघमारेची पत्नी मेघा नायब तहसीलदार आहे.

पत्नीसह त्याच्या कुटुंबीयांचीही चौकशी केली आहे. बँक खाती गोठवली आहेत. जिल्हा व सत्र न्यायालयाने वाघमारेचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. तत्पूर्वीच त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली असता उच्च न्यायालयानेही दिलासा देण्यास नकार दिला आहे.

शिक्षण विभागाने त्याला निलंबित केले आहे. वाघमारे त्याच्याशी संबंधितांशी व्हॉट्सअ‍ॅप कॉलिंगवर संपर्क साधत आहे. त्याचे काही मित्र त्याला नवनवीन सिमकार्ड पुरवत आहेत. त्यामुळे त्याचे लोकेशन ट्रेस होण्यास वेळ लागत आहे. मात्र पोलिस लवकरच त्याच्यापर्यंत पोहोचतील, असे सूत्रांनी स्पष्ट केले.

बोगस शालार्थ आयडी प्रकरणामध्ये पोलिसांनी आत्तापर्यंत शिक्षण विभागातील अटक, ताब्यात घेतलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या १६ पर्यंत पोहोचलेली आहे.

बोगस शिक्षक भरतीचा कारभार २०१२ पासून सुरू होता. तेव्हापासून जवळपास १ हजार शिक्षकांना नागपूर जिल्ह्यात नियुक्त्या देण्यात आल्या असून त्यापैकी केवळ ३५० नियुक्त्या रीतसर प्रक्रिया पूर्ण करून देण्यात आल्याचे समोर आले आहे. वेतन पथक अधीक्षक नीलेश वाघमारेसह दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

शालार्थ आयडी प्रकरणात नियुक्त्या झालेल्या बोगस शिक्षकांच्या नियुक्ती तारखेपासून बँक डेटमध्ये पगार काढण्यात आले. हे पगार आणि एरिअर्स लाखोच्या घरात आहे. त्यातून वाघमारेसह संबंधित शिक्षण संस्थाचालकांनी एकरकमी आपापले पैसे घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या प्रकरणात बोगस नियुक्ती झालेल्या शिक्षकांच्याही नोकऱ्या जाणार असल्याने त्यांच्यावर बिकट परिस्थिती ओढवली आहे. बोगस शालार्थ आयडी प्रकरणामध्ये पोलिसांनी संस्थाचालकाला ताब्यात घेतल्याने इतर संस्थाचालकांचे धाबे दणाणले आहे. यापूर्वी चरण नारायण चेटूले या संस्थाचालकाला अटक केली होती. आता काही बोगस मुख्याध्यापक आणि संस्थाचालक पोलिसांच्या रडारवर असून, त्यात राजकीय झुल पांघरलेले भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील काही संस्थाचालक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे .

# फडणवीस यांच्या आमदारकीवर लवकरच निर्णय येणार?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



देवेंद्र फडणवीस यांची आमदारकी रद्द करण्याची मागणी करीत पराभूत उमेदवाराने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाकडून लवकरच निर्णय येण्याची शक्यता आहे.

फडणवीस हे महाराष्ट्राचे तीन वेळा मुख्यमंत्री राहिलेले भारतीय जनता पक्षाचे नेते आहेत. त्यांनी ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी पहिल्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि २०१९ पर्यंत पूर्ण पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांच्या पाठिंब्याने त्यांनी २३ नोव्हेंबर रोजी पुन्हा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, मात्र बहुमत सिद्ध न झाल्यामुळे पाच दिवसातच, म्हणजे २८ नोव्हेंबर २०१९ रोजी त्यांनी राजीनामा दिला.

त्यानंतर, जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिंदे गटाने शिवसेनेत बंड केल्यावर फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारली. पुढे, डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकांनंतर ह्यमहायुतीह्ण सरकारने स्पष्ट बहुमत मिळवल्यानंतर ५ डिसेंबर २०२४ रोजी त्यांनी तिस ?्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. सध्या ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह राज्याचे नेतृत्व करत आहेत.

देवेंद्र फडणवीस मागील अनेक वर्षांपासून नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्राचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व करत आहे. या क्षेत्रातून आमदार झाल्यावरच त्यांनी तीनदा राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले आहे. यंदाही त्यांनी नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रातून काँग्रेसचे उमेदवार प्रफुल गुडधे पाटील यांचा पराभव करत विजय प्राप्त केला. मात्र गुडधे पाटील यांना फडणवीस यांच्या या विजयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात निवडणूक याचिका दाखल केली. या याचिकेत गुडधे पाटील यांनी फडणवीस यांची आमदारकी रद्द करण्याची मागणी केली आहे.

या याचिकेवर न्या. प्रवीण पाटील यांच्या चेंबरमध्ये सुनावणी झाली. सुनावणीत गुडधे पाटील यांनी लिखित युक्तिवाद सादर करत फडणवीसांसह इतर आमदारांची निवडणूक रद्द करण्याची मागणी केली. फडणवीस व इतरांनी या निवडणूक याचिकांना दिवाणी प्रक्रिया संहितेतील सातव्या ऑर्डरमधील नियम ११ आणि लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ८६ (१) अंतर्गत विरोध केला.

या निवडणूक याचिका लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ८१ (१) मधील निकष पूर्ण करीत नाही. त्यामुळे त्या सुरुवातीच्या टप्प्यातच फेटाळून लावा, अशी विनंती फडणवीस व इतरांनी केली. फडणवीस यांच्यावतीने अ‍ॅड. सुनील मनोहर यांनी निवडणूक याचिका नियमांचा दाखला देत याचिका दाखल करताना याचिकाकर्ते उमेदवारांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक असते, मात्र या याचिका दाखल करताना हा नियम डावलला गेला, असा युक्तिवाद केला.

निवडणूक याचिकाकर्त्यांनी मात्र त्यांच्या याचिका कायद्यानुसारच दाखल केल्या आहेत, असा युक्तिवाद केला. फडणवीस व इतरांनी याचिकांवर घेतलेले आक्षेप निराधार आहेत. याचिकांवर वेगात कार्यवाही होऊ नये, हा त्यांचा उद्देश आहे, असा आरोपही याचिकाकर्त्यांनी केला. न्यायालयाने याप्रकरणी निर्णय राखीव ठेवला असून कधीही फडणवीस यांच्या आमदारकीबाबत निर्णय येऊ शकतो.

# बफर झोनमधील जमिनी भाडेतत्त्वावर घेणार

## मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी उपाय एकरी ५० हजार रुपये देणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :



सध्या मानव वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. वाघ, आणि बिबटसह जंगली हत्तींचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

हा संघर्ष टाळण्यासाठी वनक्षेत्राला लागून असलेल्या, बफर झोनमध्ये असलेल्या जमिनी शेतकऱ्यांकडून ५० हजार रुपये एकरी या दराद्वारे मुख्यमंत्री सौर वाहिनी योजने अंतर्गत आम्ही घेणार असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, या जमिनींवर बांबूची लागवड करून ग्रासलँड डेव्हलप केले जाणार आहे. त्यामुळे या ठिकाणी वन्य प्राण्यांची शिकार होणारे शेतकरी शेतमजूर यांच्या जीव वाचेल. लवकरच याचा जीआर येणार आहे. सर्व बफर झोनमधील जमिनी आम्ही भाडेतत्त्वावर घेण्याची तयारी सुरू केली आहे, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली आहे. दरम्यान, काही महिन्यात होवू घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती म्हणून तिन्ही पक्ष एकत्र लढणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

# महापालिका निवडणुकीसाठी भाजपचे १८ मंत्री सज्ज

## कार्यकर्त्यांना ९० दिवसांचा टास्क, बैठकांतून कार्यकर्त्यांच्या समस्या सोडवणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :

आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेता कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना चार्ज करण्यासाठी भाजपचे १८ मंत्री दर महिन्याला महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकेक करून बैठका घेणार आहेत.

सरकार आपल्या दारी' उपक्रमांतर्गत हे मंत्री सर्व ३६ जिल्ह्यांत भाजपा पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांच्या विभागाशी संबंधित कामे करणार आहे. या अंतर्गत कामगार कल्याण मंत्री आकाश फुंडकर यांनी नागपूर येथे बैठक घेऊन कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे म्हणने ऐकून घेतले. तसेच लेखी निवेदने स्वीकारली.

भाजपचे मंत्री महिन्यातून दोनदा वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये बैठका घेणार आहे. आतापर्यंत फक्त मुंबईतील प्रदेश भाजपा कार्यालयात मंत्री बैठका घेत होते. पण, अनेकांना मुंबईला जाणे शक्य होत नव्हते. परिणामी जिल्हा स्तरावरील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची कामे होत नव्हती. हे लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्यात आता बैठका होणार आहे.

मंत्र्यांच्या दौऱ्याची माहिती विभागीय व जिल्हास्तरीय भाजपा पदाधिकाऱ्यांना देण्यात येते. प्रदेश कार्यालयातून दौऱ्याचे एसएमएस संबंधित जिल्हाध्यक्षांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांना पाठवले जातात.

ऑक्टोबरमध्ये महापालिका निवडणुका आहे. संघाने भाजपा कार्यकर्त्यांना ९० दिवसांचा टास्क दिला आहे. कार्यकर्त्यांना घरोघरी जाऊन संपर्क करायचा आहे. पण, त्यासाठी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना चार्ज ठेवणे गरजेचे आहे. यासाठी थेट मंत्रीच जिल्ह्यापर्यंत येणार आहे.

प्रदेश स्तरावर दौरा ठरल्या नंतर मंत्री येऊन पदाधिकाऱ्यांना भेटणार आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षात कार्यकर्त्यांची सरकारी समितीवरील पदे भरण्यात आली नाही. आणि आताही महापालिका निवडणुका झाल्याशिवाय कार्यकर्त्यांची वर्णी लागणार नाही. हे लक्षात घेता निदान कामे व्हावी म्हणून मंत्र्यांचे दौरे आयोजित करण्यात आले आहे.

**आकाश फुंडकरांची बैठक**

नागपूर महानगर आणि जिल्हा भाजपा यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशपेठ येथील भाजप कार्यालयात कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी मुख्य अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

कामगार विभागाशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्याचे, सहकार्य करण्याचे, कामाला गती देण्याचे आश्वासन दिले. पदाधिकारी व कार्यकर्त्यांना समस्या लेखी स्वरूपात देण्याचे सांगितले.

# वाघांच्या शांत अधिवासात मद्यपींचा धिंगाणा : व्यवस्थापकावर चाकूने हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १७ :

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोन अंतर्गत येणारे रिसॉर्ट पूल पार्टी आणि दारू पार्टीने चर्चेत आले आहेत. पद्मापूर येथील पोद्दार रिसॉर्टमध्ये तरूणांनी दारूच्या नशेत रिसॉर्ट व्यवस्थापकावर चाकूने हल्ला केला. यात व्यवस्थापक गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर उपचार सुरू असून दुर्गापूर पोलिसांनी पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोममध्ये शांतता आणि मनोरंजनासाठी बांधण्यात आलेले रिसॉर्ट आता हळूहळू वादग्रस्त ठरत आहेत. घुग्घूस येथील पाच तरुण पोद्दार रिसॉर्टमध्ये आले. दारूच्या नशेत झिंगणाऱ्या या तरूणांनी डीजे वाजवण्यावरून रिसॉर्ट व्यवस्थापकाशी वाद घातला. मद्यधुंद तरूणांनी थेट रिसॉर्ट व्यवस्थापकावर चाकूने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले आणि तेथून फरार झाले.

जखमी व्यवस्थापकाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती गंभीर आहे. दुर्गापूर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत अवघ्या दोन तासांत पाचही आरोपींना भद्रावती येथून अटक केली.

# अखेर बडगुजर भाजपावासी



गिरीश महाजन यांची यशस्वी मध्यस्थी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :

नाशिक येथील शिवसेना ठाकरे गटाचे मोठे नेते सुधाकर बडगुजर यांनी मोठे शक्तिप्रदर्शन करत मुंबई येथील भाजप कार्यालयात जाऊन पक्ष प्रवेश केला आहे. यावेळी हजारोंच्या संख्येने बडगुजर यांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

नरीमन पॉइंट येथील भाजप कार्यालयाच्या रस्त्यावर ढोल ताशे वाजवत हजारो कार्यकर्त्यांसह सुधाकर बडगुजर उपस्थित झाले होते. त्यानंतर भाजप कार्यालयात त्यांनी प्रवेश केला. परंतु यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व रवींद्र चव्हाण हे लवकर न पोहोचल्याने सुधाकर बडगुजर यांना ताटकळत थांबावे लागले. काही वेळाने दोन्ही नेते पोहचल्यानंतर पक्षप्रवेश झाला.

बडगुजर १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपींसोबत काय करत होते? असा प्रश्न दोन वर्षांपूर्वी भाजप आमदार नीतेश राणे यांनी विधिमंडळात उपस्थित केला होता. बॉम्बस्फोटातील आरोपींसोबत सुधाकर बडगुजर यांनी पार्ट्या झोडल्या आहेत, असा आरोप तो फोटो दाखवत नीतेश राणेंनी करत गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे चौकशीची मागणी केली होती. त्यावर मंत्री दादा भुसे आणि भाजप आमदार आशिष शेलार यांनीही विधिमंडळात जोरदार आरोप करत राणेंची पाठराखण केली होती.

नीतेश राणे यांच्या आरोपानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे प्रकरण अतिशय गंभीर असल्याचे म्हटले होते. तसेच फडणवीस यांनी या विषयावर एसआयटी चौकशी करण्याची घोषणा केली होती.

त्याच सुधाकर बडगुजर यांना भाजपाने आज पक्षात घेतले . त्यांच्यासोबत बबन घोलप यांनी देखील भाजपमध्ये प्रवेश केला आहे. बडगुजर यांचा पक्षात अपमान झाला म्हणून मी त्यांच्यासोबत पक्षात प्रवेश करत आहे. सामान्य जनतेचा सन्मान होत नाही, मग अशा ठिकाणी कशाला राहायचे. येणाऱ्या सर्व निवडणुकीत आपण आपला खाक्या आहे तो दाखवून भाजपला विजयी करू, असे घोलप म्हणाले.

मी निष्पाप आहे. मी समाजाची सेवा करतो, समाजासाठी झटतो. ज्या पक्षाने माझा अनादर केले त्या पक्षाला मी सांगू इच्छितो की महापालिका निवडणुकीत दूध का दूध पाणी का पाणी होईल, असे म्हणत बडगुजर यांनी ठाकरे गटाला इशारा दिला.

पक्ष मोठा करणे दलाली नाही, पक्ष मोठा करणे हा प्रामाणिकपणा आहे, असे गिरीश महाजन यावेळी म्हणाले.

# खत कारखान्यात दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, बार्शीटाकळी, दि. १७ :

तालुक्यातील कान्हेरी सरप ते राहीत मार्गावरील वसंत अ‍ॅग्रो खत कारखान्यातील दोन कामगारांचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली.

बार्शीटाकळी तालुक्यातील कान्हेरी सरपते राहीत रस्त्यावर रेल्वे लाईन पासून खदांनच्या बाजूला असलेल्या वसंत अ‍ॅग्रो खत कारखान्यात १२ जून रोजी विनोद बैठा (५५) व चंद्रशेखर सहानी वय (५३) रा. दरभंगा बिहार कामावर असताना आम्ल द्रव्य सेवन केल्याच्या कारणावरून त्यांना सहारा हॉस्पिटल, अकोला येथे उपचाराकरिता दाखल केले होते. या संदर्भात रामदास पेठ पोलिसात नोंद झाल्यानंतर सदर प्रकरण बार्शीटाकळी पोलिसाकडे वर्ग करण्यात आले.

दरम्यान, एकाचा १३ जूनला व दुसऱ्याचा १४ जूनला मृत्यू झाला. मृत्यू व्यक्तींचे शव विच्छेदन करण्यात आले. या अहवालात काय दडले? यासंदर्भात अहवालानंतरच माहिती उघड होईल. बार्शीटाकळी पोलिसांनी १६ जूनला सदरघटने संदर्भात मर्ग दाखल केला.

बार्शीटाकळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रवीण धुमाळ व त्यांच्या चमुने घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घटनेचा तपास सुरू आहे. खत कारखान्यात काम करणाऱ्या व्यक्तींचा आम्ल द्रव्य सेवन केल्याने मृत्यू कसा झाला? या संदर्भात सर्वत्र उलट सुलट चर्चा सुरू आहे.

## : मुलखांवेगळी माणसं :
## अक्षरांचा जादूगार




प्रत्येक शुभकार्याची सुरुवात श्री गणेशाच्या शुभ आशिर्वादाने व्हावी अशी प्रत्येकाची इच्छा असते. तुमच्या नावातच श्री गणेशाचं नाव साकारलं तर नवल वाटेल ना?

मुंबईतील अभिषेक चिटणीस हा कलाकार फक्त दोन मिनिटांमध्ये तुम्ही सांगितलेल्या कोणत्याही नावाचा गणपती साकार करतो. त्यानं आत्तापर्यंत २० ते २५ हजार अक्षर गणेश साकारले आहेत.

मुंबईसह राज्यात माघी गणेशोत्सवाला मोठ्या धुमधडाक्यात सुरुवात होत आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लाडके दैवत म्हणजे गणपती. सर्व चौशष्ट कला गुणांचा तो अधिपती असल्याने त्याला गुणपती असेही एक नाव आहे. बाप्पांना आपण विविध नावारूपाने संबोधतो.

काळाबरोबर अपडेट झालेले गणपतीबाप्पा अक्षर गणेश या कला प्रकारातून भक्तांना आकर्षित करत आहेत. मुंबईतल्या परळ भागात राहाणारा अभिषेक अक्षरांच्या माध्यमातून गणपती बाप्पा साकारतो. तो गेल्या १० वर्षांपासून अक्षर गणेश साकारत आहे. राजकीय नेत्यांपासून हिंदी, मराठी अभिनय क्षेत्रातील कलाकारांना देखील अभिषेकने साकारलेल्या कलाकृतीची भूरळ पडलीय.

सचिन तेंडुलकर, राज ठाकरे, अजित पवार यांनी देखील अभिषेकच्या कलेचे कौतुक केले आहे.

गायिका आशा भोसले, अभिनेत्री आलिया भट्ट, अभिनेता रितेश देशमुख, नृत्यदिग्दर्शक रेमो डिसुझा, धर्मेश यांना प्रत्यक्ष भेटून त्याने अक्षर गणेश कलाकृती दिली आहे.

ही कला साकारताना अनेक अडचणींवर मात करत आपल्या घरच्यांच्या पाठबळामुळे अभिषेक जास्तीत जास्त लोकांपर्यंत ही कला पोहचवण्याचा प्रयत्न करणार आहे. तसेच गरजू विद्यार्थ्यांना ही कला मोफत प्रशिक्षण देणार असल्याचं ही त्यानं सांगितलं.

लोकमानस

एकूणच अभिषेक सारखा अक्षरांचा जादुगार हा अनेकांच्या नावातून अक्षर गणेशा सारखी कलाकृती साकारत गणेश भक्तांमध्ये एक लोकप्रिय कलाकार म्हणून प्रसिध्द झालेला आहे. अभिषेकची हीच आगळी वेगळी अक्षरकला भविष्यात वृद्धीगत होवो याच त्याला शुभेच्छा. ■



## जगातील सर्वात मोठे रिजिड प्लास्टिक सर्कुलर इकॉनॉमी समिट

इंजेक्शन, ब्लो मोल्डिंग, पीईटी आणि रीसायकलिंगवरील एलिटप्लसच्या वार्षिक ग्लोबल सिग्नेचर समिटची १० वी आवृत्ती, वाढ आणि सर्कुलरिटीवर लक्ष केंद्रित करून भारताच्या रिजिड प्लास्टिक क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. एलिट प्लस १० वी आवृत्तीचे आयोजन अलीकडेच मुंबईतील जियो वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. संपूर्ण प्लास्टिक उद्योगाकडून या समीटचे जोरदार यश म्हणून कौतुक केले जात आहे.

या समिटला भारत सरकारच्या रसायने आणि खते मंत्रालयाच्या रसायने आणि पेट्रोकेमिकल्स विभाग (डीसीपीसी) द्वारे पाठिंबा आहे. शिखर परिषदेत १० देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ४५०+ संघटनांमधील १०५० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.

भारत विकसित होत असलेल्या नवीन जागतिक आर्थिक व्यवस्थेत स्थान मिळवत असताना, शिखर परिषदेने एक महत्त्वाचा उद्योग प्रवेगक म्हणून काम केले. दोन दिवसांत, चर्चांमध्ये प्रमुख भाषणे, ८ व्यवसाय सत्रे आणि ५ पॅनेल चर्चा बाजार गतिमानता, शाश्वत मोल्डिंग, नवीन अनुप्रयोग, तांत्रिक प्रगती, ब्रँड मालकांच्या अपेक्षा, पीईटी नवोपक्रम आणि पुनर्वापर तंत्रज्ञानापासून ते किंमत गतिमानता, ईपीआर धोरणे आणि वतुर्ळाकार अर्थव्यवस्था सक्षम करणाऱ्यांपर्यंत विषयांवर चर्चा झाली. ■ ■

## मुंबईच्या आरव अग्रवाल आणि इश्मीत कौरचे आकाश एज्युकेशनल अंतर्गत नीट परीक्षेत यश

देशातील आघाडीची टेस्ट प्रिपरेशन संस्था असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने अभिमानाने जाहीर केले की नेरुळ, मुंबईच्या आरव अग्रवालने NEET UG 2025 मध्ये ऑल इंडिया रँक 10 (AIR 10) मिळवली असून दादरच्या इश्मीत कौरने AIR 85 मिळवली आहे.

हे अपूर्व यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, शैक्षणिक शिस्तीचे आणि ऐइएसएल कडून मिळालेल्या जागतिक दर्जाच्या मार्गदर्शनाचे प्रतीक आहे.

विद्यार्थी ऐइएसएल च्या क्लासरूम प्रोग्रामचा भाग होते, जो खास NEET सारख्या कठीण वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय ऐइएसएल द्वारे मिळालेल्या ठोस शैक्षणिक पाया, संकल्पनांची स्पष्टता आणि शिस्तबद्ध अभ्यास पद्धतीला दिले.

संरचित अभ्यासक्रम, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन आणि वैयक्तिक मेंटरिंगमुळे आम्हाला अवघड विषय अल्प वेळेत आत्मसात करता आले. एइएसएल नसते तर हे यश शक्य झाले नसते, असे विद्यार्थ्यांनी सांगितले. एइएसएलचे चीफ अकॅडेमिक आणि बिझनेस हेड डॉ. एच. आर. राव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ■ ■ ■




: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## बदलीसाठी खोटे प्रमाणपत्र वापरणे अंगलट येणार
# शिक्षकांना थेट फौजदारीची शिक्षा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :

जिल्हा परिषद शिक्षण विभागात जिल्हांतर्गत बदलीसाठी खोटे प्रमाणपत्र वापरण्यात येत असल्याची बाब उजेडात आली होती.

राज्य सरकारने या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद शिक्षण विभागातील जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेत विशेष संवर्ग (भाग-१) अंतर्गत झालेल्या गैरवर्तनावर राज्य शासनाने आता थेट कडक भूमिका घेतली आहे. त्यानुसार दिव्यांगत्व व गंभीर आजाराच्या खोट्या वैद्यकीय प्रमाणपत्रांच्या आधारे बदली मिळविणा ?्या शिक्षकांविरोधात थेट फौजदारी गुन्ह्यांसोबतच निलंबनाची कारवाई देखील केली जाणार आहे. ग्रामविकास विभागाने १६ जून २०२५ रोजी नवीन परिपत्रक जारी करत या संदर्भातील स्पष्ट आदेश दिले आहेत.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना या विशेष संवर्गातील निकषांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशा प्रकरणांमध्ये दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधातही कारवाई करण्याचा इशारा शासनाने दिला आहे.

दिव्यांगत्व, गंभीर आजार व कौटुंबिक अडचणींच्या खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे विशेष संवर्गांतर्गत बदली घेणाऱ्या शिक्षकांची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर समोर आली आहेत. त्यामुळेच राज्य शासनाने हा निर्णय घेतला आहे.

ज्या प्रकरणांमध्ये दस्तऐवज खोटे आढळतील, अशा शिक्षकांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असून, निलंबन व शिस्तभंगाची कारवाईही केली जाणार आहे. त्यामुळे शिक्षकांच्या गैरप्रकारला चाप बसणार आहे.

१८ जून २०२४ पासून लागू असलेल्या विशेष संवर्ग भाग-१ धोरणाअंतर्गत केवळ पात्र आणि प्रामाणिक शिक्षकांनाच सूट देण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. शिक्षक बदली प्रक्रियेमधील पारदर्शकता टिकवण्यासाठी शासनाची ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.

**त्रिसदस्यीय समिती कडून चौकशी**

यूडी आयडी ऑनलाइन प्रमाणपत्र सादर करणाऱ्या शिक्षकांमध्ये शंका असल्यास जिल्हा शल्यचिकित्सकांकडून वैद्यकीय तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच वैद्यकीय व कौटुंबिक आधारावर सूट घेणा ?्या घटस्फोटित व परित्यक्ता महिलांच्या कागदपत्रांची व वास्तव स्थितीची थेट पडताळणी केली जाणार आहे. या निर्णयामुळे खोटे प्रमाणपत्र दाखवून बदली मिळवणाऱ्या शिक्षकांना चाप बसेल.

शिक्षक असो किंवा कर्मचारी असो गैरमार्गाचा अवलंब करून कोणतीही सवलत घेऊ नये. खरोखर दिव्यांग व व्याधीग्रस्त असतील तरच त्यानुसार लाभ घ्यावा. नियमाने ते पात्र ठरतील, मात्र तरीही न दिल्यास त्यांच्यावर अन्याय होईल. परंतु, बनावट प्रमाणपत्र दाखवून कोणी घेणार असले तर योग्य नाही, असे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी सांगितले.

बदलीसाठी खोटे दाखले देणे चुकीचेच आहे. अशा प्रथांना आळा बसायला हवा. असे प्रकार निदर्शनास आल्यास बदलीचा लाभ रद्द करावा. परंतु निलंबनाची किंवा फौजदारी कारवाई ही अति कठोर ठरेल. बदली धोरणात योग्य बदल करून शिक्षकांना आनंदाने शिकवणी देण्यास प्रोत्साहन द्यावे, असे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, मुंबई कार्यवाह शिवनाथ दराडे म्हणाले.